श्रीएकनाथ

संगीत नल-दमयंती नाटक.

कर्ता

विनायक सदाशिव लिंबगांवकर.

श्रीएकनाथ चरित्र, सुंदरराव-मनोरमा, रत्नाकर-सत्त्वशीला, नरसिंहमेहेता आणि शरश्चंद्र-कुमुदिनी इ. ग्रंथांचा कर्ता व श्री गुरु-लीलामृत ग्रंथाचा संशोधक.

प्रकाशक

गजानन चिंतामण देव.

बुकसेलर पुणें.

मुद्रक

रावजी श्रीधर गोंधळेकर. जगद्धितेच्छु

छापखाना पुणें.

आवृत्ति १ ली

सन १९०८

श्रीएकनाथ

प्रस्तावना.

सदर्हू “ संगीत–नल–दमयंती ” प्रयोग इ. सन १८०६ मध्यें “ श्री सद्गुरु प्रासादिक बेळगांवकर स्त्री संगीत मंडळीचे ” सूचनेवरून तयार करण्यांत आला असून, हल्लीं सदर मंडळी सदर प्रयोग रंगभूमीवर (परवानगीनें) करीत आहे.

यांतील कथाभाग मूळ काव्यास अनुलक्षून ग्रथिला गेला आहे. तथापि प्रयोगाचे सोयीकरितां कित्येक भागाचें आकुंचन केलें गेलें असून, क्वचित् नूतन प्रवेशहि दाखल करण्यांत आले आहेत.

यांतील गुण दोषांकडे प्रेक्षक व वाचक वर्ग हंस-क्षीर–न्यायानें अवलोकन करील अशी आशा आहे.

हें पुस्तक श्रीमत्सद्गुरु एकनाथ महाराज (संस्थान पैठण) यांचे चरणारविंदीं अर्पण केलें असे.

पत्ता:—— (भुतडीचा झापा) बडोदें.

विनायक सदाशिव लिमगांवकर. (कादंबरी–माला–कर्ते)

श्रीएकनाथ[illegible]

[बिनायक सदाशिव लिमगांवकर–कृत]

संगीत

नल-दमयंती-नाटक

(नूतन)

नांदी.

सूत्रधारः—

पद-(चालः—सांबसुरा भरणा)

वंदुं सदा प्रीतीं ॥ श्रीगुरु-दत्तराज-मूर्ती ॥ ध्रु० ॥ त्रि-शिरें ज्यासी षड्-भुज शोभती ॥ योगी-जन नि-शिदिनिं ज्या ध्याती ॥१॥ वंदुं०॥ साक्षित्वें राही ॥ तो प्रभु ॥ सकल-जगातिं पाहीं ॥ चिंतुनि त्या हृदयीं ॥ कवि हा काव्य-गुच्छ वाही ॥ दास विनायक सदाशिवासी ॥ देवो तो प्रभु कवनीं सु-मती ॥ वंदुं० ॥ २ ॥

पद—(चाल—साध्य नसे मुनिकन्या०)

वंदन त्या गुरु-पायां ॥ निरसी, जो का संसृति-माया ॥ ध्रु० ॥ ज्ञान-दीप जो तेजोराशी ॥ ब्रह्मा-नंदी, चिर, अ-विनाशी ॥ सद्बोधानें अज्ञानासी ॥ सु-कृपें नेई विलया ॥ थारा जो का बुध-जन-हृदया ॥ वंदन० ॥ १ ॥ (चाल) तल्लीलेनें होई स्फूर्ती ॥ अभिनव-नाटक-नलदमयंती ॥ संगीतीं नटवाया ॥ सु-यशा प्रभु दे विनायका या ॥ वंदन० ॥ २ ॥

सूत्रधारः—जगदीशलीला किती तरी अगाध आहे ! त्याच्या अनिवार मायेनें मोहित झाले नाहींत असे प्राणी या जगतीतलावर विरळाच ! मोठा ज्ञानी पुरुष असला, तरी तो का एकदां कालचक्रांत सांपडला, ह्मणजे मग त्याच्या त्या ज्ञानाचा लोप होऊन त्याला प्राप्त झालेली स्थिति निमूटपणें कंठावी लागते; अशीं उदाहरणें जगांत शेंकडों घडत आलीं आहेत व घडत आहेत. पण त्यांतलें अगदीं ठळक उदाहरण ह्मटलें ह्मणजे पूर्वकालीन नल राजाच पहा. जो प्रत्यक्ष पुण्यश्लोक असूनहि कालचक्र फिरल्यामुळें ज्याला कलीच्या सपाट्यांत यावें लागून अत्यंत शोचनीच स्थिति भोगावी लागली ! तेथें यःकश्चित् अज्ञजनांचा काय पाड ? असो, आज हाच ‘ नलदमयंतीप्रयोग ’ जो बडोदें राजधानींतील विनायक कवीनें संगीतयुक्त नूतन गुंफिला आहे, तो या प्रेक्षक बुधजनांसमोर सादर करण्याचा विचार योजिला आहे. व या कामीं आनंदानें साह्य करण्याचें भार्येनेंहि वचन दिलें आहे. तर तिची बहुतेक तयारी झालीच असेल. बरें पण, ती अद्याप कां आली नाहीं ? (पडद्याकडे कान देऊन व न्याहाळून पाहून) हो, ती पहा ! मोठ्या डौलानें सजून आनंदानें इकडेच येत आहे.

नटीः—

पद—(चाल-व्यर्थ अह्मी अबला)

मोद मना देई ॥ खचित बाई ॥ ध्रु० ॥ सुंदर ऋतु हा वसंत गमतो ॥ यासम दुसरा नाहीं ॥ खचित० ॥ १ ॥ उपवनिं शोभति लतिका कैशा ॥

आम्रीं कोकिल गाई ॥ खचित० ॥ २ ॥ मधुर फुलांचा परिमल सुटुनी ॥ मंद-वायु हा वाही ॥ खचित० ॥ ३ ॥ धवल-चंद्रिकेमाजीं रमणी ॥ क्रीडति पतिसह पाहीं ॥ खचित० ॥ ४ ॥ मधु-मासचि हा सकलांमाजीं ॥ अभिनव-सौख्या देई ॥ खचित० ॥ ५ ॥

सूत्रधारः—अहाहा ! प्रिये, समयाला अनुसरून या वेळचें हें तुझें गायन किती तरी आल्हादक आहे ! बरें पण, आज फारशी आनंदांत दिसतेस ?

नटीः—हा वसंतकाल आनंदाचाच आहे; आणि त्यांतून आपल्यासारख्या विद्वान् व नाट्यकलाभिज्ञ पतींच्या सहवासानें माझा नेहमींच काल आनंदांत जायचा. वास्तविक ह्मटलें ह्मणजे:—

॥ कामदा ॥

रूपवंत तो धनिक गुणि नसे ॥
कांत तरि सदा पूज्य कीं असे ॥
शास्त्र-वच असें वरि कुलांगना ॥
ठेवि पति-सवें योग्य-वर्तना ॥ १ ॥

सूत्रधारः—तुझें हें ह्मणणें खरोखरच कुलवधूंना भूषणावह आहे. पहाः—

साकी ॥

निषध-पती-नल-राज सद्गुणी भू-मंडलिं जो ख्यात ॥
हरवी, द्युतीं राज्य-वैभवा, भार्येसी त्यागीत ॥
तरिही दमयंती ॥ न ढळे सत्यापासुनि ती ॥ १ ॥

हो, आज याच प्रयोगाच्या कामीं साह्य करायचें तूं सकाळीं कबूल केलें आहेस नाहीं बरें ! तर मग झाली का तयारी ?

नटीः—हो, सर्व तयारी यथास्थित आहे.

सूत्रधारः—बरें तर, प्रस्तुत एखाद्या रसिक गायनानें या जमलेल्या प्रेक्षकवर्गाच्या चित्तचकोराला तृप्तकर पाहूं.

नटीः—ठीक आहेः—

पद—(चाल–तव मुख निरखुनि)

नाटक हें किति रसिक, मनोहर ॥ नव-रस-युत जगिं खेळत ईश्वर ॥ ध्रु० ॥ माया-संगें विश्वा रचितो ॥ अवन करुनी विलया नेतो ॥ प्रभु-कृति अपार ! ॥ नाटक० ॥ १ ॥ तल्लीलेनें विविध-भू-मिका ॥ प्राणी नटती, या जगिं देखा ॥ करिति सु-विहार ॥ नाटक० ॥ २ ॥

सूत्रधारः—प्रिये, तुझ्या गायनांत ईशलीला गुंफिलेली पाहून परमाल्हाद वाटतो.

(पडद्यांत चोपदारः—श्रीमंत सकल गुणैश्वर्य-संपन्न गोब्राह्मणप्रतिपालक राजाधिराज नलमहाराजकी सवारी आती है. आस्ते, कदमपे निगा रखिये महाराज.)

सूत्रधारः—ऐकलास का प्रिये, हा ध्वनि कशाचा तो ? यावरूनः—

साकी ॥

नृप-चूडामणि नल-राजा हा या क्षणिं मोठ्या थाटें ॥ राज-मार्गिं या गमन करितसे दरबारासी वाटे ॥ यास्तव चल जाऊं ॥ भार्ये नृप-दर्शन घेऊं ॥ १ ॥

(नटीचे स्कंधावर हात ठेवून सूत्रधार निघून जातो.)

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

स्थलः—नलाचा दरबार.

पात्रें:—नल, प्रधान, अमात्य, सेनापति, चोपदार आणि द्विज.

(पडदा उघडतांच.)

नलः—

पद-(चालः—मोहवृत्ति अपुली.)

राज्य-छत्र-धारी ॥ भू-पति-भाग्य तें श्रेष्ठ जगीं या ॥ सकल-सौख्यकारी ॥ ध्रु० ॥ तथापि अंतः-सुख नच त्यातें ॥ होऊं कैसे प्रिय पौरातें ॥ निशिदिनिं हृदिं चिंता हे भारी ॥ राज्य० ॥ १ ॥ स्व-धर्म-संरक्षण तें व्हावें ॥ नीती-न्यायें तरि वर्तावें ॥ सुखकर जगिं कीर्ती-विस्तारी ॥राज्य०॥२

प्रधानजी, ईश्वरी कृपेनें या भूमंडलावर विख्यात अशा नैषध कुलांत माझें जनन झालें असून, सांप्रत राज्यछत्र माझ्या मस्तकावर विराजमान असल्यानें मला महद्भाग्यवान् असें लोक ह्मणत असतील; पण हें त्यांचें ह्मणणें एका अर्थी सांपत्तिक दृष्टीनें जरी खरें असलें, तरी सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर, राजहृदय हें नेहमीं चिंतातुरच असायचें ! कारण, राज्यशकट हा नियंत्रित चालविणें, पौरसंरक्षणाविषयीं नेहमीं दक्ष असणें, व स्वतःच्या सद्वर्तनानें प्रजाप्रियता संपादन करणें हें कांहीं सामान्य काम नव्हे. हें ज्यानें यथायोग्य बजा-

**त्याप्रती ॥ स्वरुप-मनोहर दुहिता चवथी दम-
यंती तशि असे ॥ जशी कीं इंदिराच दुजि
दिसे ॥ विदर्भ० ॥ १ ॥**

महाराज, भीमकाचे तीन पुत्र केवळ रूपगुणांनीं अप्रतिम आहेत; पण सर्वांत धाकटी कन्या दमयंती ही जणूं साक्षात् रतीच अवतरली आहे ! किंबहुना रतीहूनहि तिचें सौंदर्य कांकणभर जास्तच असेल ! जशी ती सौंदर्यशालिनी आहे, तशीच सद्गुणशालिनीहि आहे. प्रस्तुत नुकतीच यौवनप्रभा तिच्या तनूवर चमकूं लागल्यानें, तिचें नैसर्गिक सौंदर्य विशेषच खुललें आहे. राजा, अशी ती रूपसद्गुणशालिनी दमयंती ज्याला वरील, तो खरोखरच भाग्यशाली ह्मणायचा ! पण असा भाग्यशाली तुझ्याशिवाय या जगतीतलावर मला तर दुसरा कोणीच दिसत नाहीं.

नलः—(एकाग्रचित्तानें दमयंतीचें वर्णन ऐकून व मोहित होऊन) द्विजराज, आपल्या मुखानें हें वर्णन ऐकून परमाल्हाद झाला आहे. ईशसत्तेनें घडेल तें खरें. (अमात्यास) अमात्य, या द्विजराजांच्या संभावनेदाखल सुवर्णकटक व महावस्त्र आणवा पाहूं.

अमात्यः—जी सरकार, (जातो व ताटांत वरील वस्तु आणून ब्राह्मणास अर्पण करितो.)

द्विजः—महाराज, हा आपण केलेला सत्कार खरोखरच अभिनंदनीय होय.

नलः—कांहीं नाहीं. ही सर्व ईश्वरी कृपा आहे.

द्विजः—बरें, महाराज, आतां मला येण्याला आज्ञा असावी.

नलः—ठीक आहे, मलाहि आतां उद्यानभूमिकेकडे जायचें आहे. (उठतो व पडदा पडतो.)

प्रवेश २ रा.

स्थलः—रस्ता.

पात्रें:—नल.

(पडदा उघडतांच.)

नलः—

पद—(चालः-दारिद्यानें)

ऐकुनि द्विज-मुखिं भीमक तनया, दमयंतीचें वृत्त मनोहर ॥ सद्गुण-शालिनि हृदयीं भरली, रमणी जी का रतिसम सुंदर ॥ न सुचे, कांहीं या समयीं मज, हृदया विंधी, तो कुसुमाकर ॥ होइल कांता जरि ती माझी, भाग्यवान् मी तरिच खरोखर ॥ १ ॥

काय करावें? सर्व काळ त्या रमणी दमयंतीचाच ध्यास लागला आहे! राजकार्य, मृगया इत्यादि कोणत्याहि प्रकारांत चित्त लागत नाहीं:—

पद-(चालः-जरि नाहिं कमल)

ती कुंद-रदनि कामिनी, भीमकी मनीं, भरलि किति पाहीं ॥ हें चित्त वेधुनि जाई ॥ध्रु०॥ जाउनी तिजला क्षणीं, कळविका कुणी, वृत्त मम सारें ॥ होइ का सु-मन वश तीचें ॥ १ ॥ तो भीमक-नृप तीजला, अर्पि का मला, तुष्ट होऊनी ॥ धन्यता तरिच या जनीं ॥२॥ जगदीश-प्रभु-पादिं करी, ओडल्या करीं, विनति मी आतां ॥ होउ तो तुष्ट मजवरता ॥ ३ ॥

असो, आतां विश्रांतीकरितां उद्यानभूमिकेकडे तरी जाऊन पहावें. (जातो.)

प्रवेश ३ रा.

स्थलः—उद्यान (सरोवरासह)

पात्रें:—नल व हंस.

नलः—(बागेंत प्रवेश करून व इकडे तिकडे फिरून) मी या उपवनांत विश्रांतीकरितां आलों, व हें उपवनहि रमणीय असून चित्ताची उदासीनता कशी ती जात नाहीं. त्या भीमककन्यकेच्या प्राप्तीसाठीं चित्त कसें अगदीं बावरलें आहे ! असो, आतां सरोवराच्या कांठीं तरी विश्रांति घेऊन पहावी.

(सरोवराकडे जातो व कांठीं निजलेल्या
हंसाकडे पाहून.)

अहाहा ! आज या सरोवराच्या कांठीं हा नवीनच मनोहर हंसपक्षी दिसत आहे ! (हंसानजिक जाऊन)

पद—(चालः-मधुर वचें)

विहग अहा मम रिझवी, नयनां हंस किती ॥ काया सुंदर कनकाची ही ॥ गमत सु-रम्य मना किति पाहीं ॥ सरांत हा पोहुनियां, होई श्रांत अति ॥ निद्रित झाला, यास्तव येथें ॥ हळुच धरूं या पक्ष्या गमतें ॥ पिंजरिं घालुनि करूं, लालन कीं हें रुचतें ॥ १ ॥

(नंतर पायांतील जोडा काढून व विजार, अंगरख्याच्या बाह्या आणि कडीं वर सारून हळूच हंसाला

धरतो; व तत्काल हंस जागृत होऊन सुटण्याकरितां प्रयत्न करितो पण राजा सोडीत नाहीं असें पाहून:-)

हंसः—अरे राजा, मला सोड. मी झोंपेंत असतांना असें विश्वासघातानें धरणें तुझ्यासारख्या थोराला शोभत नाहीं. जर तूं मारण्याच्या हेतूनें मला धरलें असलें, तर सर्वस्वीं घात झाला ह्मणायचा! कारण, मी माझ्या आईचा एकुलता एक मुलगा असून हल्लीं ती वृद्ध आहे, व माझी स्त्रीहि तरुण असून, नुकतीच साता दिवसांची प्रसूत आहे. त्या उभयतांचें पोषण केवळ माझ्यावर अवलंबून आहे. अशा स्थितींतः—

पद्—(चालः—लग्नसमारंभें)

हंसः—धरिशि नृपाला उगिच कशाला ॥ नभपथ-गामी मज हंसाला ॥ ध्रु० ॥

नलः—काया सुंदर तव ही रुचली ॥ पिंजरिं ठेविन सुखेंचि तुजला ॥

हंसः—वा! माझ्या कनकमय सुंदर कायेला भुलून तूं मला पिंजऱ्यांत ठेवणार काय? स्वतःच्या मनोरंजनाकरितां माझ्या स्वातंत्र्यावर घाला घालणारी तुझी इच्छा मोठी अनावर आहे! राजा, 'जगांत हरएक व्यक्तीला स्वातंत्र्याची आवड आहे' हें तूं जाणतोसच. म्हणूनः—

(चाल सदर.)

सोडिशि अनुकंपा तूं करुनी ॥ करिन तुजवरी उपकाराला ॥ धरिशि नृपाला उगिच कशाला ॥

नलः—कवण्या उपकारासी करिशी ॥ वाटे आश्चर्यचि मन्मतिला ॥

हंसः—धरिशि नृपाला उगिच कशाला ॥ १ ॥

नलः—अरे पक्षिराज, तूं यःकश्चित् पक्षीजाति असून माझ्यासारख्या सर्वसंपन्न नृपतीवर कसूचारे उपकार करणार? 'मतलबाकरितां कसेंहि गोड बोलून सुटून जावें' हा प्राणीमात्रांचा धर्मच आहे. अशांतलाच तुझ्या बोलण्याचा प्रकार. दुसरें काय?

हंसः—राजा, आह्मा मानससरोवरवासी हंसांची योग्यता तूं जाणत नाहींस. तूं गर्वानें स्वतःचा मोठेपणा दर्शवून, माझा निषेध करितोस, पण या जगांत सर्वसंपन्न असा कोणीच नाहीं हें पक्कें समज; कोणाला कांहींना कांहीं तरी गोष्टीची उणीव असतेच. चिंतादेवीनें आपला पगडा बसविला नाहीं असा प्राणी जगावर विरळाच! त्याअन्वयें प्रस्तुत तुझा हा कोमेजलेला चेहराच साक्ष देत आहे कीं, तूं कोणत्या तरी गोष्टीविषयीं अंतर्यामीं दुःखी आहेस.

नलः—शाबास! तूं मोठा चतुर व हृद्गत जाणणारा आहेस. तर मग तुला आतां उघड सांगतों ऐकः—

साकी ॥

विदर्भ-देशाधिपती-भीमक-तनया जी दमयंती ॥ रतिसम सुंदर, सद्गुण-शालिनि, वसली मनिं ती युवती ॥ लागत ध्यास तिचा ॥ निशिदिनिं हंसा मज साचा ॥ १ ॥

तर ती सुमुखी मला वरील असा कांहीं उपाय तुझ्याकडून होईल?

हंसः—हं हं! एकूण आपण कामदेवाच्या तडाख्यांत सांपडलांत तर? बरें, पण ती दमयंती 'रतिसमान सुंदर व सद्गुणशालिनी आहे' असें तूं ह्मणतोस; यावरून तिला प्रत्यक्ष पाहिली आहेस वाटतें?

नलः—छेः, मीं तिला प्रत्यक्ष पाहिली नाहीं. फक्त ब्राह्मणाच्या मुखानें तिचें अलौकिक वर्णन ऐकल्यापासून माझें चित्त तिच्याविषयीं अनुरक्त झालें आहे.

हंसः—हंः ! काय चमत्कार पहा ! नुसतें वर्णन ऐकल्यापासून तूं तिच्यावर इतका अनुरक्त झालास, मग प्रत्यक्ष दर्शन झाल्यावर किती वेडावून जाशील कोण जाणे !

नलः—हंसा, कांहीं ह्मण; पण माझी अशी स्थिति झाली खरी ! समरामध्यें मोठमोठ्या शत्रूंच्या हृदयाला क्षतें पाडण्याची जी माझी शक्ति, त्या माझ्या हृदयाला कामशरांनीं प्रस्तुत घायाळ केलें आहे !

हंसः—राजा, यांत तुझा दोष नाहीं. सर्व जगाचा आपल्या दृष्टिपातानें अंत करणाऱ्या अशा शंकराला, साक्षात् दैत्यारि विष्णूला, सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाला आणि मोठमोठ्या शापादपि शरादपि ब्रह्मर्षींना ज्या कामदेवानें जर्जर करून सोडिलें, तेथें तुझ्या सारख्याचा काय पाड ? असो, आतांः—

पद—(चालः—मिरवित गौरी.)

रमणी सुंदर ती युवती ॥ मनोहर ॥ ध्रु० ॥ विदर्भ-देशाधिपती बाला ॥ नामें जी दमयंति ॥ रमणी० ॥ १ ॥ जाइन तेथें अतांचि नृपती ॥ गाठिन, तिज एकांतिं ॥ रमणी० ॥२॥ तव गुणवर्णनिं तिज हृदयीं मी ॥ बसविन, ही तव मूर्ति ॥ रमणी० ॥ ३ ॥

नलः—ठीक आहे, तर ही मी तुझी मुक्तता

करितों. (त्यास सोडितो) पाहूं आतां कसें कार्य करून येतोस तें !

हंसः—विलंब कशाला ? हा पहा मी आतांच तिकडे उडून चाललों. हरएक उपायानें तिला एकांतीं गांठून, व ती तुझी स्त्री होईल अशा प्रकारचें तिचें वचन घेऊन, एक दोन दिवसांतच परत येतों; आणि तुला राजवाड्याच्या गच्चीवर उलट निरोप कळवितों.

(हंस निघून जातो.)

(रस्त्यावर)

नलः—

पद—(चालः—धाडुनि दिधलें.)

मन्मथ हृदया विंधी मम या, कांहि सुचे नच मातें ॥ सु-दति कधीं ती प्राप्तचि होई, कंज-लोचनी रामा ते ॥ ध्रु० ॥ राहि न तिळही शांति मना मम, व्यापि किती दमयंती ॥ हंस चतुर हा बोले वाणी, चित्तिं वसे परि खंती ॥ झड-करि गमना पाक्षि करूनी, गांठिल कां तिज युक्तीं ॥ वृत्ता प्रिय तो श्रवणीं तीच्या, कळवुनि रिझवी सखि ते ॥ १ ॥

ठीक आहे, हंस तर सखीकडे गेलाच आहे. बहुधा तो बोलल्याप्रमाणें काम फत्ते करून उलट निरोप सांगायाला राजवाड्याच्या गच्चीवर माघास येईलच. तर मगः—

साकी.

येथुनि आतां स्वस्थ मनसीं नगरामाजीं जावें ॥
नित्य-नियम तो सारुनि मग त्या राज-कार्यि

वर्तावें ॥ योग्यचि हें गमतें ॥ जावें झडकरि कीं परतें ॥ १ ॥

(जातो.)

प्रवेश ४ था.

स्थलः—उपवन.

पात्रें:—दमयंती. तिच्या दोघी सख्या (केशिनी व चंपककलिका) आणि हंस.

(पडदा उघडतांच.)

केशिनी व चंपककलिकाः—(दमयंतीस)

पद—(चालः—जाऊं कामाला)

उपवन-शोभा ही ॥ किती तरि रम्य सखे बाई ॥ ध्रु० ॥

केशिनीः—द्राक्ष-वेलि-आम्रादिक-तरु हे, सु-फलित बघ झाले ॥ कसे ग ॥

चंपककलिकाः—जाइ-जुई-मोगरा-चमेली, बकुल-वृक्ष फुलले ॥ सखे ग ॥

केशिनीः—भुलुनि सु-वासा मधु-पानीं हे भ्रमर-वृंद रमले ॥ पहा ग ॥

चंपककलिकाः—मंद-वायु हा सुटुनि सु-गंधित रमवी मन अपुलें ॥ कसें ग ॥

केशिनी व चंपककलिकाः—प्रमदा वन किति हें खुललें ॥ उपवन० ॥ १ ॥

दमयंतीः—सख्यांनो, तुह्मीं प्रमदावनाचें इतकें वर्णन केलें खरें, पण मला तर उलट यापासून दुःखच होत आहे!

केशिनी:—तें कां? तुला आराम व्हावा म्हणून तर येथें आणली, आणि तूं ह्मणतेस मला यापासून दु:ख होत आहे! तर मग अशा कोणत्या दु:खांत आहेस तें मोकळ्या मनानें सांग पाहूं.

दमयंती:—ब्राह्मणाच्या मुखानें त्या भाग्यशाली नलराजाचें हृदयंगम वर्णन ऐकल्या दिवसापासून:—

पद्य—(चाल:—पाहुनी मुखचंद्र)

नावडे मज कांहिं ग ॥ सुख-भोग साच मुळीं गडे ॥ चैन तें तिळ नाहिं ग ॥ चित्तासि मोह पहा जडे ॥धु०॥ वर्णिलें द्विजिं ह्या नला ॥ नृप-दैवशालि सु-मूर्तिला ॥ त्या भू-पती-चरित्तामृतीं॥ मन वेधलें झणिं बापुडें ॥ नावडे० ॥१॥ संयमी जरि मी मना ॥ परि लेश शांत राहिना ॥ दृढ नैषधीं सखि गुंतलें ॥ नृप दृष्टिला कधीं पडे० ॥२॥

चंपककलिका:—हं, आतां आलें लक्ष्यांत! तरीच बाईसाहेबांच्या मनाला दोन दिवसांपासून अस्वस्थता आहे. पण या गोष्टीचा इतका ध्यास घेतल्यानें काय होणार? गडे दमयंती, तूं शहाणी आहेस, ईश्वरावर हवाला ठेवून स्वस्थ रहा; ह्मणजे तोच तुझे मनोरथ पूर्ण करील.

दमयंती:—असा आनंदाचा दिवस येवो व तुझ्या तोंडांत साखर पडो.

केशिनी:—अस्सं काय? एकूण आपण त्या निषधपति नलराजाच्या राणीसाहेब होणार तर? व असें झाल्यावर बाईसाहेब, या बालमैत्रिणींची ओळख राहीलना?

दमयंती:—(हंसून.) तुझा नेहमीं, थट्टेखोरच स्वभाव आहे. कशाला कांहीं पत्ता नाहीं, तों झाला तुझ्या थट्टेला आरंभ.

(इतक्यांत हंसपक्षी उडत येतो त्यास पाहून:—)

चंपककलिका:—अगबाई ! हा पाहिलास कां पक्षी सोन्यासारख्या कांतीनें झळकत असून इकडेच येत आहे.

(हंस दमयंतीनजीक येतो.)

ह्य पहा ! अगदीं तुझ्याजवळ आला !

दमयंती:—चंपककलिके, खरेंच गडे, असा अपूर्व पक्षी पूर्वीं कधींच पाहिला नाहीं:—

पद.

किति नयन रिझवी सखे बाई ग ॥ध्रु०॥ किति-
तरि रमणिय तनु याची ही ॥ गमते कनकासम
मज पाहीं ॥ हळु हळु गमना कैसा करितो ॥
पायीं ग ॥ १ ॥ मज जवळी हा बघ किति
आला ॥ झडकरि धरितें, सखये याला ॥ ठेवुनि
पिंजऱ्यामधिं गमतीला ॥ खेळुं ग ॥ किति० ॥ २ ॥

केशिनी:—हा हातीं आला तर खरोखरच मोठी मौज होईल. पण:—

पद.

हा करीं कसा तव येई ॥ न कळे ग ॥ न कळे
मजला सखि बाइ ग ॥ध्रु०॥ ही पक्षिजात सखि
पाहीं ॥ बहु चपल खरोखर राही ॥ तव यत्न
व्यर्थची जाइ ग ॥ हा करीं ॥ १ ॥

चंपककलिका:-

तूं धूर्तपणा जरि करिशी या पक्ष्या धरुं क्षणीं
ह्मणशी ॥ तुज फसविलपाहुनि मोहिं ग ॥

केशिनीः—हा करीं तव येई ॥ २ ॥
दमयंतीः—हा स्थीर कसा बघ बसला ॥ आतांचि
धरीतें याला ॥ संशया धरीं नच काहिं गे ॥
केशिनीः—हा करीं कसा तव येई ॥ ३ ॥
दमयंतीः—पहा तर आतां मी याला धरलाच !

(असें ह्मणून हंसाजवळ जाते, तोंच हंस दूर सरून तिला चाळवीत चाळवीत सख्यांपासून बऱ्याच अंतरावर नेतो. नंतरः—)

पद—(चालः—परि शिवा न लावी.)

हंसः—नृप-सुते न येई तव हातीं ॥
दमयंतीः—बघ अतांचि धरितें त्वरित-गतीं ॥ ध्रु० ॥
हंसः—उगाच कष्टी कां तूं होशी ॥
दमयंतीः—करिशि वंल्गना फार ॥
हंसः—न येई तव हातीं ॥
दमयंतीः—बघ अतांचि धरितें त्वरित-गतीं ॥ १ ॥
हंसः—शक्य न धरणें मज हंसाला ॥
दमयंतीः—काय तुझारे भार ॥
हंसः—न येई तव हातीं ॥
दमयंतीः—बघ अतांचि धरितें त्वरित-गतीं ॥ २ ॥
हंसः—श्रमलिस वाटे सु-मुखि खरोखर ॥
दमयंतीः—फसविशि यांत न सार ॥
हंसः—न येई तव हातीं ॥
दमयंतीः—बघ अतांचि धरितें त्वरित-गतीं ॥
हंसः—शिण उगाच न करीं जा परती ॥ ३ ॥

अग, व्यर्थ श्रम करण्यांत काय अर्थ ? आह्मी मानससरोवरवासी हंसपक्षी कधीं तरी तुह्मां मानवांच्या हातीं लागूं काय ? फक्त नुकताच काल मात्र निषधपति नलराजाच्या हातीं फसगतीनें लागलों होतों.

दमयंती:—(नलराजाचें नांव श्रवण करितांच आनंदित होऊन) तो रे कसा? तेथें तूं कशाला गेला होतास?

हंस:—(स्वगत) पहा, नलराजाचें नांव घेतांच हिची कळी कशी आनंदानें खुलली! यावरून हिच्या मनावर नलराजाविषयीं प्रेमसंस्कार झाला आहे ह्मणायचा! (उघड) दमयंती, आह्मीं कांहीं हंस आकाशमार्गानें गमन करीत असतां नलराजाच्या सुंदर उपवनांतलें अतिशय रम्य असें सरोवर अवलोकन केलें; व त्यांत क्रीडा करण्याकरितां सहज उतरलों. नंतर अतिशय क्रीडा केल्यामुळें थकून, मी त्या सरोवराच्या कांठीं गाढ निद्रिस्त झालों. त्याच समयाला नलराजा उपवनांत विश्रांतीकरितां आला होता, त्यानें मला युक्तीनें धरिलें. तथापि मी त्याची विनवणी केल्यावर त्यानें मला सोडिलें. अहाहा! नृपसुते, तो नलराजा किती सुंदर आहे ह्मणून सांगूं! केवळ साक्षात् मदनच! तुझेंहि सौंदर्य अप्रतिम असून, तूंहि साक्षात् रतीच आहेस. तर मग तुह्मां दोघांचा जोडा जमल्यास किती बहार होईल?

दमयंती:—(हंस-भाषणानें मोह पावून) हंसा, तुझें गोड भाषण ऐकून मला फार आनंद होतो. त्या नलराजांची कीर्ति माझ्या कानांवर या पूर्वींच ब्राह्मणाच्या मुखानें आली आहे. (लज्जायुक्त) व तेव्हांपासून मी आपलें मन त्यांच्या चरणीं अर्पण केलें आहे. मात्र माझ्याकरितां तूं त्यांच्याकडे जाऊन, माझा निरोप त्यांला सांगशील, तर मी तुझी जन्मभर आभारी होईन.

हंसः—दमयंती, प्रेम ही वस्तु जगांत खरोखरच अजब आहे ! नुसत्या सौंदर्यगुणवर्णनावरूनच तूं व नल परस्परांवर अनुरक्त झालां आहांत ! यावरून प्रेम हें कोठें, केव्हां व कसें जडेल याचा नियम नाहीं. प्रेमी व्यक्ति जरी परस्परांहून अति दूर असल्या, तरी त्यांच्या अंतःकरणाचा ओढा सतत एकमेकांकडे वाहत असतो. अशांतलाच तुझा व नलाचा प्रकार दिसतो. बरें, सांग कोणता निरोप आहे त्या नलाला ?

दमयंती:—हंसा, बोलण्यांत बराच कीं रे चतुर आहेस. असो;—

पद—(चालः—सुखाशा)

नृपा त्या सांग हंसा, दासि ही तुझी ॥ जहाली
भीमकी, अर्पीच प्राणा जी ॥ ध्रु० ॥ सदा चिंती,
मनीं मूर्ती, अपूली जी॥ करी प्रेमा मनीं होऊनि
ही राजी ॥ १ ॥

हंसा, जेणेंकरून त्यांच्या चित्तांत माझी मूर्ति बिंबून ते मला वरितील, असें चातुर्य वापर; जास्त काय सांगूं ?

हंसः—ठीक आहे, मी तुझा निरोप आनंदानें त्याला कळवितों.

दमयंती:—बरें, पण एकवेळ माझ्या हातीं येऊन मला भेट तर खरा.

हंसः—हा पहा, मी तुझ्याजवळ आलों. (जवळ येतो.)

दमयंतीः—(हंसाला कुरवाळून):—

पद.

उपकृती करीं या क्षणीं ॥ तव सखी मला मा-
नुनी ॥ध्रु०॥ कथीं बहु विमल, नृपा-पदिं सकल,
निरोप प्रांजल, गड्या त्वरें जाउनी उपकृती० ॥
॥ १ ॥ सख्या तव चरणिं, नती करि ह्मणुनि,
प्रसन्न होउनि, करीं कृपा तूं क्षणीं ॥

हंसः—दमयंती, तूं कांहीं चिंता करूं नकोस; मी आतांच त्या नलाकडे जाऊन तुझा निरोप त्याला कळवितों; व तुझ्या मनाप्रमाणें योग घडवून आणितों. बरें पण, असें झाल्यावर या गरीब हंसाला काय बरें देणगी देशील?

दमयंतीः—अगोदरच तुझा सुवर्णाचा देह, व त्यांतून तूं मानससरोवरवासी हंस, तुला आह्मी क्षुद्र मानवांनीं काय देणगी द्यावी?

हंसः—कां? असा अनुदारपणा कां दाखवितेस? तुझ्याजवळ देण्याला कांहींच का वस्तु नाहीं?

दमयंतीः—मला तर आठवत नाहीं. सांग कोणती ती?

हंसः—बंधुप्रेम हीच देणगी पाहिजे. या गरीब हंसाची निरंतर स्मृति राहवी ह्मणजे झालें.

दमयंतीः—अरे, हें का सांगायला पाहिजे? तुझी अखंड स्मृति राहील बरें.

हंसः—नाहीं ह्मटलें, जगाची रीत आहे कीं, कार्य झालें ह्मणजे उपकार-कर्त्यांची स्मृति नष्ट झालीच! तसें होऊं नये ह्मणून सहज सुचविलें. असो, हें विनोदाचें

भाषण बरें; येतों आतां. (उडून जातो.)

(सख्या येतात.)

चंपककलिकाः—सखे, लागला का हंस हातीं ?

दमयंतीः—हो, हातीं लागला व त्याला निरोपहि दिला. चला तर आतां परत महालांत जाऊं.

केशिनीः—थांब, पण "त्याला निरोपहि दिला" यांतला भावार्थ "त्याच्या हातीं प्रियकराला निरोप दिला" असाच ना ?

दमयंतीः—हं, कर थट्टा ! तुझ्या थट्टेप्रमाणेंच केलें बरें.

चंपककलिकाः—तें कसें काय ?

दमयंतीः—(दोघी सख्यांचे हात धरून):—

पद.

प्रेषियलें मीं हंसा हातीं, नाथा संदेशा॥ प्रभु पदिं करि विनती, येवो करुणा जगदीशा ॥ ध्रु० ॥ अर्पियलें मीं पंच-प्राणा ॥ निषध-पती त्या नल-नृपचरणां॥ त्याविण अन्य न वरिंच सख्यांनो॥

(दोघी सख्याः—) सफल होउ आशा ॥ १ ॥

(पडदा पडतो.)

अंक १ ला समाप्त.

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

(प्रसंगीं गाळण्यालायक)

स्थलः—दमयंतीचा महाल.

पात्रेंः—दमयंती, (मंचकावर) चंपककलिका व केशिनी (जवळ उभ्या.)

केशिनीः—गडे दमयंती, तूं फारच अस्वस्थ दिसतेस !:—

पद—(चालः—अंकित पदांबुजाची दासी.)

सखये किती मनीं झुरशी ॥ शांतता तिळ न चित्तासि ॥ ध्रु० ॥ जागृति, स्वप्नीं, शयनीं आसनिं ॥ चिंतिसि नल-भूपासि ॥ सखये० ॥ १ ॥ प्रभु-सत्तेनें पुरतिल हेतू ॥ ठेविं मनीं धैर्यासि ॥ सखये० ॥ २ ॥

दमयंतीः—सखे काय करूं ?

पद—(देस.)

हाय ! हाय ! तिळहि नाहिं सौख्य या जिवाला ॥
धैर्य लाज सकल गेलि, बाइ मम लयाला ॥ध्रु०॥
मन्मथ मज विकल करी, मारुनी शराला ॥ येइल दिन मंगल कधि वरिन त्या नलाला ॥ १ ॥

चंपककलिकाः—अग, अशी अधीर होऊं नकोसः—

पद—(चालः—मज सौख्य गडे)

त्यजिशि काय धैर्य अशी होशि घाबरी ॥ सूज्ञ चतुर असुनि कशी अधिरता वरी ॥ ध्रु० ॥

ठेवि, मना शांत तुला सांगु किति तरी ॥
होतिल, तव हेतु पूर्ण सु-धृति तूं वरीं ॥ १ ॥

दमयंतीः—दुसऱ्याला शहाणपणाच्या गोष्टी पुष्कळ सांगतां येतात, पण त्यांतलें मर्म अनुभवी मनुष्यालाच माहित!:—

पद—(चालः—शांति धरा नृपराज)

असला कोणि सु-जाण ॥ सखये पावतसे अज्ञान ॥ समय विशेषीं जाण ॥ सखये० ॥ ध्रु० ॥
मोह-बंधनीं दृढतर गुंतुनि होत असे नादान ॥
सूज्ञपणा तो सर्व विसरुनि हरपत त्याचें भान ॥
सखये० ॥ १ ॥ शून्य-वृत्ति तो होउनि अंतरिं
होत असे हैराण ॥ तन्न्यायें मी निषधपतीचें,
करित असे ग ध्यान ॥ सखये० ॥ २ ॥ स्वाधिन
माझ्या मुळिं मन नाहीं, तुझिच गडे ग आण ॥
अर्पियलें मी नल-नृपतीसी, माझे पंच-प्राण ॥
सखये० ॥ ३ ॥

तर गडे, या न्यायानें माझ्याकडे काय बरें दोष आहे?

केशिनीः—खरेंच, ताईसाहेब आपलें ह्मणणें अगदीं योग्य आहे. त्या कुसुमायुधानें आपल्या शरसंधानांतून कोणाला तरी मोकळें सोडिलें आहे काय? मी मी ह्मणविणारे तपोनिधिहि ज्याच्या मोह-पाशांत जखडले गेले, तेथें आपणासारख्या अबलांचा काय पाड बरें?

चंपककलिकाः—खरेंच गडे, केशिनीचें भाषण लक्ष्यांत घेतलें तर, तुझ्याकडे तिळमात्र दोष नाहीं. याला प्रमाण, प्रत्यक्ष दैत्यगुरु शुक्राचार्य यांची कन्या देवयानी, ही मोठी ज्ञानी असूनहि गुरुपुत्र कचाच्या प्रेमपाशांत सांपडली! अशींच आणखीही कित्येक

उदाहरणें घडलीं आहेत. तेव्हां तुला एकटीलाच काय ह्मणून दोष द्यावा ? पूर्वीपासून असेंच घडत आलें आहे. मात्र होतां होईल तोंपावेतों मनाचें आकलन करणें कांहीं वावगें नाहीं.

दमयंतीः—हें मला समजतें, पण आतां मन माझ्या स्वाधीन नाहीं, याला काय करावें ? बरें, पण त्या ब्राह्मणानें जसें त्या सुमूर्तीचें माझ्यापाशीं वर्णन केलें, तसें माझेंहि वर्णन त्यांच्याजवळ केल्याचें, व तें ऐकून तिकडलीहि चित्तवृत्ति एकाग्र झाल्याचें तो सांगत होता. त्याचप्रमाणें त्या पक्षीराज हंसानेंहि कबूल केल्याप्रमाणें, त्यांच्याकडे जाऊन माझा आशय त्यांना कळविलाच असेल. तर मगः—

पद—(चालः—तेथेंच उभी कीं आलें)

मज समान त्या नृप-हृदयीं ॥ लागेल ध्यास स-खि बाई ॥ खचित का ॥ध्रु०॥ मन्मूर्ति तन्मनीं पाहीं ॥ प्रीतिनें बिंबुनी राही ॥ खचित का ॥ मज समान पडतिल मोहीं, कुसुमायुध तापद होई ॥ खचित का ॥ (चाल) सदुपाय योजितिल काय, दावितिल पाय, विरह तो जाई ॥ ऐसा दिन कधि तरि येई ॥ खचित का ॥ १ ॥

केशिनीः—गडे दमयंती, त्या नृपाचीहि स्थिति तुझ्यासारखीच झाली असली पाहिजे. हें निश्चयात्मक समज. ह्मणून ह्मणतेंः—

पद—(चालः—होइ मला अपशकुन)

शंकित मानस कां ॥ सखे तव ॥ त्वत्सम मोहित होइ तव सखा ॥ ध्रु० ॥ द्विज-हंसा-मुखिं तव

वृत्तांतें ॥ ऐकुनि तुजसम नृप येथे का ॥ १ ॥ त्वत्प्राप्तीस्तव तो सदुपायीं ॥ असेल खचितचि सोडिं कु-शंका ॥ २ ॥

चंपककलिकाः—सखे, बोलतां बोलतां किती तरी रात्र झाली! माझ्या बाई डोळ्यावर झोंप आलीः—

पद.

रजनि पहा ग किति तरि झाली ॥ सकल शांतता ही पसरली ॥ ध्रु० ॥ निश्चय ठेवुनि हृदयीं पुरता ॥ निद्रा शांतपणें घे आतां ॥ समजे तव मनिषा पुरली ॥ १ ॥

प्रवेश २ रा.

स्थलः—दिवाणखाना.

पात्रें:—भीमक, राणी, केशिनी, चंपककलिका व दासी.

भीमकः—(राणीस) प्रिये,:—

पद—(चालः--रामराय राज्याचा)

दुहिता ज्यांच्या उदरीं येते, चिंता ती त्यांला ॥ निशिदिनिं हृदया पोळवि, पावति तिळ नच सौख्याला ॥ ध्रु० ॥ लालन-पालन करुनी प्रेमें, वाढविती तनयेला ॥ बाल-क्रीडा बघुनी किंचित् मानिति हर्षाला ॥ १ ॥ तों शुक्लेंदूसम ती पावे, तिळ तिळ वृद्धीला ॥ उपवर होतां वर-चालनिं ते कष्टचि मातापितरांला ॥ २ ॥

प्रिये, वरचालना करण्यांत तरी मातापितरांना थोडे का कष्ट आहेत?:—

पद—(चालः—जलधर-संगें)

सद्वंशीं जो घे जननासी ॥ विद्या-भूषित, सद्गुण-
राशी ॥ ध्रु० ॥ सुंदरता ही ज्यास असावी ॥
लक्ष्मी ज्याच्या गृहिं बिलसावी ॥ सत्कीर्ती
ज्याची पसरावी ॥ ऐसा योग्यचि वर दुहितेसी ॥१॥

राणीः—बेरें, पण इतकेंहि असून, घरचीं वागविणारीं माणसें सज्जन असलीं पाहिजेत नाहीं बरें ?

भीमकः—हो, हेंहि अवश्य; तसेंच त्यांच्या हाताखालीं सज्जनतेनें वागून, त्यांची प्रीति संपादन करणें हें स्नुषेलाहि अवश्य; पणः—

पद—(चालः—निजभख रक्षाया)

पति-गृहिं जातां ती ॥ लाडकि दुहिता ॥ संको-
चित चित्तीं ॥ लाडकि दुहिता ॥ ध्रु० ॥ श्रेष्ठ
प्रथम ती सासू तिची ॥ स्नुषा-वर्तनिं यो-
ग्यचि प्रीतीं ॥१॥ श्वशुरां, दीरांला सदाही ॥
जावा-नणदांला ॥ सदाही ॥ प्रियकर व्हावी ऐशी
वर्ते ॥ धन्य तरीच कीं तनया जगतीं ॥ २ ॥

प्रिये, अशा प्रकारानें कन्येबद्दल मातापितरांना किती तरी काळजी असते ! आपण तरी प्रस्तुत अशाच प्रकारच्या काळजींत आहोंत ना ? आपली कन्या दमयंती ही आतां बरीच उपवर झाली असून, तिला अनेक भूपांकडून मागण्याही पण आल्या आहेत. तेव्हां आतां पूर्वापार चालत आलेल्या स्वयंवर विधीनें तिच्या विवाहाची तयारी केली पाहिजे नाहीं बरें ?

राणीः—हो, मी तरी हीच गोष्ट काढणार होतें. कारण, अलीकडे दमयंती ही या गोष्टीविषयीं झुरत आहेशी दिसते. जेव्हां पाहवें तेव्हां तिचा चेहेरा

अगदीं उदासीन दिसतो. तिच्या सख्यांला याबद्दल विचारलें पाहिजे.

भीमकः—असें काय? तर मग त्या सख्यांला आतांच येथें बोलावून आणून, खुलासा काढणें योग्य दिसतें.

राणीः—ठीक आहे, त्यांला बोलावते. कोण आहे ग तिकडे?

दासीः—जी बाईसाहेब,

राणीः—अग, केशिनीला व चंपककलिकेला या क्षणीं येथें घेऊन ये.

दासीः—ही पहा आतांच घेऊन येतें. (जाऊन दोघींना घेऊन येते.)

भीमकः—(त्यांना पाहून) कायग, चंपककलिके केशिनी, दमयंतीची अलीकडे स्थिति बरोबर दिसत नाहीं, याचें कारण काय बरें असावें?

चंपककलिकाः—ऐकावें महाराज,:—

पद—(चालः—नंदगृहाच्या जवळ)

द्विज-मुखिं ऐकुनि नल-नृपतीचें, वृत्त मनोहर तें॥ सखिनें॥ध्रु०॥ मदन-मूर्ति त्या, अर्पियलें कीं, अपुल्या सु-मनातें ॥ सखिनें ॥ आसनिं, भोजनिं, शयनिं, विहारीं, स्व-मनीं जी झुरते ॥ निशि-दिनिं ॥ विरहाकुल ती सखि दमयंती, आह्मांसी दिसते ॥ खचितचि ॥ १ ॥

भीमकः—बरें, ही तिची स्थिति इतके दिवस तुह्मीं आह्मांला कां कळविली नाहीं?

केशिनीः—स्त्रीजातीला भूषणभूत अशा लज्जेचा त्याग करून, एकाकीं ही गुह्य गोष्ट आपल्या कानांवर घालण्याचें, आह्मांला धैर्य होईना; ह्मणूनच मुग्ध राहणें भाग पडलें! याबद्दल महाराजांनीं क्षमा करावी. पण आतां महाराजांच्या चरणांजवळ माझी एक विनंति आहे.

भीमकः—ती कोणती ?

केशिनीः—

पद—(चालः—आ मानवनो अभिमान)

अहो तो निषध-पती-नलराज सद्गुणी येथ आ-णावा ॥ सुता-दमयंती-मनिं विरहासि शमवुनी तोष तो द्यावा ॥(अंतरा)॥ लग्न-समारंभातें करुनी, प्रियकर त्या अर्पावि सुता ॥ होइल प्रमुदित अ-पुली दुहिता, सौख्य-लाभ नच या परता ॥ योग्यचि हा सदुपाय ॥ सत्वरीं येथ आणावा ॥ भूपती ॥ १ ॥

॥ दोहरा ॥

हीच विनंती अपुलया चरणीं आजि करी महा-राज ॥ प्रेमें मान्य करुनिया, साधा दुहिता-काज ॥ अहो० ॥ २ ॥ केला स्व-मनें पसंत जिनें यो-ग्यचि अपणा कांत ॥ तोचि असे अनुरूप तिये-ला, अर्पावी निभ्रांत ॥ अहो० ॥ ३ ॥

भीमकः—ऐकलेंस का केशिनी काय ह्मणते तें ? पण, असें करण्यांत पुष्कळ अडचणी आहेत. कारण, अनेक बलशाली नृपतींनीं तिची मागणी केली आहे. तेव्हां स्वमनानें नलालाच तिला अर्पण करण्याचा विचार योजिल्यानें इतर नृपतींशीं वैरभाव उत्पन्न

होऊन, लग्नांत विघ्नहि येणार. ह्मणून क्षात्रकुलाला योग्य अशा स्वयंवर विधीचेंच अवलंबन करणें योग्य दिसतें. झाला, निश्चय हाच कायम. तर मगः—

पद—(चालः—परम सुवासिक)

आतां करणें स्वयंवराची योग्य तयारी त्वरि ती ॥ मंत्री-कुल-गुरु-सु-विचारानें, शोधावा सु-मुहूर्त अति ॥ ध्रु० ॥ कुंकुम-मंडित लिहुनि प-त्रिका प्रेषाव्या नृप-गणिं सु-रितीं ॥ विस्तृत ऐशा लग्न-मंडपा, उभवावें कीं रम्य कृतीं ॥ १ ॥

विविध-देशिंचे रूपवंत गुणि येतिल बल-शाली नृ-पती ॥ प्रभु-सत्तेनें नल-राजा तो, त्यांतचि परणू दमयंती ॥ २ ॥

प्रवेश ३ रा.

स्थलः—रस्ता.

पात्रेंः—इंद्र, वरुण, अग्नि, यम व नल.

इंद्रः—हे वरुण—अग्नि—यमादि हो, मुनि नारदानें स्वर्गलोकीं सभेमध्यें त्या लावण्यलतिका दमयंतीचें वर्णन केल्यामुळें, आपण चौघेहि देव तिच्या स्वयंवरार्थ चाललों आहों. आपणांप्रमाणेंच भूमंडलावरील अनेक राजेहि त्या ठिकाणीं जमतील, पण आपणां देवांपुढें त्यांचें तेज किती ? बरें, पण आपणां चौघांतून ती ज्याला वरील, तोच धन्य ह्मणायचा !

(दुरून नलराजा येत आहे त्यास पाहून)

अहो, पण तो पाहिलात का तिकडून तेजःपुंज प्रत्यक्ष मदनच कीं काय असा एक मनुष्य येत आहे.

त्याच्या अप्रतिम तेजावरून व थाटावरून तो कोणी तरी भूपति असून, आपणांप्रमाणेंच स्वयंवराला जाण्याला निघाला आहेसा दिसतो.

वरुणः—हो, खरेंच, त्याच्या तेजापुढें आपण प्रत्यक्ष देव असूनहि आपलें तेज फिक्कें दिसतें.

अग्निः—अहाहा! काय त्याचें रूप! सौंदर्याची केवळ मूसच ओतली आहेशी दिसते.

यमः—तो विशालबाहु किती शांत व गंभीर मुद्रेचा दिसत आहे! या भूतलावर खरोखरच हें एक अमोलिक रत्न आहे! या रत्नाला टाकून, ती सौंदर्यशालिनी दमयंती, इतराला वरील ही आशा स्वप्नींहि बाळगायला नको!

इंद्रः—माझीहि मनोदेवता अशी सांगते. पण थांबा, मी अशी युक्ति योजितों कीं, त्याच्याच द्वारानें आपलें कार्य सिद्धीला जावें. (इतक्यांत नल येतो त्यास पाहून) राजा, थांब, तेजानें साक्षात् मदनच, असा तूं कोणत्या देशाचा राजा आहेस? व तुझें नामाभिधान काय?

नलः—महाराज, मी निषधदेशचा राजा असून, माझें नामाभिधान नल असें आहे. बरें, पण आपणां चौघांच्या अलौकिक तेजावरून आपण मानवी प्राणी नसून, स्वर्गलोकीं वास्तव्य करणारे साक्षात् देवच आहांत असा माझा तर्क होतो.

इंद्रः—तुझा तर्क खरा आहे. ऐकः—

॥ साकी ॥

शचि-पति मी प्रत्यक्ष सुराधिप इंद्र, दुजा हा
वरुण ॥ तिसरा हा बघ अग्नि असे कीं, चवथा
यम हा जाण ॥ देवचि अह्मि चवघे ॥ समजुनि
चित्तीं नीटचि घे ॥ १ ॥

नलः—असें काय महाराज? तर मग मी आपणां सर्वांला अभिवंदन करितों.

चौघे देवः—कल्याण असो.

नलः—मला एक विचारावेंसें वाटतें.

इंद्रः—खुशाल विचार.

नलः—आपण कोणत्या उद्देशानें या भूतलावर आलां आहां?

इंद्रः—ऐक:—

पद—(चाल:—पंचतुंड)

भीमक-तनया-दमयंती जी स्वरुप मनोहर रति
दुसरी ॥ लक्ष्मीसम जी त्या सु-मुखीच्या स्वयं-
वरासी नृपति करी ॥ ध्रु० ॥ ऐसें नारद-मुखि
ऐकुनिया, परिणय-इच्छा हृदयिं खरी ॥ उपजु-
नि आह्मी चवघे देवहि आलों राया अवनिवरीं ॥१

म्हणून आमचें एक तुझ्याशीं काम आहे.

नलः—माझ्याशीं काम? हें काजव्याला सूर्यानें कामगिरी सांगण्यासारखें आहे!

इंद्रः—तूं आपणाकडे लघुता घेत आहेस हें तुला भूषणावहच आहे. पण कधीं कधीं लहान वस्तुच मोठ्याच्या उपयोगीं पडतात. चक्षुरिंद्रियें लहानच असून, तींच शरीरव्यवहार चालवितात. त्याप्रमाणेंच या वेळीं तूं आह्मांला चक्षुरूप हो.

नलः–अरें, पण असें कोणतें कार्य आहे तें तर सांगा.

इंद्रः—बजावण्याविषयीं वचन देशील तर सांगतों.

नलः—महाराज, सुज्ञानें विचार केल्यावांचून वचन देऊं नये; कधीं कधी तें कंठाशीं येतें.

इंद्रः—पण कधीं कधीं समोरच्या व्यक्तीचा श्रेष्ठपणा लक्ष्यांत आणून अगोदरहि वचनबद्ध व्हावें लागतें.

नलः—छेः, पण विचारशील व पाणीदार पुरुष असें वर्तन करणार नाहींत.

इंद्रः—(रागानें) दुराग्रह धरूं नकोस. तुला वचन दिलेंच पाहिजे.

नलः—ठीक आहे, आपल्या आग्रहास्तव वचन देतों. हें घ्या वचन. (हातावर वचन देतो.)

इंद्रः—ऐक तरः—

पद—(चालः—कवणें तुज)

दूतपणा स्वीकारुनि आमुचा झणीं॥ जा, रमणी दमयंतीपाशिं या क्षणीं ॥ ध्रु० ॥ निर्भयपणिं एकांतीं तिजसि गांठुनी ॥ वर्णुनिया आह्मांतें रिझवि ती मनीं॥ (अंतरा) मधुर अशा वचनातें ॥ चतुरपणें वद तेथें ॥ आह्मांतुनि एकातें ॥ वरिल साच सु-दती ते ॥ साधीं हें कार्य नृपा त्वरित जाउनी ॥ १ ॥

नलः—माझ्यासारख्या नृपतीला आपण हें दूतपणाचें केवळ अप्रशस्त काम सांगितलें. हें बजावण्याला मी असमर्थ आहें ! कारणः——

पद—(चालः—फेंकुनिया सौगंधित चूर्णा)

ठेवितसें आशा मनिं मोठी, सुंदरीसि झणिं वरण्याला ॥ मज सत्यचि रमणी रुचली ती, करितों

ह्मणुनी गमनाला ॥ ध्रु० ॥ अशा समयिं मज दूत योजितां ॥ न योग्यचि मीं या कार्याला ॥ हानि साच ही पुरुषार्थी किर्ति, लाज अहो सुर गमत मनाला ॥ १ ॥

इंद्रः—अरे, वचन देऊन आतां भंगाला प्रवृत्त होतोस, याला काय ह्मणावें ? वचनाकरितां स्वार्थत्याग हा केलाच पाहिजे. नाहीं पेक्षां आमच्या कोपाला पात्र होशील !

नलः—(विचारांत पडून, स्वगत) पहा, मी मोठ्या उत्कंठेनें त्या सुंदरीच्या स्वयंवरार्थ जात असून, ती हंसवचनानुसार मलाच वरील, अशी महदाशा बाळगित होतों; तों दैवदुर्विलासानें मध्येंच हें विघ्न प्राप्त झालें ! असो, ईश्वरी इच्छा ! या देवांच्या इच्छेला मान दिल्याखेरीज गत्यंतरच नाहीं. (उघड) ठीक आहे महाराज, मी माझा हेतु नष्ट करून, वचनाप्रमाणें आपलें दूतत्व स्वीकारतों; व त्या दमयंतीकडे जाऊन, ती आपल्यापैकीं कोणाला तरी वरील अशी युक्ति योजितों. पण सेवकांनीं रक्षित असलेल्या तिच्या अंतः-पुरांत माझा प्रवेश कसा होईल ?

इंद्रः—त्याची तुला कां काळजी ?:—

पद—(चालः—उद्यां बघ जातें)

करी नच चिंता ॥ अदृश्यपणा तुज आतां ॥ध्रु०॥ अर्पण करितों निर्भय जावें ॥ अंतःपुरिं त्वां संचारावें ॥ प्रकटुनि भाषण तिजसि वदावें ॥ रंजविं चित्ता ॥ योजीं सदुपायचि पुरता ॥ १ ॥

असो, आमचें कार्य करून येईपावेतों तुला आह्मीं इच्छेनुसार अदृश्यशक्ति अर्पण केली आहे; तर आतां

त्वरेनें तेथें जाऊन व मोठ्या कुशलपणानें कार्य साधून लवकरच आह्मांला तिच्या महालाबाहेर भेट कसा. तोंपावेतों आह्मीं महालाबाहेर गुप्तसंचार करीत आहोंत.

(चारी देव निघून जातात.)

नलः—

पद—(चालः—ये काल कसा विपरीत)

हा कोप किती जगदीश करी ॥ कशि जात लया मम आस खरी ॥ ध्रु० ॥ क्रीडा ह्वदिं मम करि दमयंती ॥ बहुत काल मी लुब्ध पहा ॥ हेतू अवचित विफल आजि हा ॥ अहा ! करीती देव तरी ॥ १ ॥

अरेरे ! ज्या सुंदरीकरितां मी रात्रंदिवस झुरत आलों, जिच्याकरितां आहारविहारादिकांताहि मन लागलें नाहीं, व जी नेहमीं माझ्या ह्वदयमंदिरांत वास करीत आली, ती प्राप्त होण्याचा प्रसंग आला असतां, अकस्मित् आपल्या पुढचें ताट स्वतःच्याच हातानें दुसऱ्यापुढें ठेवण्याचा शोचनीय प्रसंग यावाना? असो, मी तिच्यासमोर प्रगट होतांच, बहुधा असें घडल्याखेरीज राहणार नाहीं:—

पद—(चालः—कवणें तुज)

दर्शनींच लुब्ध होइ मजवरी सखी ॥ कोण कुठिल मज पुसेल नामही मुखीं ॥ ध्रु० ॥ निषधपती देव-दूत सांगतांचि कीं ॥ हसुनि त्या क्षणीं पडेल साच कौतुकीं ॥ १ ॥

अशा वेळेला माझी स्थिति कशी बरें होईल ? याची कल्पनाच होत नाहीं ! हारे दुर्दैवा ! तुझे खेळ

कोणालाहि समजायचे नाहींत. मनुष्याला सौख्यशिखरावरून खालीं लोटण्याला तुला यत्किंचित्‌ही वेळ लागत नाहीं.

पद—(चाल;—किति वानूं बल)

किति दैव मम फिरलें हें विलया गेलें कीं मम काज ॥ध्रु०॥ बनलों दूतचि विबुधांचा मी तद्गुणगायक आज ॥ शिष्टाई, सखि-पायीं, करुं काई, मन होई, शत-धा विदारण नृप-पाणि ही मज येई मोठी लाज ॥ १ ॥

असो, आतां घेतलेल्या सोंगाची संपादणी केलीच पाहिजे. (जातो.)

प्रवेश ४ था.

स्थलः—दमयंतीचा महाल.

पात्रें:—दमयंती, (मंचकावर) चंपककलिका, केशिनी व नल.

चंपककलिकाः—(दमयंतीला) सखे, मी व केशिनीनें बाबांच्या कानांवर तुझें वृत्त घातल्यानें, आजचा हा किती तरी आनंदाचा दिवस प्राप्त झाला! लग्नमंडपांत देशोदेशचे किती तरी राजे प्राप्त झाले आहेत! व नगरांत सर्वत्र आनंदी आनंद चालला आहे!

नलः—(पडद्यांत स्वगत) अमरेश्वरानें अर्पण केलेल्या अदृश्यशक्तीच्या प्रभावानें, दमयंतीच्या महालांत तर येऊन पोहोंचलों; पण सख्यांचा व तिचा संवाद चालला आहे, तेव्हां तो अमळ स्तब्धपणानें ऐकावा व योग्य अवसर पाहून चट्‌कन् प्रगट व्हावें.

केशिनीः—चंपककलिके, आतां मात्र लवकरच या (दमयंती) निषधपतींच्या राणीसाहेब होणार. तेव्हां बहुधा यांना आपला विसर लवकरच पडेल.

नलः—(पडद्यांत स्वगत) काय ? ही सखी तर मलाच अनुलक्षून बोलत आहे ! पण हिच्या ह्मणण्या-प्रमाणें दमयंती ही ' माझी अर्धांगी ' होणार ही आशा मात्र व्यर्थ ! कारण, मी देवदूत होऊन त्यांच्या-विषयीं बोलणें करायला आलों आहें. असो, यांचा हा प्रणयसंवाद आणखी पुढें ऐकावा.

दमयंतीः—हें ग काय केशिनी, नेहमीं आपलें खोंचून बोलायचें ! मी मागेंच नाहीं का सांगितलें, कीं तुह्मीं दोघीही माझ्या प्राणसख्या आहांत; तुमचा विसर मला कालत्रयीं पडणार नाहीं.

केशिनीः—आह्मी प्राणसख्या खऱ्या, पण प्राण-सखा मिळाल्यावर मात्र बाईसाहेब, या प्राणसख्यांची किंमत अंमळ कमीच ! समजलांत ?

नलः—(पडद्यांत स्वगत) ही केशिनी शब्दाची कोटि करण्यांत बरी पटाईत दिसते !

दमयंतीः—कर बाई थट्टा ! मी कांहींच उत्तर देत नाहीं.

केशिनीः—हं, आतांपासूनच अबोला धरायचा वाटतें !

नलः—(पडद्यांत स्वगत) वा ! केशिनी, तुझ्या शब्द-पेचाची कमाल झाली !

दमयंतीः—हें ग काय भेलें ? प्रत्येक शब्द तूं

आपली पेचांतच धरतेस! बोलावें तरी पंचाईत, न बोलावें तरी पंचाईत! तूं आपली बृहस्पतीसारखी शब्दालंकार करायला तयारच!

पद—(चालः—बघुनि त्या भयंकर)

रागावुं नको दमयंती॥ मी सहज बोललें बाई॥ मनिं अशी तिरस्कृति कां गे मागतें क्षमा तव पायीं ॥ध्रु०॥ मन-रंजन होण्या कांहीं॥ मी शब्दालंकृति पाहीं॥ बोलतेंचि लाडिकपणिं गे॥ त्यांत ना कपट सखि तिळही॥ १॥

दमयंतीः—(किंचित् हंसून) पाहिली, पुन्हां आणखी क्षमा मागायला तयारच!

नलः—(पडद्यांत स्वगत) ही या वेळची दमयंतीची किंचित् हास्ययुक्त मुद्रा किती हृदयंगम वाटत आहे!

चंपककलिकाः—बरें पण ताईसाहेब, ही चंदनाची उटी व पुष्पहार धारण करितां का?

दमयंतीः—छेः, हीं तर माझ्या दृष्टीसमोर मुळींच आणूं नका. प्रियकराचा मुखचंद्र अद्याप माझ्या अवलोकनांत न आल्यानें विरहाग्नीनें होणारा माझ्या आंगाचा दाह या नुसत्या वरकांतीं चंदनाच्या उटीनें, पुष्पहारानें किंवा गोड भाषणानें कसा बरें शांत होईल?

नलः—(स्वगत पडद्यांत) ही देवी बोलली हें अक्षरशः खरें आहे. विरही जनाला विलासाच्या वस्तु कशा बरें प्रिय वाटणार? याचा मला पूर्ण अनुभव आहेच.

चंपककलिकाः—कां? अनुराग असलेल्या मूर्तींची

प्राप्ति होण्याची वेळ आली, तरी अद्याप मनाची अधिरता जात नाहीं !:—

पद—(चाल:—पारिजातका निमित्त)

कां दमयंती सखये अझुनी झुरशी हृदयांतरीं ॥
झुरशी० ॥ रीत ही गमत न मजला बरी ॥ध्रु०॥
भीमक-जनकें स्वयंवराची केलि तयारी खरी ॥
केलि० ॥ त्यजिशि ना अझुनि उदासी दुरी ॥
होउनि हर्षित प्रफुल्लता ही स्व-मनीं तूं गे वरीं॥
स्वमनीं ॥ प्रार्थना करुं मी तुज किति तरी ॥
(अंतरा) तव हृदयिं वास करि जो कां निशिदिनीं॥ येईल निषध-पति तो गे नल म्हणीं॥ विश्वास गडे हा ठेवीं तूं मनीं ॥ परिणय-ग्रंथी तत्संगतिं तव पडेल तरि सत्वरी ॥ पुरवि गे हेतु तुझा श्रीहरी ॥ १ ॥

नलः—(पड्यांत—स्वगत) हा निषधपति प्रत्यक्ष येथें हजर आहे. पण हाय! उपयोग काय? या सखीच्या म्हणण्याप्रमाणें दमयंतीची परिणयग्रंथी याशीं पडणार हें मात्र वृथा! कारण, चौघे विबुधवर हिच्या पाणिग्रहणाची अपेक्षा करीत आहेत !

दमयंतीः—तूं म्हणतेस तें खरें आहे. पणः—

पद—(चाल:—उद्धवा शांतवन)

ऐकिलें न अझुनी बाई ॥ आला कीं प्राण-विसावा ॥ तो कमल-नयन-नल-नृपती ॥ कोठें तरि गुप्त असावा ॥ ध्रु० ॥ नृप सर्वहि जमले अझुनी ॥ त्यानें कां अंत पहावा ॥ (अंतरा) मन अधिर गडे बहु होई ॥ ती मदन-मूर्ति नयनांहीं ॥ केव्हां ग सखे मी पाहीं ॥ ऐशामाधिं तो नृप यावा ॥ मुखचंद्र दावुनी त्यानें ॥ विरहाग्नी तो शमवावा ॥१॥

असो, सख्यांनो, माझें चित्त बरेंच अस्वस्थ झाल्यानें मला थोडीशी विश्रांति घेऊं द्या. तोंपर्यंत तुह्मीं त्या महाभागाच्या शोधार्थ येथून जा कशा.

केशिनीः—ठीक आहे, चल चंपककलिके. (दोघी जातात.)

नलः—(पडद्यांत-स्वगत) हें सख्यांचें जाणें माझ्या पथ्यावरच पडलें ह्मणायचें ! आतां ही वेळ प्रगट व्हायला ठीक आहे ! (प्रगट होऊन):—

हे चारुगात्री, तुझें कल्याण असो.

दमयंतीः—(नलाचें अलौकिक तेज पाहून, चमकून मंचकावरून साश्चर्य दूर उभी राहते; व किंचित् वेळानें):—

पद - (चालः—नंदगृहाच्या जवळ)

कोण कुठिल तुह्मि कैसे आलां ॥ अवचित एकांतीं ॥ अशा या ॥ ध्रु० ॥ द्वार-पाल ते स-शस्त्र असुनी ॥ लंघियलें युक्तीं ॥ कवण्या ॥ कृत्य मानवी खचित नव्हे हें ॥ शंकित मी चित्तीं ॥ खरोखर ॥ यक्ष नाग कीं गंधर्वचि हो ॥ आहां सुर-मूर्ती ॥ सांगा ॥ १ ॥

नलः—तूं ह्मणतेस, त्यांपैकीं मी कोणीही नाहीं.

दमयंतीः—तर मग दिव्य तेजधारी असे आपण आहां तरी कोण ? कोणत्या कुलाला आपण भूषविलें आहे ? व आपलें नामाभिधान काय ?

नलः—सांगतों, ऐकः—

॥ झंपा ॥

जनन माझें नैषधीं, विख्यातशा त्या सत्कुलीं ॥
करित राज्या संप्रती, इच्छें प्रभूच्या भू-तलीं ॥

ध्रु० ॥ सकल जगतीं सुंदरी, नामें मला नल बोलती ॥ कीर्ति तूझी ऐकुनी मूर्ति मनिं या बिंबली ॥१॥ चित्र तूझें बिंब्रि त्या हंसैंहि हृदयीं रेखिलें ॥ दर्शनासि धांव गे त्यासाठिं चित्तें घेतली ॥ २ ॥

दमयंतीः—(लाजून आश्चर्यानें) काय? आपण निषधपति नलराज? तर मग ज्या सुमूर्तिला आजपर्यंत मीं हृदयांत पूजित आलें, तीच सुमूर्ति प्रत्यक्ष प्रगटली ह्मणायची!

नलः—कां बरें? माझ्या मूर्तीचें हृदयांत पूजन करण्याचें कारण काय?

दमयंतीः—कारण काय? प्रेम.

नलः—पण तें तरी कां उत्पन्न झालें?

दमयंती—आपल्या विमल कीर्तीनेंच तें उत्पन्न केलें.

नलः—पण अशा प्रकारें कुमारिकेनें विवाहा अगोदर एखाद्या अपरिचित व कधींहि न पाहिलेल्या पुरुषावर अकस्मित् प्रेम करणें हें शोभलें कां?

दमयंतीः—पण आपणाला तरी 'अशा कुमारिकेविषयीं अंतःकरणांत अभिलाषबुद्धि धारण करून हंसाला मध्यस्ती पाठविणें' शोभलें कां?

नलः—वाः! आपणच तर हंसाहातीं निरोप पाठविलात आणि आह्मांलाच अनुलक्षून बोलायचें!

दमयंतीः—पण अगोदर हंस आपल्यालाच भेटला होताना? तर मग त्याला मुद्दाम मजकडे बागेंत येण्याचें कारण काय बरें? दुसऱ्याच्या अंतःकरणावर

मोहजाल टाकायचें, आणि पुन्हां त्याचा छद्मीपणानें विनोद करायचा, हें सुज्ञपणाला शोभत नाहीं. बरें पण, या मंचकावर बसायचें.

नलः—छेः, मंचकावर बसतां येत नाहीं; व तूंहि या माझ्या मूर्तीचें हृदयांतून बिसर्जनच केलें पाहिजे.

दमयंतीः—ह्मणजे ? अशा कठोर शब्दांचा एकदम आघात तो कां ? यानें माझें काळीज अगदीं चर्रे झालें आहे. प्रियकरा, दर्शनींच अशी निष्ठुरता व्यक्त करण्याचें कारण काय बरें ? तुह्मीं या दासीचें मन तर पाहत नाहींना ? पुरुषांचा स्वभाव असतो कीं ते बायकांचें अंतःकरण तावून सुलाखून पाहत असतात !

नलः—छेः, देवी मी निष्ठुरता व्यक्त करीत नाहीं; तुझ्या कल्याणाचेच कांहीं शब्द सांगूं इच्छित आहें.

दमयंतीः—पण मला ते शब्द ऐकायला नकोत. हा असा एकाकीं प्रेमविपर्यास कां दृष्टीला येत आहे ? दर्शनींच अंत पहायचा विडा उचलला आहे वाटतें ?

नलः—छेः, सुंदरी, विडा कशाचा ? मी तुझा अंत पाहत नाहीं.

दमयंतीः—मुखानें ह्मणायचें "अंत पाहत नाहीं" व कृति मात्र तशी करायची ! या कपटी वर्तनाला काय बरें ह्मणावें ? महाराज, क्षमा करा व विनोद आवरा. ही दासी कायावाचामनानें आपल्या चरणीं भ्रमरीप्रमाणें लुब्ध आहे. हिला प्रेमानें 'आपली' असें ह्मणा.

नलः—शुभांगे, मला तुझ्या ह्मणण्याला रुकार देतां येत नाहीं. आतां मी निष्ठुरपणानें असें करितों

असा तुझा समज होऊं देऊं नकोस; मला दूतत्वनात्यानें या स्थलीं यावें लागलें आहे.

दमयंती:—या संदिग्ध भाषणानें मन फारच घोंटाळ्यांत पडलें आहे! आपल्या सारख्यानें दूतत्व स्वीकारून येथें येणें हें तर बाई फारच चमत्कारिक! सांगा बरें कोणाचें दूतत्व स्वीकारलें तें!

नल:—ऐकः—

पद—(चालः— नयन चिलन)

स्व-मनिं रमणि धरिलि बहुत तुझी सु-दति वांछा ॥ ह्मणुनि सु-मुखि आगमनची करीं परी मजसि मार्गिं ॥ पहा साच वरुण, इंद्र, अग्नीही तसा यम ॥ मजसि वचनिं गोंवितिच, कथिति त्वरित दासपणा ॥ १ ॥

याप्रमाणें त्यांनीं मला दूतकार्य सोंपून, अदृश्यताहि अर्पण केली. व त्याच प्रभावानें मी अशा एकांत स्थळीं निर्भयपणानें प्रगट झालों. दमयंती, स्वीकारलेल्या कार्यानुसारच मला तुझ्या मनाविरुद्ध उद्गार काढावे लागत आहेत. याबद्दल खेद वाटूं देऊं नकोस. कारण, यामुळें जरी दर्शनीं तुला वाईट वाटेल, तरी तूं चौघां देवांपैकीं कोणालाहि वरिल्यानें, तुला अमरत्व प्राप्त होऊन, तूं अक्षय्य सुखी होशील. ह्मणून तूं असेंच करः—

॥ दिंडी ॥

तपति बहुतचि ज्या इंद्र-पदा साठीं ॥
तया परणाया धैर्य धरीं पोटीं ॥
वरुण अथवा तो अग्नि तेजवंत ॥
वरीं किंवा यमधर्म तो कृतांत ॥ १ ॥

दमयंतीः—(किंचित् रोषानें) पुरे, आतां हें भाषण मला मुळींच रुचत नाहीं.:—

॥ पद. ॥

वच उरीं झोंबतें ॥ अपुलें ॥ या मूर्तीवीण मातें॥
अन्य न कोणी वाटत प्रिय तें ॥ध्रु०॥ इंद्र, अग्नि
यम, वरुण देव ते ॥ वांछिति मातें ॥ एक-मतें ॥
परी न त्यांतें प्रिया खचित मी अर्पी या वपुतें॥
खचित मी ॥ अपुलें० ॥१॥

प्रियकरा, ह्मणून आपल्याला सांगतें, त्या चारी देवांला माझा प्रणाम सांगून, कळवा कीं, दमयंतीनें या पूर्वींच मनानें नळाला वरिलें असल्यानें, तिची तुमच्या ठिकाणीं गुरुजनासमान पूज्यबुद्धि आहे. ह्मणून कोप न करितां प्रसन्न असां.

नलः—हे कुरंगनयने दमयंती, तूं आपला दुराग्रह सोड. कारण, माझ्या ठिकाणीं प्रेमभाव ठेविल्यानें तुला चिरसुख मिळणार नाहीं. जाणून बुजून हें मानवी शरीर क्षणभंगुर ! यापासून तुला सुख काय मिळणार ? व मिळालें, तरी तें अशाश्वतच ! हें मनांत आणूनच मी तुझ्याविषयीं विन्मुख होऊन, त्या देवांविषयीं शिफारस करीत आहें. कारण, त्यांत तुझें निरंतरचें कल्याण आहे. तर मग अद्याप नीट विचार कर. व चारी देवांपैकीं मर्जीनुरूप एकाला रुकार देच. (थांबून) कां ? कोणाला रुकार देतेस बरें ?

दमयंतीः—हें काय ? अजूनहि शब्दप्रहार आहेच ! महाराजः—

पद्—(चाल;—सदय हृदय)

दमयंती:-कठिण-वचन वदुनि नृ-पति शिणवुं नका दासी ॥ ध्रु० ॥

नलः—स्व-मनिं रमणि अझुनि सु-नय करिंच सौ-ख्य तूसी ॥

दमयंती:-अंत उगिच पाहुं नका प्रार्थि आपणांसी ॥

नलः—पुसति सु-कृति देव वचन वदुं मि काय त्यांसी ॥

दमयंती-झडकरि तुह्मि त्यांसि कथा स्पष्ट आशयासी॥

नलः—सु-दति वदति खचित विबुध स्वार्थि मज मनासी ॥

दमयंती—कठिण वचन० ॥ १ ॥

(नल सचिंत उभा राहतो.)

दमयंती:—कां महाराज, अझूनहि विचारांत कसूचे पडलांत ? मी आतां अगदीं खात्रीनें सांगतें:—

पद्—(चालः—मम जन्म-कथेला)

तनु अर्पियली ही ॥ अपुल्या पायीं ॥ मी वाहिं आण ॥ ध्रु० ॥ अन्या ठायीं ॥ मन न जाई ॥ अ-पुल्या पायीं ॥ मी वाहिं आण ॥

॥ दोहरा ॥

बंधू पितया सम मी मानी ॥ नाथा अन्य पुरूष ॥
(चाल) तिळ संशय नाहीं ॥ यांताचि कांहीं ॥
अपुल्या पायीं ॥ मी वाहिं आण ॥ १ ॥

नलः—(स्वगत) आतां काय करावें? इच्या दुराग्रहापुढें माझें कांहीं चालत नाहीं:—

पद्—(चालः—बिंबाधरा)

चंद्रानना ललना, तिळही, न ढळे, सु-लोचना वचना ॥ ध्रु० ॥ ही मजविना वश ना कुणा ॥ तिळही सुर ना आणि मना ॥ १ ॥

हे सत्त्वशीले, धन्य आहे तुझ्या निग्रहाची !:—

पद—(चालः—भ्रू-भृंगासी)

सोडीना ही दुराग्रहा किति, बोधियलें मी सदु-
पायानें ॥ तिळही न ढळत अचल मेरुसम, सि-
द्धिसि शेवटिं अपुलें वच ने ॥ध्रु०॥ तुच्छ करी
ही इंद्रादिक सुर॥ प्रेम-दृष्टि ठेवी खरि नजवर॥
शेवट यांतुनि होइल कैसा ॥ कुपित होति कां
सुर-वर सु-मनें ॥ १ ॥

असो, हे मानिनी दमयंती, ईशेच्छेनें घडेल तें खरें; येतों तर. (जातो.)

दमयंती:—हे जगच्चालका परमेश्वरा, आतां या समयीं तारक तूंच आहेस.:—

पद—(चालः—प्रभो अनाथ-पालका)

प्रभो कृपा क्षणीं करीं ॥ त्वदीय कंन्यकेवरीं ॥
॥ध्रु०॥ स्वयंवरीं कसे पहा ॥ सुरेंद्र देव हे महा॥
करिति विघ्न कीं अहा ॥ सुचे न कांहिं अंतरीं ॥
॥ १ ॥ नसेचि कोणि रक्षिता ॥ अ-नाथ ही तुझी
सुता॥ मदीय हेतु तूं अतां॥ पूर्ण करींच सत्वरीं॥२॥

(पडदा पडतो)

अंक २ रा समाप्त.

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

स्थलः—रस्ता.

पात्रेंः—इंद्र, वरुण, अग्नि, यम व नल.

इंद्रः—कां नला, दमयंतीच्या महालांत काय प्रकार घडला, तो सांग पाहूं ?

वरुणः—याचा हा म्लान चेहेराच योजिलेल्या कार्याविषयीं निराशेची साक्ष देत आहे.

अग्निः—नला, हें खरें कां ?

यमः—अरे, सचिंत उभा कां ? सांग एकदांचें काय घडलें तें ?

नलः—ऐकावें महाराज,:—

पद—(चालः—तुझी अन्यथा ती)

कथीं, मी तियेसी बहुता परी ॥ परी गोष्टि ऐके न ती सुंदरी ॥ ध्रु० ॥ तियेची असे कीं प्रतिज्ञा खरी ॥ नलावीण अन्या कुणा ना वरी ॥ १ ॥ तरी देव हो कोप दासावरी ॥ न हो, हीच पायीं विनंती करी ॥ २ ॥

इंद्रः—(मंदहास्यपूर्वक) हे सत्यशीला नला, तुझ्या हातून आमच्या मनाप्रमाणें कार्य न घडल्यानें, तूं संकोचित वृत्तीनें भाषण करीत आहेस; पण असा संकोच बाळगण्याचें कारण नाहीं. कारण, दमयंतीच्या महालांत घडलेला सर्व प्रकार आम्हीं चौघांनींहि अदृश्यपणानें प्रत्यक्ष पाहिला आहे. धन्य आहे तुझी कीं,

आमच्या कार्यासाठीं स्वार्थत्याग करून, त्या दमयंतीचें मन वळविण्यासाठीं तूं पराकाष्ठा केलीस. पण ती सुंदरी यत्किंचित्‌हि वळली नाहीं. यांत तिचीहि धन्यता आहे. सच्छीलाला अनुरूप असेंच तिचें वर्तन घडलें. असो, आतां:—

॥ साकी ॥

इष्ट-कार्य साधाया भूपा आनंदानें जाई॥ सुचेल आह्मां मार्ग तोचि कीं अवलंबूं आह्मि पाहीं॥ तुष्टचि तुजवरती ॥ न होई, संकोचित चित्तीं ॥१॥

नलः—ठीक आहे:—

पद—(चालः—आवरिं आवरिं रे)

वंदित सेवक या सु-समया ॥ प्रेम-भरानें अपुल्या पायां ॥ध्रु०॥ कुपित लेश ना व्हावें सुर हो॥ ठेवा, चित्तीं पूर्णचि माया ॥ १ ॥ विनति साच ही नच हो वायां ॥ रक्षावें हो, विबुध सदा या ॥२॥

इंद्रः—अरे, आमचा तुझ्यावर कोप मुळींच नाहीं. तसाच तुझ्याविषयीं आमच्या मनांत विषादहि नाहीं. आतां जो तुझा हेतु, तोच आमचाहि हेतु; तेव्हां विधिसूत्रानुसार घडायचें तेंच घडेल. जा तर आतां.

नलः—बरें, येतों तर. (जातो)

इंद्रः—हे देवहो, त्या दमयंतीचा पण आहे कीं, मी नलालाच वरीन. तरी तिचें सत्व पाहण्याकरितां आपण चौघेहि प्रति नल बनून, सभास्थानीं त्याच्याच शेजारीं विराजमान् होऊं. मग पाहूं कोणाच्या गळ्यांत माळ घालते ती !

वरुणः—हो हा विचार पसंत.

अग्निः—माझीहि याला संमति आहे.

यमः—मी पण तुमच्या विचाराला अनुकूल आहें.

इंद्रः—चला तर त्याप्रमाणें करूं. (जातात.)

प्रवेश २ रा.

स्थलः—रस्ता.

पात्रें:—केशिनी व चंपककलिका.

चंपककलिकाः—गडे केशिनी, दमयंतीताईसाहेबांनीं नलमहाराजांच्या शोधाकरितां आपल्याला पाठविलें, त्याप्रमाणें शोध करितां, अद्याप ते आल्याची वर्दी नाहीं. स्वयंवरमंडपांत अनेक देशच्या राजांची किती तरी गर्दी झाली आहे ! कोणी रथांत, कोणी हत्तीवर, कोणी अश्वावर व कोणी पालखींत असे आपापल्या इतमामासह मोठ्या थाटानें दमयंतीला वरण्याच्या आशेनें चालले आहेत ! पण उपयोग काय ? दमयंतीनें ज्यांला मनानें वरिलें, ते नलराज या नृपसमूहांत चमकेपावेतों सर्वच निरर्थक !

केशिनीः—हो, खरेंच, वरावांचून वऱ्हाड्यांची गर्दी नुसती शोभेदाखल ! पण, कां ग नलमहाराजांकडे निमंत्रणपत्रिका जाण्याची तर राहिली नसेल ना ?

चंपककलिकाः—असें कसें होईल ? ती तर अवश्य गेलीच असेल; आणि त्याप्रमाणें म्हटलें म्हणजे त्यांनीं सर्वांअगोदर यायला पाहिजे होतें. कारण, त्यांचेंहि चित्त दमयंतीच्या ठायीं लुब्ध असल्याचें

आपण जाणतोंच. तर मग या वेळीं ते मार्गे कां बरें राहिले असावे ? वास्तविक ह्मटलें ह्मणजे:—

॥ पद—(चालः—साजे कां साजणी)

प्रिय-वस्तू जी जनीं॥ कधिं कर-गत होइल ती झणीं॥ उत्कंठा ही मनीं॥ध्रु०॥ सततचि वसते दृढ-तर पाहीं ॥ रीतिच ऐशी सखये बाई ॥ येति न कां नल मग अजुनी ॥ १ ॥

केशिनीः—सखे, तूं ह्मणतेस तें अगदीं खरें आहे. आपल्या दमयंती ताईसाहेबांचीच स्थिति पहाना ?

॥ पद—(चालः—मम हृत्ताप संताप शमना)

विरहिता सखी दमयंती ॥ स्वस्थता नसे तिळ चित्तीं ॥ ध्रु० ॥ चातकीपरी जी बाई ॥ वाट गे सख्याची पाही ॥ किति तरी ॥ अंतरीं ॥ सखि तळमळे झुरे दीनरातीं ॥ प्रीति बहु परी ॥ हृद-यिं ती खरी ॥ नलाची बरी ॥ वसे ती पुरी ॥ येईल कदा नल नृपती ॥ होईल मनीषा पुरती॥ प्रभु-कृपें झणि संगमा सखि पावू तरी ॥ ही प्रभू-पदीं विनती ॥ करुं तया-प्रती सखि प्रणती ॥१॥

अग पण, पाहिली का ती भट मंडळी ! गडबडीनें इकडे येत आहे. बहुधा लग्नमंडपाकडेच निघाली असेल; तर चल आतां आपण दमयंती ताईसाहेबांकडे जाऊं. (जातात.)

प्रवेश ३ रा.

स्थलः—रस्ता.

पात्रें:—बचंभट (नकली.) व सुदेवदीक्षित.

बचंभटः—नमस्कार, दीक्षित नमस्कार; अहो इतक्या गडबडीनें कोणीकडे निघालां ?

सुदेवदीक्षितः—नमस्कार, बचंभटजी, तुह्मांला माहित नाहीं का ? राजकन्या दमयंतीचें स्वयंवर असून देशोदेशचे अनेक राजे लग्नमंडपांत थाटानें प्राप्त झाले आहेत. या प्रसंगीं आह्मां राजोपाध्यायांला तर सर्वां-अगोदर हजर असलें पाहिजे. बरें पण, बचंभटजी, तुह्मीहो कोणीकडे निघाला ?

बचंभटः—वा ! काय प्रश्न ! अहो, अशा प्रसंगीं आमचें काम ह्मटलें ह्मणजे दक्षिणा उपटण्याचें व लड्डू झोडण्याचें. पण दीक्षित, आपण राजोपाध्याय ! दक्षिणेसुद्धां सर्व कारभार आपल्या हातीं ! तेव्हां गरीबावर कृपानजर ठेवा ह्मणजे झालें. पण कां हो, मी आपल्याच मुखानें ऐकलें होतें कीं दमयंती ही नलराजावर अनुरक्त आहे, व नलराजाहि तिच्यावर अनुरक्त आहे. तर मग या स्वयंवराच्या भानगडींत पडण्यापेक्षां आपल्या भीमक महाराजांनीं निखालस दोघांचें लग्नच कां लावून नाहीं दिलें ?

सुदेवदीक्षितः—अहो, हीं राजकारणें, हीं फार बारीक असतात; तेव्हां ही पंचाईत आपल्याला कशाला पाहिजे ? तथापि स्वयंवर करण्याचें कारण ह्मटलें ह्मणजे, दमयंतीचें सौंदर्य फारच अप्रतिम असल्यानें पुष्कळ

राजांकडून मागण्या आल्या असतील, व त्या मागण्या नाकारून एकट्या नलालाच पसंत करून दमयंती अर्पण केल्यानें, युद्धाचें राजकारण उपस्थित होणार. म्हणूनच हा रस्ता पसंत केला असेल. बरें पण बचंभटजी, सगळें खरें; लोकांच्या मुलीच्या लग्नाची दक्षिणा उपटण्याची आपली दानत! पण, स्वतः तुम्हीं तुमच्या मुलीचें लग्न करून आमच्या सारख्यांचा हात केव्हां भिजविणार? मुलगी तर फारच मोठी झालेली ऐकतों.

बचंभटः—कां हो, तुम्हांला इतक्या उठाठेवी कोणीं सांगितल्या? आम्हीं मुलीला उगीच मोठी नाहीं केली! त्यांत कांहीं मतलब आहे मतलब!

सुदेवदीक्षित—अहो, मतलब कशाचा?

बचंभटः—अहो पैशांचा? हजार बाराशें घेतल्याखेरीज का हा अस्मादिक पदराला खार लावून घेऊन फुकटची मुलगी दुसऱ्याला अर्पण करणार आहे?

सुदेवदीक्षितः—शिव शिव! हे उद्गार आपण काय काढितां? कन्याविक्रयासारखें नीच कृत्य कोणतेंहि नाहीं!

बचंभटः—आले मोठे ब्रह्मज्ञानी! या जगांत मी पैशाखेरीज कोणालाच ओळखत नाहीं. अहो, पैशाची थोरवी किती सांगावी?

॥ पद ॥

हा पैसा असे जादुगार॥ भुलवितो जगासी फार ॥ ध्रु० ॥ हत्ती घोडे पालखि मेणे ॥ मिळते सुंदर नार ॥ हो ॥१॥ आप्त इष्ट ते सन्मानीती ॥ स्तविती वारंवार ॥ हो ॥ २ ॥ शहाणा-सुरता

धनिका ह्मणती ॥ करिती सकलहिं प्यार ॥ हो ॥ ३ ॥ छननन ननन पैसा बोले ॥ सर्व सुखाचें सार ॥ हो ॥ ४ ॥

अहो, रस्त्यांत उगीच काथ्या कुटण्यांत काय अर्थ? आतां लग्नमंडपाकडेच जाऊं चला. (जातात)

प्रवेश ४ था.

स्थलः—स्वयंवरस्थान.

पात्रें:—भीमक, पांच नल. ऋतुपर्ण, अंग, वंग, पांचाल, कलिंगादि राजे, चोपदार, सुदेवदीक्षित, बचंभट (नकली), दमयंती, केशिनी, चंपककलिका व शारदा.

भीमकः—(सुदेवदीक्षितास) दीक्षित, या स्वयंवरमंडपांत अनेक देशचे रूपगुणसंपन्न बलशाली राजे दमयंतीच्या अपेक्षेनें विराजमान् झाले आहेत. तर मग आतां दमयंतीला या स्थानीं घेऊन या. ह्मणजे ती यांपैकीं मनाप्रमाणें कोणाला तरी पसंत करून माळ घालील.

सुदेवदीक्षितः—ठीक आहे, हा चाललों ताईसाहेबांला बोलवायला. (जातो)

(पुरोहिताबरोबर दमयंती ‘ हातांत फुलांची माळ आहे अशी ’ केशिनी व चंपककलिका या दोघी सख्यांसह येते.)

ऋतुपर्णः—(स्वगत) ही सुमुखी दमयंती बहुधा

आपल्यालाच वरील. कारण, मी अयोध्येसारख्या मोठ्या देशाचा विख्यात, बलशाली, भीमकाच्या तोडीचा राजा असून भीमकाचें व माझें सख्यत्वहि आहे. तेव्हां दमयंतीची माळ खास आपल्या गळ्यांतच पडणार. (मौक्तिकमाळा सांवरून ऐटीनें बसतो.)

बचंभटः—(ऋतुपर्णास उद्देशून स्वगत) हे राजश्री मोत्यांच्या माळा डौलानें सांवरून कशा उत्सुकतेनें दमयंतीकडे पाहत आहेत! जणूं काय ही यांलाच वरील! पण राजश्री मनांतले मांडे मनांतच खायला लागतील बरें!

अंगराजाः—(स्वगत) अहाहा! काय हें दमयंतीचें स्वरूप! आपल्याला पगडी सांवरून थोडेंसें ऐटीनेंच बसलें पाहिजे. ह्मणजे हिची नजर आपल्यावर विशेष लागेल! (पगडी सांवरून ऐटीनें बसतो.)

बचंभटः—अरे यंवरे फक्कड! पगडी सांवरून ऐटीनें बसल्यानें का कोठें गळ्यांत माळ पडत असते?

वंगराजाः–(स्वगत) ही दमयंती किती तरी मोहक आहे! हिच्या मनांत आपली मूर्ति बिंबावी ह्मणून शेला सांवरून व मिशीला पीळ देऊन थोडी जास्त अक्कड दाखविली पाहिजे. (तसें करितो)

बचंभटः—हंः काय बेटा! शेला सांवरून व मिशीला पीळ देऊन अक्कड दाखवीत आहे! पण अशा डौलानें का कोठें दमयंतीसारखें रत्न लाभत असतें!

पांचाल राजाः–(स्वगत) मी किती तरी सुंदर आहे! दमयंती माझ्यावर लुब्ध होऊन तिनें मला वरिलेंच पाहिजे. (हातांतील कडीं व मुद्रिका सांवरून बसतो.)

बचंभटः—(स्वगत) हे राजश्री कडीं व मुद्रिका सांवरीत आहेत ! यांच्या चेहेऱ्यावरून यांना स्वरूपाचा गर्व दिसतो ! पण थोड्याच वेळांत तोंडघशी पडावें लागेल बरें !

कलिंगः—(स्वगत) दमयंती आपल्याला वरील तर खरोखरच आपण भाग्यवान् ह्मणायचे ! (अंगरख्याच्या अस्तन्या व मंदील सांवरून बसतो)

बचंभटः—(स्वगत) हं: हे बेटे काय ऐटीनें अस्तन्या व मंदील सांवरून बसत आहेत ! जणूं या मेषपात्राला दमयंती वरीलच !

इंद्रः—(पंचनलांपैकीं स्वगत) अहाहा ! या दमयंतीच्या सौंदर्यापुढें प्रत्यक्ष माझी शचिहि तुच्छ भासते! हिचें वर्णन मुनि नारदानें केलें तें यथार्थ आहे ! ही नलावर लुब्ध आहे; व आपणहि नलरूप बनलों असून प्रथम पंक्तींत आहोंत; तेव्हां दमयंतीची माळ दर्शनीं आपल्याच गळ्यांत पडेल !

वरुणः—(स्वगत) ही दमयंती आपल्याला वरील काय? कारण, हा इंद्रच पहिली जागा पटकावून बसला आहे! याचे गळ्यांत दमयंतीनें माळ घातली, तर फसलीच ह्मणायची ! कारण हा पडला हजार डोळ्यांचा ! याच्या सर्वांगाला डोळे ! अर्थात् विद्रूपच !! आणि मी कांतीनें कसा तेजस्वी आहें. पाहूं आतां काय चमत्कार घडतो तो !

अग्निः—ही कांतिमान् देवी मलाच अनुरूप आहे. कारण, साक्षात् मी अग्नि; माझ्यापुढें कोणाचें तेज

अधिक आहे? पण, प्रस्तुत माझी पायरी तिसरी; तेव्हां नशिबाची परीक्षा काय होते ती पहावी.

यमः—वास्तविक ह्मटलें ह्मणजे या शुभांगेनें मलाच वरिलें पाहिजे. कारण सर्वांचा अंत करणारा मी, अर्थात् श्रेष्ठ; व ही माझी स्त्री झाल्यावर आपोआपच अजरामर होणार.

बचंभटः—अरे, हा काय चमत्कार! हे एक पंक्तीनें बसलेले पांचहि पुरुष रूपानें व वयानें एकसारखे दिसत आहेत व यांनीं दमयंतीकडे कशी बकासारखी अचल दृष्टि लाविली आहे! यावरून हे कोणी यक्ष, गंधर्व किंवा स्वर्गस्थ देव तर सत्त्वपरीक्षणार्थ आले नाहींत! किंवा ही भूतचेष्टा आहे? यांतून एखाद्याच्या गळ्यांत दमयंतीची माळ पडते कीं काय? पाहूं आतां घोडें मैदान जवळच आहे.

भीमकः—(दमयंतीस) बाळे, सांगतों याकडे लक्ष्य दे:—

पद—(चाल:—नाहिं सुभद्रा)

ऐके दुहिते या समयीं गे मद्वच दमयंती ॥ स्वयंवरा कारण तुझिया गे जमले हे नृपती ॥ध्रु०॥
हा अयोध्याधिपती राजा ऋतुपर्णचि होई ॥ अंग, वंग, पांचाल-कलिंगाधिपती हे पाहीं ॥ रूपवंत वैभवशाली ही निरखी नृप-पंक्ती ॥ १ ॥ यांतुनि तुजला असेल जो का पसंत त्यालागीं ॥ अर्पुनि माला कंठीं त्याची होई अर्धांगी ॥ हेंचि तुला सांगणें कन्यके घेई तूं चित्तीं ॥ २ ॥

बाळे, तुला या राजांची ओळख करून दिलीच आहे; पण ते एकपंक्तीनें बसलेले आश्चर्यचकित कर-

णारे पांच नलहि अवलोकनांत घे; व एकंदर राजां-
पैकीं जो तुला पसंत असेल त्याच्या कंठांत माळ घाल.

केशिनीः—(दमयंतीस) ऐकलेंस कां महाराजांनीं काय सांगितलें तें ? तर आतां चातुर्यानें:—

पद—(चालः—मारा पिताजीको लाड)

ओळखीं गडे ग यांत ॥ प्रियकर कोठें तो नल-
कांत ॥ ध्रु० ॥ या नृप-पंक्ती-माजीं बसले ॥ सुंदर
पांच पुरूष ॥ एकसारिखे दिसति ग बाई ॥
पडत मनासि भ्रांत ॥ खरोखर ॥ प्रियकर० ॥ १ ॥

दमयंतीः—(पांच नलांकडे पाहून) सखे केशिनी, या वेळीं माझें मन अगदीं गोंधळलें आहे !

पद—(चालः—धडगत अतां)

तिळभरि अतां सुचत मज न गडे ॥ मनासि उ-
दासि सखये जडे ॥ ध्रु० ॥ अवचित हेतू विफल
तरि घडे ॥ काय करूं सखि जाण ॥ बाव रलें तुझि
आण ॥ एकरूपि हे पांचहि नल गे ॥ कवण-कृतीं ॥
निषध-पती ॥ जाणूं ॥ पाहीं ॥ तिळभरि० ॥ १ ॥

शिव शिव ! अखेर या सुरवरांनीं घात करण्याची युक्ति योजिलीच !

पद—(चालः—तुझे नयन दगाबाज)

अहा ! कुपित प्रभूराय ॥ होइ कसा तो या स-
मयाला ॥ कांहिं सुचे न उपाय ॥ ध्रु० ॥ हे इंद्रा-
दिक कपट-कृतीनें ॥ खासाचि मज छळिती का ॥
काय करूं मन गुंगचि झालें ॥ पाहि कसे नल-
राय ॥ १ ॥

चंपककलिकाः—गडे दमयंती, अशी घाबरूं नकोस. या वेळीं मला एक उपाय सुचला आहे तो मी सांगतें:—

दमयंतीः—तो कोणता ?

चंपककलिकाः—

पद—(चालः—लावुनी परिस)

सखि ऐके या समयाला ॥ सदुपाय सुचवि मी तुजला॥ ध्रु० ॥शारदा-देवि-मातेला ॥ स्मरुनिया करीं स्तवनाला ॥ (चाल)ती वीणा-पुस्तक-धारी ॥ प्रकटेल येथ अवधारीं ॥ तव इच्छा पुरविल सारी ॥ तूं निश्चय ठेवि मनाला ॥ सदु० ॥ १ ॥

दमयंतीः—ठीक आहे, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें करितेंः—

पद—(चालः—विठाइ माउली.)

धाव त्वरें जननी ॥ शारदे ॥ विधितनये ही दीन कन्यका लीन तुझ्या चरणीं ॥ ध्रु० ॥ येइं कृपा करुनी ॥ माते ॥ संकट-डोहांतुनि गे तारीं ॥ मज हातीं धरुनी ॥१॥ त्राता नच कोणी ॥ तुजविना ॥ वायु-गतीनें येउनि देवी ॥ होईं वरदानी ॥ २ ॥

(इतक्यांत आकाशमार्गानें विमानांतून शारदादेवी गात येते व सर्वजण उभे राहतात.)

शारदाः—

पद—(चालः—राम स्मरावा.)

धीर न सोडिं जरा ॥ सुते ग ॥ ध्रु० ॥ कैवारा-स्तव धावुनि आलें ॥ करुनि खरोखर त्वरा ॥ सुते ग ॥ १ ॥ वत्से तव मानसिचा हेतू ॥ पूर्ण करिन मी खरा ॥ सुते ग ॥ २ ॥ आनंदातें करिं धारण गे ॥ पावसि इच्छित वरा ॥ सुते ग ॥३॥

वत्से दमयंती, तुझा धावा ऐकून मी ब्रह्मलोकाहून वायुगतीनें धांवत आलें आहें; तर तुझें इच्छित काय आहे तें सांग बरें.

॥ पद ॥

दमयंतीः—वंदन मी तुज ब्रह्म-कुमरी करी ॥ प्रेमानें या कन्येतें ॥ तारीं ग म्हणिं तूं मातें ॥ संकट-डोहिं मी पूर्ण बुडत तरि ॥ ध्रु० ॥

शारदाः—काय असें तुज संकट पडलें भारी ॥ सांग म्हणी कन्यके मी करितें दूरी ॥ संशय समुळीं त्यागी ॥ आनंदी करितें वेगीं ॥

दमयंती—हे सुर-नायक छळीती कपट-कृतिं ॥ गोंधळलें मन गुंग जाहली मति ॥ यास्तव करि मी स्तवना ॥ माते तूं करिं मम अवना ॥ भूपति-नैषध-मूर्ति दावीं ग खरी ॥ १ ॥

शारदाः—शंकित होई न धैर्य स्व-मनीं धरीं ॥ सत्वरि गे तव चिंता मी करितें दूरी ॥ आतांची नल-नृपतीसी दावीतें गे मी तुजसी ॥ आनंदानें त्यासि सुते ग वरीं ॥

दमयंतीः—वंदन मी तुज ब्रह्म-कुमरी करी ॥ २ ॥

शारदाः—चल तर इकडे ये, मी तुला या पांच नलांपैकीं ऐकेकाची ओळख करून देतें:—

पद—(चालः—भूपती खरे.)

शारदाः—हा सहस्र-चक्षू इंद्र शची-पति बाई ॥ जो सकल-सुरांचा अधिपति ग होई ॥ ध्रु० ॥

दमयंतीः—हा नलगे मजला यासि वरीना आई ॥ हा पूज्य पित्यासम यासि वंदि मी पाहीं ॥ १ ॥

शारदाः—हा जल-निधि-पति कीं वरुण-देव ग होई ॥ ज्यावीण जगतिं गे जीवन समुळीं नाहीं ॥ २ ॥

दमयंतीः—हा नलगे मजला यासि वरीना आई ॥ हा पूज्य पित्यासम यासि वंदि मी पाहीं ॥ ३ ॥

शारदाः—हा अग्नि-देव बहु तेजवंत ग राही ॥ यावीण जगीं व्यवहार चले नच कांहीं ॥

दमयंतीः—हा नलगे मजला यासि वरीना आई ॥ हा
पूज्य पित्यासम यासि वंदि मी पाहीं ॥ ४ ॥
शारदाः—(चाल) हा असे दंड-धर बाई यम तरी ॥
जो सकल-जगाच्या प्राणा ग हरी ॥
दमयंतीः—हा नको पित्यासम यातें नच वरी ॥
शारदाः—हा शेवटील पांचवा निषध-पति होई ॥
दमयंतीः—हाचि गे प्राण-पति यासि वरित मी आई॥५
(नलाचे गळ्यांत माला अर्पण करिते, तोंच आकाशांतून पुष्पवृष्टि व वाद्यगजर होतो.)

शारदाः—वसे दमयंती, भर्त्यासह तुझें अक्षय्य कल्याण असो; व तुम्हां उभयतांची सत्कीर्ति या जगावर अखंड पसरो. हा माझा आशिर्वाद आहे. झालाना आतां तुझा हेतु पूर्ण ?

दमयंतीः—माते, तुझ्या कृपेनें झाला बरें.

भीमकः—माते शारदे, आपण जें कार्य करायचें तें केलेंत; आतां या आसनावर विराजमान् व्हावें.

शारदाः—ठीक आहे. (आसनावर बसते.)

चारी देवः—शाबास ! सत्वशीले दमयंती, शाबास ! !

इंद्रः—तसेंच हे सत्वधीरा नला, तुलाहि शाबास ! धन्य आहे तुझी कीं, आम्हीं चारी देवांनीं प्रत्यक्ष तुझें स्वरूप धारण करून सत्व निरीक्षण केलें असतां तूं आपल्या सत्वाला यत्किंचित्‌हि ढळला नाहींस ! यामुळें आम्ही तुझ्यावर प्रसन्न आहोंत. म्हणूनः—

॥ साकी ॥

अर्पितसें मी दोन वरांतें, तुजला या समयासी॥
मद्दर्शन तें यज्ञीं त्यापरि अंतीं उत्तम गतिसी॥
पावशि नल-नृपती ॥ मद्भच ठेवीं दृढ चित्तीं ॥ १ ॥

वरुणः—तसेच मीहि दोन वर अर्पण करितों. एक इच्छित स्थलीं उदकप्राप्ति, व दुसरी पुष्पसतेजता.

अग्निः—नला, मी पण तुला दोन वर देतों. एक स्मरण करितांच मत्प्राप्ति, व दुसरा दिव्यलोकीं वास.

यमः—नला, माझेहि दोन वर ग्रहण कर. एक अन्नरसकुशलता, व दुसरी धर्मश्रद्धा.

(नंतर)

भीमकः—(दमयंतीचा हात नलाचे हातांत देऊन)

पद—(चालः—आनंदें नटती.)

आनंदें नृ-पती ॥ देतों या मम सुतेसि हस्तीं ॥ध्रु०
आजवरीं स्नेहें वाढविली ॥ आतां ही मी तुज
अर्पियली ॥ भार्या ही तव साच जाहली ॥ पाळि
हिला प्रीतीं ॥ १ ॥

नलः—महाराजः—

॥ पद ॥

धरिं आनंदें हस्ता ॥ होई मजवरि प्रसाद मो-
ठा ॥ हो या समया ॥ ध्रु० ॥ ईश-कृपेनें हो नृप-
वर्या ॥ प्रेमें होई ही मम भार्या ॥ संतोषें स्वी-
कृत करि आर्या ॥ संरक्षिन मी ही मम कांता ॥१॥

(पडदा पडतो)

अंक ३ रा समाप्त.

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

स्थलः—रस्ता.

पात्रें:—इंद्र, वरुण, अग्नि, यम, कलि व द्वापर.

इंद्रः—कांहो कलिराज द्वापर, आपण इतक्या त्वरेनें कोणीकडे चाललां आहां?

कलिः—अमरेश्वरा, ऐकावें:—

पद—(चाल:—अनंग लाजतो)

विदर्भ-देशिं भीमकात्मजा-स्वयंवरा ॥
होत, कर्णिं ऐकिलेंचि हे शचीवरा ॥ ध्रु० ॥
ह्मणूनि आह्मि जातसों करूनिया त्वरा ॥
वरावया स्वरूप-शालिनी मनोहरा ॥ १ ॥

इंद्रः—अरे, स्वयंवर केव्हांच होऊन गेलें:

पद—(चाल:—स्वार्थी जी प्रीति)

आह्मी हे देव चवघेही भू-तळीं ॥ गेलों होतों
दमयंतीच्या स्वयंवरार्थ कली ॥ ध्रु० ॥ सत्त्व
पाहिलें आह्मी तीचें ॥ परि जी नच ढळली ॥१॥
निषध-पती-नल-मूर्ती तीनें ॥ प्रेमानें वरिली ॥ २ ॥

कलिः—असें काय? तर मग आमचा हेतु निष्फलच झाला ह्मणायचा! (क्रोधानें) या सिंहाचा भाग त्या नल जंबुकानें नेला काय? पण बच्चाजी, या कलिराजाचा सपाटा तुला माहित नाहीं. पहातों तुला आतां कसा पचतो तो!

इंद्रः—कलि, नलाचा सूड उगविण्याचें तूं मूळींच मनांत आणूं नकोस. कारण:—

॥ दिंडी ॥

निषध-पति-नल बहु पुण्यवंत राजा ॥
योग्य, दमयंती त्यासि असे भाजा ॥
परीक्षीलें उभयांसि पूर्ण आह्मी ॥
परी दोघेंही सत्त्वशील नामी ॥ १ ॥

तर अशा त्या पुण्यश्लोक राजाच्या वाटेला तुह्मी दोघेही मुळींच जाऊं नका.

कलिः—(क्रोधानें) शचिवरा, मी तुझें मुळींच ऐकणार नाहीं. भार्येसह त्या नलाचा छल करणारच. कारणः—

पद—(चालः—आतां आलें मला)

नच सहे मला अपमान ॥ रानोरान, दाणादाण,
करि जाण, तुझि आण ॥ ध्रु० ॥ सुंदर जी दम-
यंति प्रिया प्रिया प्रिया ॥ कष्टि तिच्या वांचुनिया
माझि काया काया ॥ कासाविस माझे प्राण ॥
तिच्या साठिं होति जाण ॥ माझा हेतु तिच्या
ठायां ॥ परि गेला साच वायां ॥ आतां जाइं
दुःख द्याया ॥ दमयंति प्रिया प्रिया ॥ सहे० ॥१॥

(द्वापराचा हात धरून) चल रे द्वापर, आपण त्या वैऱ्याचा सूड उगवूंच.) (जातात.)

इंद्रः—देवहो,:—

॥ साकी ॥

दुष्ट कली हा नलराजासी दुःख देइ परि अंतीं ॥
होइल विजयचि सत्याचा कीं भोगिल सुख बहु
नृ-पती ॥ भाकित हेंचि खरें ॥ आतां स्व-स्थलिं
जाउं त्वरें ॥ १ ॥

(चारी देव जातात.)

प्रवेश २ रा.

स्थलः—महाल.

पात्रें:—पुष्कर, द्वापर व कलि.

पुष्करः—काय करावें ? भाऊबंदकी मोठी कठिण आहे ! माझ्या समक्ष माझा शत्रु नल यानें राज्यसुख भोगावें, आणि मींच काय पातक केलें आहे कीं अति दारिद्र्यांत दिवस काढावे ! माझ्या अंगीं शूरत्व असून, या नलाच्या प्रखर पराक्रमापुढें माझें कांहींच तेज पडत नाहीं. त्याला भाग्यलक्ष्मी अनुकूल झाली आहे. पहा, इंद्रादि देवांनीं जिच्यासाठीं लाळ घोटिली, अशी स्वरूप सुंदर दमयंती त्याला भार्या लाभली ! खरोखरचः—

पद—(चालः—तस्करा हातीं)

अति रमणी जी जणु रति कीं दुसरी ॥ अथवा लक्ष्मी अवतरली ॥ ध्रु० ॥ भीमक-तनया ती, नल-नृपतीसि वरी ॥ प्रसवे, सुत-दुहिताहि वरीं ॥ १ ॥ नल-महिमा हा विस्तृत अवनिवरीं ॥ कैसा साहुं मि हृदयिं तरी ॥ २ ॥ कवण सदुपायीं जिंकावा वैरी ॥ चिंता कशि होईल दुरी ॥ ३ ॥

पहा, जिकडे पहावें तिकडे नलाचीच स्तुति गात आहेत ! तो प्रस्तुत स्त्रीपुत्रांसहित कसा आनंदांत नांदत आहे पहाः—

पद—(चालः—सुखचिद्घन)

सुख भोगी, तो नल जगतीं ॥ सति भार्येसह दमयंती ॥ जन सद्यश ज्याचें गाती ॥ मज क्रोधचि उपजे चित्तीं ॥ ध्रु० ॥ त्या जिंकूं कवण्या रीतीं ॥ मनिं चिंता रात्रंदिन ती ॥ कु-दशा त्या देइन पुरती ॥ मज क्रोधचि उपजे चित्तीं ॥ १ ॥

उघडच आहे, तेजस्वी पुरुष धडधडीत शत्रूचा उत्कर्ष नजरेसमोर कसा साहील? पण काय करावें? हल्लीं त्याला काल अनुकूल आहे; व त्याचें बलहि अतुल आहे. त्याच्याशीं कोणत्या प्रकारानें उघड भांडावें?

पद्—(चाल:—लक्ष्मीरमण)

द्रव्य-बळें हीन असे साच मी तरी ॥ लेशमात्र सत्ता ती नाहिं मम करीं ॥ ध्रु० ॥ समर करिन तरि अजिंक्य पूर्ण तो अरी ॥ सुचत नसे कांहिं मला खचित अंतरीं ॥ चाल ॥ साह्य कोण होइ मला ॥ जिंकाया नल-नृपतिला ॥ कवण करी उपकृतिला ॥ कठिण अशा समयाला ॥ चिंता-नल हृदयाला ॥ दहन तो करी ॥ १ ॥

कलिः—(द्वापरासह प्रवेश करून) हं हं पुष्करा, चिंता सोड. हे आह्मीं तुझ्या साह्यार्थ आलों पहा. तूं नलाचा दायाद असून तुला त्याचा उत्कर्ष सहन न व्हावा हें उघडच आहे! त्याला समूळ पाताळीं घाल-ण्याची युक्ति योजिली पाहिजे. राज्यसंपादन करणें ह्मणजे कुटिल नीतीचाच स्वीकार करणें योग्य; ह्मणून आमच्या साह्यानें त्या नलाचा पाडाव करण्याला आतांच तयार हो कसा.

पुष्करः—बरें पण, मला या गोष्टी सांगणारा तूं कोण? व हा दुसरा तुझ्याबरोबर कोण आहे?

कलिः—पुष्करा, मला कलि ह्मणतात. राज्याच्या उलाढाली माझ्याच अनुकूलतेनें होत असतात. अनृत, अधर्म, अनाचार व वाद इत्यादि माझीं स्वरूपें आहेत. व हा मजबरोबरचा द्वापर आहे. आह्मीं प्रस्तुत तुझें कल्याण करण्याकरितां आलों आहोंत.

पुष्कर:—नलाविषयीं द्वेष व माझ्याविषयीं प्रीति हीं तुमच्या मनांत कां बसलीं हें सकारण सांगा.

कलि:—ऐक:—

पद—(चाल:—हांहां हांहां रविकुल भूषा)

दमयंतीच्या कारणिं आह्मी बनत नलाचे रे वैरी ॥
सूड तयाचा उगवायासी आलों कोपें येथवरी ॥
बारा वर्षें टपलों तेव्हां आजचि आली संधि
खरी ॥ यास्तव अमुच्या साह्यें खेळुनि द्यूत
तयाचें राज्य हरीं ॥ १ ॥

पुष्करा, तूं नलाचा दायाद, तेव्हां तुझ्या द्वारानेंच त्याचा सूड उगविणें उक्त दिसलें; ह्मणून तुझ्याकडे आलों. व तुलाहि हेंच इष्ट आहे.

पुष्कर:—(कलीचा हात धरतो तोंच कलीचा त्याचे अंगांत प्रवेश होतो) गड्या, तुझें ह्मणणें माझ्या पुरें लक्ष्यांत आलें. (क्रोधानें) खरोखरच:—

पद—(चाल:—मज गमे ऐसा)

नल अतां गांजूं पूर्ण तो ॥ साच वैरी ॥ ध्रु० ॥
होई मोठा तो बलशाली ॥ लक्ष्मी ज्याच्या अं-
कित झाली ॥ सु-कीर्ति ज्यानें ती वरियेली ॥ नि-
ष्कंटक जो राज्या करितो ॥ १ ॥ तदुत्कर्ष तो
मज सोसेना ॥ आतां मजला चैन पडेना ॥ केव्हां
करि मी तन्निर्दलना ॥ हाचि हेतु मम चित्तीं
वसतो ॥ २ ॥

हे कलि द्वापरहो, झाला माझा निश्चय कायम. पण तुह्मीं मला साह्य कशा रीतीनें करणार ?

कलि:—अरे, मी नलाच्या अंगांत प्रवेश करितों. ह्मणजे—तूं त्याला खेळायला पाचारण करितांच तो सिद्ध

होईल. नंतर फाशांत हा द्वापर प्रवेश करील; व खेळाच्या आरंभापासून सर्वच डाव तुझ्याकडले जिंकिले जातील. तूं त्याच्याशीं पण लावून खेळ, व त्याचें सर्वस्व हरण करून स्त्रीपुत्रासहित त्याला राज्यंभ्रष्ट कर. अर्थात् तुझे व आमचे हेतु पूर्ण झाले ह्मणायचे !

पुष्कर:—हो, ही युक्ति मला पसंत, पण मी पणांत काय लावावें ? माझ्यापाशीं द्रव्य नाहीं.

कलि:—तुझ्यापाशीं असलेले पन्नास वृषभ लाव, ते तसेच कायम राहतील; नळाच्यानें ते जिंकले जाणार नाहींत. तर मग आतां आह्मीं इष्ट कार्यासाठीं गमन करितों. (कलि द्वापरासह जातो.)

पुष्कर:—(मिशीला पीळ देऊन):—

पद—(चाल:—सफलेच्छ ती)

सहाय्य होई कलि हा मजला ॥ यास्तव खेळु-
निया द्यूताला ॥ राज्य-विहिन मी करिन नलाला ॥
ईर्षा मनिं भरली ॥ आतां ॥ मन्मानस-हेतू सा-
धाया ॥ संधि बरी आली ॥ आतां ॥ १ ॥ त्या
नलराया वनवासाला ॥ प्रेषितोंचि मी घालुनि
घाला ॥ स्फुरण चढे मज या समयाला ॥ होइ
प्रसन्न कलि ॥ आतां ॥ २ ॥

(जातो.)

प्रवेश ३ रा.

स्थलः—दिवाणखाना.

पात्रें:—दमयंती, बृहत्सेना (दासी), वार्ष्णेय (सारथी), इंद्रसेन व इंद्रसेना (मुलें).

दमयंतीः—(एकटी स्वगत) देवा, आज बारा वर्षे किती तरी सुखांत काढिलीं ! प्राणनाथांनीं व मी केवळ लक्ष्मीनारायणाप्रमाणें आनंदांत काळ घालविला. इतकेंच नाहीं, तर प्रियकरांनीं मला अगदीं तळहाताच्या फोडाप्रमाणें वागवून माझे सर्व प्रकारचे कोड पुरविले. व इतक्या अवकाशांत हीं दोन बालरत्नें उदरीं येऊन यांच्या क्रीडाकौतुकांनीं तर केवळ आह्मीं आनंदशिखरावरच आरोहण केलें. अशा प्रकारें सर्व राजवैभवासुद्धां पूर्ण सुख अनुकूल असल्यामुळें, आह्मीं उभयतांहि स्वतःस धन्य मानीत आलों. पण हारे दुर्दैवा ! आतां मात्र त्या आनंदाचा विरस होण्याची वेळ आली. कारण, प्राणनाथ इतके सुज्ञ असूनहि त्यांच्या बुद्धीला विपर्यास होऊन, ते आपला शत्रु पुष्कर याशीं द्यूत खेळायला प्रवृत्त झाले आहेत; व पणांत राज्यसंपत्ति लावीत सुटले आहेत ! आणि तो पुष्कर भराभर सर्व डाव जिंकीत चालला आहे ! ! मी प्राणनाथांचें किती तरी निवारण केलें ? प्रधानादि मंत्रीवर्गानीं व नगरजनांनींहि किती प्रकारें सांगून पाहिलें, पण प्राणनाथ कोणाचेंच न ऐकतां द्यूताविषयीं ईर्षेला चढले आहेत. अर्थात् आतां अनुक्रमानें सर्व राज्यहि पणांत लाविल्याखेरीज सोडावयाचे नाहींत. व अखेर एक वस्त्रानिशीं आह्मांला वनवास भोगण्याची पाळी येणार. हें भाकीत

दिसतें. तेव्हां आतांच आपण या मुलांना तरी माहेरीं पोहोंचविण्याची सावधगिरी करावी हें योग्य. कोण आहे ग तिकडे ?

बृहत्सेना:—(येऊन) जी बाईसाहेब, मी बृहत्सेना आहें.

दमयंती:—बृहत्सेने, जा, आतांच मुलांना व वार्ष्णेय सारथ्याला घेऊन ये.

बृहत्सेना:—जी बाईसाहेब, घेऊन येतें. (जाते व मुलांसह वार्ष्णेयास घेऊन येते.)

दमयंती:—(अश्रुपूर्वक) वार्ष्णेया, प्राणनाथ तर द्यूताला प्रवर्तले आहेत. यांत ते सर्व राज्य हरविल्याखेरीज राहणार नाहींत हें निश्चित. म्हणून तुला हेंच सांगणें आहे कीं, आतांच रथ जोडून हीं दोन मुलें माझ्या माहेरीं नेऊन पोहोंचीव.

वार्ष्णेय:—ठीक आहे, चलावें छोटे महाराज, ताईसाहेब.

इंद्रसेन:—आई, हें ग काय ? आम्हांला कुठें पाठवितेस ?

दमयंती:—बाळांनो, तुमच्या मामाकडे तुम्हांला पाठवितें बरें.

इंद्रसेना:—आणि तूं नाहीं का येत ?

दमयंती:—बाळांनो, मी मागाहून येईन.

इंद्रसेना:—आई, असं कांग ?:—

पद—(चालः—नागीण चपल)

कां त्याग करिशि तूं आई ॥ सु-विचारा करिं

कांहीं ॥ध्रु०॥ दीन बालकें आह्मी पाहीं ॥ करुणा तुजला कां नच येई ॥ नमित तुझ्या गे अह्मि पायीं ॥ १ ॥

इंद्रसेनः—आई, तुला हें योग्य दिसतें कां?:—

पद—(चालः—त्वरित मज)

होशी आह्मांवरि तूं आई ॥ निष्ठुर अशि कां गे ॥ध्रु०॥ येशि न कीं तूं आह्मां संगें ॥ कारण याचें वेगें सांगे दीन-बालकें आह्मी तूझीं ॥ त्यागिशि आह्मां कां गे ॥ १ ॥

(मुलें रुदन करूं लागतात.)

दमयंतीः—(गहिंवरून) बाळांनो तुह्मीं रुदन करूं नकाः—

पद—(चालः—अर्जि शेवटचा)

मम बाळांनो ऐका या समयासी ॥ तूमचा पिता द्यूतासी ॥ध्रु०॥ क्रीडत लावुनिया पणिं बहुतचि द्रव्यासी ॥ घालवील कीं राज्यासी ॥ गेला प्रज्ञपणा त्यांचा तो विलयासी ॥ भ्रंशताचि ये तन्मातिसी ॥ चाल ॥ ऐकती न माझें स्वामी ॥ संकटींच बुडुं कीं आह्मी ॥ येई न कोणि मग कामीं ॥ ह्मणुनी पाठवितें मातुल-गृहिं तुह्मांसी ॥ रक्षाया या समयासी ॥ १ ॥

बाळांनो, तुह्मीं क्षत्रियांच्या उदरीं जन्माला आलां आहांत; व जरी लहान आहांत, तरी पुण्यश्लोक व धैर्यशाली अशा सिंहाचे छावे आहांत. यामुळें संकटाला तोंड देणें हें तुमचें कर्त्तव्यच आहे. ह्मणून या वेळीं माझें ऐकून या वार्ष्णेयाबरोबर मामांच्या घरीं जाच.

इंद्रसेनः—ठीक आहे, आह्मीं तुझी आज्ञा ऐकतों; पण तूं मागाहून लवकरच येशील ना?

दमयंतीः—हो, लवकर येईन बरें.

इंद्रसेनाः—आई, हें अगदीं खरें ना ?

दमयंतीः—बाळे, हो खरें. वार्ष्णेया, आतां यांना लवकर घेऊन जा. विलंब होतो.

वार्ष्णेयः—ठीक आहे. (मुलांस) चला बाळांनो.

(मुलांसह जातो.)

(रस्त्यावर)

दमयंतीः—(गहिंवरून) शिव शिव ! हा मुलांचा वियोग या वेळीं कसें अगदीं काळजाचें पाणी करीत आहे ? (नेत्र पुसून) असो, आतां द्यूताची मजल कोठ पावेतों आली आहे ती पहावी. (द्यूतस्थानाकडे जाते.)

प्रवेश ४ था.

स्थलः—. (दिवाणखाना द्यूतस्थान.)

पात्रें:—नल, पुष्कर, दमयंती, प्रधान व कोशाधिकारी.

पुष्करः—काय नला, सर्व संपत्ति हरलास ? आतां पणांत काय लावतोस ?

नलः—सर्व राज्य लावतों.

दमयंतीः—प्राणनाथ अहो, हें काय ? आपल्याच हातानें पायावर कां कुऱ्हाड मारून घेत आहां ?

नलः—ईश्वरी प्रेरणा अशीच आहे. हं पुष्करा, हे फासे टाकले.

पुष्करः—झालें, राज्यहि जिंकलें! आतां पणांत लावण्याला काय उरलें? (दमयंतीकडे पाहून व हंसून) ही रंभोरू दमयंती पणांत लावतोस का?

नलः—(क्रोधानें) मूर्खा, दमयंतीविषयीं पुन्हां कुशब्द उच्चारशील, तर तुझ्या जिव्हेचे शतशः तुकडे करून आतांच तुला यमसदनाची वाट दाखवीन समजलास.? दुष्टाः—

पद—(चालः—जठरानल)

वच हें उच्चाराया तुजसी ॥ लाज न वाटे नीचा कैशी ॥ ध्रु० ॥ मज सिंहाशीं तूं जंबुकसा ॥ करुनि वल्गना झुंजसि कैसा ॥ परि सोडीं रे तूं प्राणाशा ॥ कां तुज कुमती उपजे ऐशी ॥ १ ॥

पुष्करः—(हंसून) अरे राज्यभ्रष्ट नला, आतां माझ्यासमोर असे निर्गल प्रलाप करणारा मूर्ख तूंच ठरत आहेसः—

॥ झंपा ॥

वृथा गर्व वाहसी राज्य-विहिना ॥ क्षीण तूं मज-सवें बोल मुळिं ना ॥ ध्रु० ॥ रंक तूं समयिं या नृपति मी साच रे ॥ आवरीं अपुलि तूं दीर्घ रसना ॥ २ ॥ जल्पसी मद उगा आंगिं तूं धरुनिया ॥ वैर मी उगविलें बुद्धि-मलिना ॥ २ ॥

(प्रधानास) प्रधानजी, पहातां काय? आतांच या नलाच्या व दमयंतीच्या आंगावरचे सर्व अलंकार काढून घेऊन यांना एक वस्त्रानिशीं राज्याबाहेर काढून द्या.

प्रधानः—(नल व दमयंतीस) हं आतां उभयतांनींहि वस्त्रालंकार उतरण्याकरितां अंतर्गृहांत चलावें. (प्रधानासह जातात.)

पुष्करः—(कोशाधिकाऱ्यास) हं, कोशाधिकारी, या नल व दमयंती पैकीं एकालाहि व यांच्या मुलानांहि या निषध देशांत कोणीं आश्रय अगर अन्नोदक देऊं नये. दिल्यास शिरच्छेद होईल. अशी योग्य अधिकाऱ्याकडून सक्त ताकीद फिरवा. व आतां प्रधानासह माझ्या राज्याभिषेकाची तयारी करा.

कोशाधिकारीः—ठीक आहे. (जातो.)

पुष्करः—(स्वगत)

॥ साकी ॥

कलिरायाच्या कृपा-प्रसादें इष्ट-हेतु मम फळला॥ राज्य हरुनि मम अरि भार्येसह वनवासा प्रेषियला ॥ नशिब मम फळलें ॥ मत्करिं राज्य-सूत्र आलें ॥ १ ॥

असो, आतां प्रथम दरबारांत गेलें पाहिजे. (जातो

प्रवेश ५ वा.

स्थलः—रस्ता

पात्रें:—नल व दमयंती.

नलः—

पद—(चालः—आजि धन्य मी खरा)

अजि दैव हें पहा कसें गे वक्र होतसे ॥ कु·विचारें कैशी भ्रंशता बुद्धि वरीतसे ॥ ध्रु० ॥ राराज्यावरूनि मी सखे गे भ्रष्ट होउनी ॥ पावे विपत्ती, शून्यता अतां मनीं वसे ॥ १ ॥

प्रिये, मति पहा कशी अगदीं भ्रमित झाली आहे ती ! त्या द्यूताच्या धुंदींत मुलांचीहि विस्मृति पडली ! बरें तर मुलांची काय वाट लाविलीस ?

दमयंतीः—प्राणनाथ, आपणाला मी द्यूतापासून परावृत्त होण्याविषयीं पराकाष्ठेची विनंति केली, पण आपण दुराग्रहाला पेटलां! तेव्हां मी समयसूचकतेनें मुलांना वार्ष्णेय सारथ्यांबरोबर केव्हांच माहेराकडे वाटे लाविलें आहे.

नलः—वा! हा धूर्तपणा चांगला केलास! बरें, आतां स्वतःविषयीं काय विचार करितेस?

दमयंतीः—प्राणनाथ हा काय प्रश्न?:—

॥ पद ॥

प्रियकरा तुह्मां संगातीं ॥ सर्वदा वसे, दमयंती ॥ध्रु०॥ सोडुनि दीप्ती त्या सूर्यातें ॥ किंवा ज्योती कर्पूरातें ॥ अथवा लाटा त्या उदधीतें ॥ त्यजुनि एकल्या नच वसती ॥ १ ॥

ह्मणून प्राणनाथ, मी आपणाला सोडून कधींहि निराळी राहणार नाहीं. मी आपली अर्धांगी, अर्थात् छायेप्रमाणें बरोबर असणारच. जशी मी सुखाची विभागिनी झालें, तशीच दुःखाचीहि विभागी होणें हें माझें पवित्र कर्तव्य आहे.

नलः—प्रिये, वनवास हा अत्यंत कठिण आहे. ह्मणून तुझ्यासारखी कोमल स्त्री, जिनें कधीं उन्हाची तिरीपहि पाहिली नाहीं, अशा तुला एकाकीं वनवासासारख्या घोर दुःखाचा अनुभव देणें हें खरोखरच क्रूरकर्म होय! ह्मणून तुला बरोबर घ्यावी असें माझें हृदय कबूल करीत नाहीं. तर मुलांप्रमाणें तूंहि माहेरचा रस्ता स्वीकारावास हेंच या समयीं उक्त दिसतें.

दमयंती:—

॥ अंजनी गीत ॥

निष्ठुर वच हें नच बोलावें ॥
अपुल्या संगतीं सतत वसावें ॥
दुःख पडे तरी सहन करावें ॥
निश्चय हा माझा ॥ १ ॥

प्राणनाथ, या निश्चयापासून मीं कधींहि ढळणार नाहीं.

नलः—अहाहा प्रिये,—

॥ साकी ॥

धन्य असे तुज पत्नी-धर्मा योग्य बजाविशि कांते ॥ ऐशा ललना असतां पुरुषा दुःखहि सुखकर होतें ॥ भार्ये चल जाऊं ॥ आतां वन-पथ तो सेवूं ॥ १ ॥

(जातात.)

प्रवेश ६ वा.

स्थलः—जंगल रस्ता.

पात्रें:—नल, दमयंती, पक्षीरूपानें कलि व द्वापर.

नलः—प्रिये, विपत्काल प्राप्त झाला असतां, कोणीहि कामीं येत नाहीं. याचा अनुभव आपणांला खरोखर आला! पहा नगरवासी जनांनीं त्या पुष्कराच्या भीतीस्तव आपला समाचारहि घेतला नाहीं. त्यामुळें तेथून निघून आज बरेच दिवस झाले, या निर्जन प्रदेशांत केवळ उदकावर निर्वाह करून आहोंत! कंदमुळेंहि दृष्टीला पडत नाहींत! याला काय करावें?

दमयंती:—प्राणनाथ, माझे प्राण तर क्षुधेनें व्याकूळ झाले आहेत. मला आतां मूर्च्छा येऊं पाहत आहे.

(इतक्यांत कलि व द्वापर पक्ष्याचे रूपानें अग्रभागीं प्राप्त होतात.)

नलः—(आनंदानें) प्रिये, घाबरूं नकोस; देवाला दया आली. पहा, हे सुवर्णासारख्या पंखांनीं युक्त पक्षी आपल्या अग्रभागीं दाखल होऊन निश्चल बसले आहेत. तेव्हां यांच्यावर वस्त्र टाकून हळूच युक्तीनें यांला धरतों. म्हणजे भक्ष्याला उपयोगीं पडून, शिवाय यांच्या सुवर्णपंखांचें द्रव्यहि उपयोगी पडेल !

(*नेसलेलें वस्त्र सोडून पक्ष्यांवर टाकतो, तोंच त्यासह पक्षी उडून जातात व आकाशांत जाऊन)

पक्षीः—हे मूढमते नला, आम्ही फासे असून, तुझें वस्त्र हरण करण्याच्या इच्छेनें या स्थलीं आलों होतों. कारण, तुझ्याबरोबर वस्त्र असावें हें आमच्या मनाला नीट वाटेना ! म्हणून हा डाव साधला !

(नल निराशपूर्वक लज्जित दृष्टीनें दमयंतीकडे पाहतो, तोंच दमयंती आपलें अर्ध वस्त्र त्यास नेसविते.)

नलः—प्रिये, ज्यांच्या कोपामुळें मी ऐश्वर्यापासून भ्रष्ट झालों, त्या ह्या फाशांनीं माझें वस्त्र हरण केल्या-मुळें तर माझ्या संकटाची अगदीं कमाल झाली आहे ! म्हणून नाइलाजानें तुला सांगतों तें नीट लक्ष्यांत घे. अवंती आणि ऋक्षवान् पर्वत ह्यांवरून हे अनेक मार्ग दक्षिणदेशाला जात आहेत; हा विंध्याद्रि महापर्वत आहे; ही समुद्रगामिनी पयोष्णी नदी आहे; हा मार्ग

*या स्थलीं आंतून मांडचोळण्याचा उपयोग करावा.

तुझ्या विदर्भदेशाला जात आहे; हा दुसरा मार्ग कोसल देशाकडे जात असून, याच्यापुढें दक्षिणेला हा दक्षिणापथ देश आहे.

दमयंती:—(अश्रुयुक्त) राजन्, आपला उद्देश मी समजलें; पण राज्यापहार होऊन, वस्त्ररहित आणि क्षुधा व श्रम यांनीं व्याप्त अशा आपल्याला निर्जन वनामध्यें सोडून मी विदर्भ देशाकडे कशी बरें जाऊं? महाराज, ह्या घोर वनामध्यें मी आपले श्रम परिहार करीन. कारण, दुःखप्रसंगीं भार्येसमान मित्र व औषध नाहीं. हें आपण लक्ष्यांत घ्यावें. त्यांतून मीं माहेरच्या माणसांकडे जावें अशीच आपली इच्छा असेल, तर आपण उभयतां बरोबरच विदर्भ देशाला जाऊं. प्रियकरा, विदर्भ राजा आपला सत्कार करील.

नल:—हे चातुर्यकलिके, जसें तुझ्या पित्याचें राज्य आहे, तसेंच माझेंहि राज्य निःसंशय होतें. यास्तव संकटग्रस्त असा मी श्वशुरगृहीं तर जाणारच नाहीं. मी समृद्धस्थितीमध्यें तिकडे येऊन तुझा हर्ष वृद्धिंगत करण्याला कारणीभूत झालों असतां, आतां वैभवापासून नष्ट झालेलों, असा तेथें येऊन तुझा शोक वृद्धिंगत करण्याला कसा कारणीभूत होऊं? असो, आतां:—

॥ दिंडी ॥

जाइ अस्तासी भानु पहा कांते ॥
निशा स्वागमनालागि सूचवीते ॥
पाहिं विश्रांतीस्थल दुरी दिसे तें ॥
क्रमूं रजनी चल जाउं त्वरित तेथें ॥

(जातात.)

प्रवेश ७ वा.

स्थलः——जंगलरस्ता.

पात्रेंः—कलि.

कलिः—हं, आतां हीं नल व दमयंती निद्रा घेण्यासाठीं त्या पलीकडच्या खोपटाकडे गेलीं आहेत. तरी दमयंतीला गाढ निद्रा लागतांच तिचा त्याग करण्याची प्रेरणा नलाच्या हृदयांत उत्पन्न केली पाहिजे. बरें पण, हीं एक वस्त्र नेसलेलीं आहेत; तेव्हां तें कापण्याकरितां तलवारीचें साधन निद्रास्थानीं असण्याची अवश्यकता आहे. तर आतां तेथें तलवार ठेवण्याकरितां जावें. (जातो)

प्रवेश ८ वा.

स्थलः——जंगल-झोंपडी.

पात्रेंः—नल व दमयंती (निद्रिस्थ)

नलः——या रंभोरूला आंग टाकतां क्षणींच पहा कशी गाढ निद्रा लागली आहे ती! हिच्या सत्त्वाची परमावधि झाली आहे. माझ्या अविचारामुळेंच हिला हें असह्य दुःख सहन करावें लागत आहे. आतां तर हें मला मुळींच पाहवत नाहीं. ह्मणून हिला येथेंच अशा निद्रावस्थेमध्यें सोडून आपण चालतें व्हावें; ह्मणजे ही मार्ग क्रमितां क्रमितां केव्हां तरी माहेराला जाऊन पोहोंचेल. व तेथें सुखी तरी होईल. या विश्वासघाती कृत्याबद्दल ही मला दोष देईल, तर खुशाल देवो. पण माझ्याबरोबर हिनें यापुढें तरी दुःख भोगावें हें मला

मुळींच संमत नाहीं. काय करावें ? पण मी व ही एक वस्त्र नेसलेलों आहोंत; तेव्हां हें फाडावें कसें ? या वेळीं येथें फाडण्याचें साधन मिळतें, तर किती बहार झाली असती ! (इकडे तिकडे पहातो. तों एक नग्न तलवार कलीनें ठेविलेली त्याच्या हातीं लागते) अरे वा ! ही जवळच तलवार पण सांपडली आहे. यावरून परमेश्वराचा संकेत असा दिसतो कीं, मी व हिनें वियोगी व्हावें. (अश्रुपूर्वक) शिव शिव !:—

पद—(चालः—विलासिनी ही)

प्रिया पहा एकलि वनिं या ॥ सिद्ध कसा मी
होई त्यजाया ॥ ध्रु० ॥ रम्य मनोहर सौंदर्याची ॥
खनिच असे जी प्रेम-रसाची ॥ सद्वर्तनिं मज
तोषवि साची ॥ सु-मूर्ति केवल जी सत्त्वाची ॥
त्यागि हिला पहा संकट-समया ॥ १ ॥

असो, आतां मन घट्ट करून योजिलेला हेतु पार पाडिलाच पाहिजे. (वस्त्र कापून जाऊं लागतो,) पण मोहानें मागें वळून) काय करावें ? माझें पाऊल उचलत नाहीं. मीं ही खाटिकासारखी या गाईची मान कापून येथून कृष्णवदन करणें हें किती तरी नीच कृत्य होय ! (जवळजाऊन):—

पद—(चालः—(मजला वरिल सुभद्रा)

कांते, त्यागीं तुजलागी ॥ निष्ठुर होऊनी ॥ध्रु०॥
निद्रित तुजला टाकुनिया ॥ जाईं सखये मी
येथुनिया ॥ किति तरि निंद्य-कृती या समया ॥
आचरिं मी अदयपणीं ॥ १ ॥ नोहे हा पति तव
वैरी ॥ तुजला त्यागुनिया कांतारीं ॥ बुडवी
दुःखोदधि माझारीं ॥ मान तुझी गे चिरुनी ॥ २ ॥

अरेरे ! ही अर्ध वस्त्रानें आच्छादित असलेली सुहास्यवदना सुंदरी जागी झाल्यावर कशी बरें बावरल्यासारखी होऊन जाईल ! क्रूर श्वापदांनीं सेवित अशा या घोर वनामध्यें हिनें एकटीनें कसा बरें संचार करावा ? (अगदीं नजिक जाऊन) हे कल्याणी, तूं धर्मपरायण आहेस, यास्तव आदित्य, वसु, रुद्र आणि मरुद्गणांसहवर्तमान अश्विनीकुमार हे तुझें रक्षण करोत. असो. प्रिये, आतां येतोंच. (अश्रुपूर्वक तिच्याकडे पहात पहात निघून जातो.)

(नंतर दमयंती जागृत होते व अर्ध वस्त्र फाडलेलें आहे असें पाहून घाबरून)

दमयंतीः—अगबाई पहाट झाली ! पण हें काय ? हें अर्धें वस्त्र कोणीं फाडिलें ? आणि प्राणनाथ कोठें गेले ? (इकडे तिकडे आसपास शोधिते) अगआई ! शेवट मला निजजीला टाकून निष्ठुर अंतःकरणानें चालते झालेना? (मोठ्यानें आक्रोशपूर्वक) हारे! प्रारब्धा, या वनवासामध्यें आह्मी कसें तरी एकत्र राहून दुःखानें दिवस काढित होतों, तेंहि तुला आवडलें नाहींना ?

पद—(चालः—(हतभागिनी मी ठरलें)

हत-दैवा मी बनलें ॥ या दुर्धर-विपिनीं कांतें त्यागियलें ॥ हाय ! हाय ! हाय ! हाय ! ॥ध्रु०॥ पति असुनि दया-घन निष्ठुर कां झाले ? ॥ मज संकट-डोहीं लोटुनि कां गेले ? ॥ हाय ! हाय ! हाय ! हाय ! हत-दैवा० ॥१॥ मज कांहिं सुचेना मनिं मी घाबरलें ॥ पद नुचले माझें त्राण कांहिं नुरलें ॥ हाय ! हाय ! हाय ! हाय ! ॥ हत-दैवा० ॥ २ ॥ हें पूर्व-जन्मिचें पातक कीं

फळलें ॥ पति-विरह-पंकिं कां ह्मणुनी मी रुतलें ॥ हाय ! हाय ! हाय ! हाय ! ॥ हत-दैवा० ॥ ३ ॥

प्राणनाथ, आपण धर्मज्ञ असून, स्वयंवराच्या वेळीं भरसभेमध्यें देवांसमक्ष माझें पाणिग्रहण करून, प्रतिज्ञा घेतली होतीना, कीं मी हिचें रक्षण करीन. तर मग त्या प्रतिज्ञेचा यावेळीं विसर कां बरें पडला ? (थांबून व वृत्ति पालटून) छेः, प्रियकरा, असा वचनभंग आपल्या हातून होणार नाहीं. आपण या दासीच्या विनोदार्थच असा प्रकार करून खास कोठें तरी दृष्टि आड लपले असावेत ! मघां मला सांपडलां नाहींत; पण आतां मात्र नक्की शोधून काढितें. (पुन्हां चोहों-कडे शोधिते) छेः, कसूचे सांपडतात ? मी अगदीं वेडी ! मला वाटलें, कीं ही त्यांनीं थट्टा आरंभिली असावी. पण ही थट्टा नाहीं, हा खरोखरच या दीन अबलेवर भयंकर घाला होय ! प्रियकरा, आतां हा वियोग कसा बरें सहन करूं ? (मूर्च्छित पडते व कांहीं वेळानें सावध होऊन) हा संकटाचा डोंगर माझ्यावर एकदम कोसळावाना ? हरहर !:—

पद—(चालः—(खचित खचित हें)

मजसि कुणिच या संकटिं त्राता ॥ खचित नसे, दुर्धर या विपिनीं ॥ कंठुं कशी दुःखासी नाथा ॥ ध्रु० ॥ भासत नाहीं गति ती मज बरि ॥ कां नच वपु ही प्राणा त्यजि तरि ॥ सुख नच जगिं वाचूनी आतां ॥ १ ॥

असो; आतां मार्ग क्रमूं लागावें. (जाते)

प्रवेश ९ वा.

(प्रसंगीं गाळण्यालायक)

स्थलः—जंगल रस्ता.

पात्रेंः—व्याध.

व्याधः—

॥ लावणी ॥

मी फिरे, वनीं बहु वेळ परी मज शिकार मुळीं ना जडे ॥ श्रम होति मला अनिवार किती तरि दिवस पहा हा चढे ॥ उपवासि मुलें लेंकरें घरीं किति त्रास जिवासी पडे ॥ मन होइ उदासिन फार ॥ अजी बहु दुष्ट शकुन हा घडे ॥ १ ॥

काय करावें? इतका वेळ झाला, तरी शिकार कशी ती सांपडत नाहीं! आज माझें मनहि फार उदास झालें आहे. यावरून कांहीं तरी संकट ओढवणार असें भासत आहे. असो, आतां अगदीं शेवटचा प्रयत्न ह्मणून पुन्हां एकदां बरेंच दूर जाऊन शिकार शोधावी. (जातो)

प्रवेश १० वा.

(प्रसंगीं गाळण्यालायक व्याधनिधना पावेतों.)

स्थलः—जंगल.

पात्रेंः—दमयंती (अजगरानें कंठगत ग्रस्त केलेली) व व्याध.

दमयंतीः—प्राणनाथ, धांवा हो धावा. या आपल्या प्रिय अबलेला हा दुष्ट अजगर ग्रासून टाकीत आहे. या वेळीं आपल्यावांचून याच्या मुखांतून मला

कोण बरें सोडवील ? (थांबून) प्रियकरा, कां बरें धांवून येत नाहीं ? माझा यानें ग्रास केला व जर आपल्याला नष्टचर्य संपून सुखाचे दिवस आले, आणि आपल्याला माझें स्मरण झालें, तर पुनर्भेटीच्या निराशेनें आपण किती बरें दुःखी व्हाल ? प्राणनाथ, मी जिवाच्या आशेनें हा विलाप करीत नाहीं, तर माझ्या अभावानें आपल्याला कायमचा असह्य विरह सहन करावा लागेल; या दुःखानेंच मी हा आपला धावा करीत आहें. प्रियकरा, माझा हा कंठशोष अद्याप आपल्या श्रवणांत येत नाहीं काय ?

पद—(चालः—मन माझें)

प्रिय कांता, झडकरि धांवा ॥ झाली दुःखी दासी
ही ॥ वपु ग्रासी अजगर माझी ॥ रक्षा आपण
लवलाही ॥ ध्रु० ॥ काळाच्या सदनीं जाई ॥
यावें त्वरितचि हो पाहीं ॥ जरि होई निधनचि
माझें ॥ मग तो संगम ना होई ॥ १ ॥

व्याधः—(पडद्यांत) अरेरे ! कोण दुःखी प्राणी आहे ? (पडद्याबाहेर त्वरेनें येऊन अजगराला शस्त्रानें चिरितो व दमयंतीला त्यापासून मुक्त करून, मोहानें) हे हरिणाक्षी, तूं कोणाची स्त्री ? तुझें वस्तिस्थान कोणतें ? व या निबिड अरण्यामध्यें तूं एकटी कशी प्राप्त झालीस ? हें मला निवेदन कर.

दमयंतीः—(तिरस्कारानें) अरे, भाषणारंभींच एकाकीं तूं परस्त्रीला हरिणाक्षी हें विशेषण योजिलेंस, हें गैर केलेंस. असो, या हतभागिनीचा वृत्तांत श्रवण करण्याची तुझी इच्छाच आहे, ह्मणून सांगतें कीं, मी महाविख्यात अशा निषधपति नलराजाची स्त्री

असून, दैवयोगानें माझ्या भर्त्याला द्यूत खेळण्याची बुद्धि झाली, व त्यांत त्यांनीं सर्व राज्य हरविलें. त्यामुळें आह्मां उभयतांलाहि एक वस्त्रानिशीं वनवास सेवावा लागला! पण माझें असह्य दुःख पतींना पहावेना; ह्मणून ह्मण, किंवा त्यांच्या बुद्धीला विपर्यास झाला ह्मणून ह्मण; त्यांनीं काल रात्रीं एकाएकीं झोंपेमध्यें माझा त्याग केला व ते कोणीकडे चालते झाले! नंतर मी विलापानें मार्ग क्रमित असतां, अकस्मित् या अजगरानें मला गिळण्याला आरंभ केला; त्यामुळें मी पतीचा धावा करीत असतां, तूं धांवून येऊन माझी सुटका केलीस; यामुळें मी तुझी फार आभारी आहें!

व्याधः—सुंदरी, तुझें वृत्त फारच हृदयद्रावक आहे. त्यावरून तुझा पति घातुक आहे असें सिद्ध झालें. पण आतां तुझ्या दुःखाचा अंत झाला समज. कारण, ईश्वरानें तुझ्या कैवारासाठीं मला पाठविलें आहे. तर आतां तूं माझ्याबरोबर माझ्या घरीं चल. मी तुझा चांगला संभाळ करीन. (कामुकदृष्टीनें पाहतो)

दमयंतीः—(स्वगत) काय करावें? याच्या वर्तनावरून याचें अंतःकरण पापी दिसतें. तर मग आगींतून निघून फोपाट्यांतच पडलें ह्मणायची! (उघड!) अरे मदांधा, तुझ्या वेषावरून तूं व्याध दिसत आहेस. अर्थात् धंद्याप्रमाणेंच तुझें हें वर्तन ह्मणायचें! पण तुझ्या या लाघवी जाळ्यांत सांपडणारी ही शिकार नाहीं असें पक्कें समज. तूं माझ्या पतीला घातुक हें विशेषण देत आहेस, पण ते तसे नाहींत. माझ्या दुर्दैवानेंच त्यांच्या हातून माझा त्याग घडला आहे-

आतां तुझें भाषण व तुझी ही चंचलवृत्ति लक्ष्यांत घेतली तर, तुझ्या अंतःकरणांत दुर्वासनेचें बीज आहे, असें दिसत आहे. पण मी सिंहाची स्त्री असून सद्धर्मपरायण आहें, हें तुला स्पष्ट सांगतें. ह्मणून तूं मुकाट्यानें लवकर येथून चालतें व्हावें यांतच तुझा शहाणपणा व कल्याण आहे.

व्याधः—हे सरोजवदने, या वेळीं तुझ्या चेहऱ्यावर चमकत असलेली ही रोषाची छाया किती तरी मनोहर दिसत आहे! सुंदर स्त्रियांचें हास्य, क्रीडा, विनोद किंवा रोष हीं सर्वच कांहीं गोड असतात! असो, तूं ह्मणतेस, मी सिंहाची स्त्री असून, सद्धर्मपरायण आहें. पण तुझ्या या बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं. पहाः—

पद—(चालः—वसंतीं बघुनि)

पति तव त्यागुनिया तुजला ॥ गेला पुनरपि भेटे नच कीं कोण्या समयाला ॥ ध्रु० ॥ यास्तव ऐके वचनाला ॥ स्व-मनीं आतां लेशहि त्याच्या न करीं स्मरणाला ॥ दिधलें प्राण-दान तुजला ॥ मीच खरोखर पात्र सखे गे यास्तव प्रेमाला ॥ ह्मणुनी सोडुनि रोषाला ॥ हो अर्धांगी, माझी सखये देइन सौख्याला ॥ १ ॥

तर हे मानिनी, हा वृथाभिमान सोडून माझा स्वीकार करच. (जवळ जाऊन) कसें काय, येतें कां लक्ष्यांत ?

दमयंतीः—(क्रोधानें) हं, दुष्टा दूर हो. अरे नीचा,:—

॥ पद ॥

पापाचा तूं पुतळा केवळ अ-विचारी मोठा ॥ ह्मणुनी ऐसे कु-शब्द शिवती, व्याधा, तव होटा

॥ध्रु०॥ परि नागिण-पुच्छीं पद देतां, परिणामचि खोटा ॥ मत्कोपानल जरि पेटे का, होइल तव तोटा ॥ १ ॥

अरे, तूं मला प्राणदान दिलेंस, ह्मणूनच हा वेळ-पावेतों मीं क्षमा धारण केली आहे. नाहीं तर तुझ्या मुखांतून कुशब्द उच्चार होतांक्षणींच माझ्या कोपानलानें तुझी आहुति खास घेतली असती. म्हणून असा प्रसंग न आणितां शुद्धीवर येऊन मुकाट्यानें येथून चालता हो कसा!

व्याधः—प्रिये, या चेष्टा पुरे कर; व तुझ्या साध्वीपणाचा डौल क्षणभर बाजूला ठेवून, प्राणदाना-सारख्या महत्वाच्या मोबदल्यादाखल एक वेळ तरी या एकांतस्थलीं संगमसुख देच; मग पाहिजे तर मी येथून तत्काळ जाईन. (हात धरावयास जातो.)

दमयंती:—(कोपानें)

॥ पद ॥

स्पर्शा नच करि, त्वरित तुजसि शापिन अ-धमा ॥ ध्रु० ॥

व्याधः—वपुसि दहन ॥ करित मदन ॥ सखि झणिं करिं स-दय सु-मन ॥ मन अधिरचि होइ बहुत ॥ रति-सुखिं मम ॥ सुख-विंच मन ॥

दमयंती—शापिन अधमा ॥ स्पर्शा० ॥ १ ॥

व्याधः—त्यजुनि कोप ॥ मदन-ताप ॥ शमविंच सखि ॥ तिळ न पाप ॥ सुख तुजसिहि होइ खचित ॥ पदिं नत तव ॥ करिं उपकृति ॥

दमयंती:—शापिन अधमा ॥ स्पर्शा० ॥ २ ॥

व्याधः—प्रिये, मदनानें तर मला अगदीं वेडें केलें आहे; व तूं तर दुराग्रहाला पेटली आहेस. तेव्हां या वेळीं बलात्काराखेरीज गत्यंतरच नाहीं. (अंगाला स्पर्श करावयाला जातो.)

दमयंतीः—(क्रोधानें) दुष्टा, माझ्या प्रखर अशा पातिव्रत्यप्रभावानें गतप्राण होऊन पड.

व्याधः—हाय ! मेलों ! (गतप्राण होऊन पडतो.)

दमयंतीः—

पद—(चालः—किति सांगुं तुला)

किति कोप करी ॥ प्रभुराय पहा ॥ ध्रु० ॥ मी पापी खरी ॥ या वेळिं महा ॥ किति नीच तरी ॥ मद्दैव अहा ! हत-भागि पुरी ॥ छळि तापचि हा ॥ मन बहु बावरे ॥ कधिं भोग सरे ॥ धृती नूरे ॥ १ ॥

असो, आतां पुढें मार्ग क्रमूं लागावें. (जाते)

प्रवेश ११ वा.

स्थलः—जंगलरस्ता.

पात्रें:—दमयंती, शुचि व व्यापारीसमाज.

दमयंतीः—(जंगल रस्त्यावर येऊन) अगबाई ! हा समोरून अरण्यराज सिंह माझ्याकडे रोंख धरून येत आहे. बरें पण, आतां मी याला भीत नाहीं. मला अगदीं जिवाचा कंटाळा आला आहे. म्हणून मीच चालून त्याच्याजवळ जातें. (जवळ जाऊन) हे मृगाधिपते, तूं या अरण्याचा राजा आहेस, तर माझा भर्ता नलराज तुला आढळला काय ? तुला जर

सांगायचें नसेल, तर मला खाऊन टाक. (सिंह निघून जातो) काय ? हा उत्तर न देतां मुकाट्यानें चालता झाला ? असो, आतां मी या समोरच्या पर्वताला विचारून पाहतें. हे भगवन् पर्वतश्रेष्ठा, तुला मी नमस्कार करितें. माझा भर्ता वीरसेनपुत्र नलराज तूं पाहिला असला तर सांग. काय ? हाहि उत्तर देत नाहीं ? बरें, आतां या समोरच्या अशोक वृक्षाला विचारतें. बा अशोका, तूं अशोक ह्मणजे शोकनाशन करणारा आहेस; तर माझ्या भर्त्याचा शोध लावून माझी येथून आनंदानें बोळवण कर बरें. छेः, यानें पण मौनच धरिलें आहे. (कान देऊन) बरें, पण हा मनुष्यांचा गलबला जवळच कोठें ऐकूं येत आहे ! (अंमळ स्तब्ध उभी राहते. तोंच कांहीं व्यापारीसमाज तिचे नजिक येतो, व तिला पाहून भयानें स्तब्ध उभा राहतो. नंतर त्यांतील अध्यक्ष शुचि तिला विचारतो.)

शुचिः—हे कल्याणी, या भयंकर अरण्यांतली तूं वनदेवता आहेस ? किंवा कोणी यक्षिणी अथवा राक्षसी आहेस तें सांग. तुला पाहून आह्मी भयग्रस्त झालों आहोंत.

दमयंती:—आपण ह्मणतां, त्यांपैकीं मी कोणीहि नाहीं. मी मानुषी स्त्री असून, वीरसेनपुत्र नलराजाची भार्या आहें. ईश्वरी कोपानें उभयतां स्त्रीपुरुषें वनवास भोगीत असतां पतीचा व माझा वियोग झाला आहे. म्हणून मी त्यांच्या शोधार्थ हिंडत आहें. तर मग तुह्मी सांगा पाहूं त्या माझ्या नल भर्त्याला कोठें अवलोकन केलें आहे काय ?

शुचिः—हे साध्वी, आमच्या अवलोकनांत तो नलराजा मुळींच आला नाहीं.

दमयंतीः—बरें पण, तुह्मी सर्वजण कोणीकडे चाललां आहां?

शुचिः—आह्मी व्यापारासाठीं चेदीराजा सुबाहु याच्या नगराला जात आहों.

दमयंतीः—(स्वगत) वा ! तो तर माझा मावसभाऊ. तर आतां अज्ञातपणानें मावशीच्या घरींच कांहीं दिवस वास्तव्य करायला जावें. (उघड) तर मग मीहि तुह्मांबरोबर येतें. तेथें माझ्या भर्त्याचा शोध लागला तर ठीकच आहे.

शुचिः—बरें आहे, चल. (जातात.)

प्रवेश १२ वा.

स्थलः—दिवाणखाना.

पात्रेंः— राजमाता—(दमयंतीची मावशी)
सुनंदा—(दमयंतीची मावसबहीण)
लवंगिका—दासी.
दमयंती.

लवंगिकाः—आईसाहेब, वाड्याशीं कोणी एक कृश, मलिन वस्त्र परिधान केलेली, परंतु अतिशय कांतिमान् अशी तरुण स्त्री आपल्या भेटीची इच्छा करीत आहे.

सुनंदाः—जा तिला येथें घेऊन ये.

लवंगिका:--जी ताईसाहेब. (जाते व दमयंतीला घेऊन येते.)

दमयंती:--मातुश्री, मी आपल्याला वंदन करितें.

राजमाता:--अष्टपुत्रासौभाग्यवतीभव. मुली, तूं कोणीकडून आलीस? फार कष्टी दिसतेस! तर आपलें वृत्त सांग पाहूं.

दमयंती:--मातुश्री:--

पद--(चाल:--बल-सागर)

हत-भागी ही कन्या घेई क्षात्र-कुलीं जनना ॥
वैभव-सद्गुण-युत-पति माझा ख्यात जगीं जाणा
॥ ध्रु० ॥ काल-गतीनें शत्रू द्यूतीं करि वैभव-हर-
णा ॥ मग वनवासी आह्मी झालों, सुख तिळ
तें मुळिं ना ॥१॥ दैव-गतीनें पति निद्रेंतचि त्या-
गिति ही ललना ॥ यास्तव हिंडे पति-शोधार्था
भाकित प्रभु-करुणा ॥ २ ॥

सुनंदा:--बरें पण हें वृत्त तूं मोघम सांगितलेंस; सगळी खरी हकीकत सांगेनास?

दमयंती:--ताईसाहेब, संकटसययीं कुलवानांनीं आपलें वृत्त गुप्त ठेवणेंच इष्ट आहे. म्हणून याविषयीं जास्त विचारपूस न करण्याबद्दल माझी विनंति आहे.

राजमाता:--बरें मुली, तूं या सुनंदेची सखी होऊन आमच्याजवळ राहतेस का?

दमयंती:--हो, मी आपल्या आश्रयासाठींच आलें आहें. पण माझ्या कांहीं अटी आहेत; त्या संरक्षण झाल्या पाहिजेत.

सुनंदा:--सांग बरें कोणत्या अटी आहेत त्या?

दमयंतीः—मी कधीं कोणाचें उच्छिष्ट भक्षण करणार नाहीं, नेसलेलें वस्त्र नेसणार नाहीं; व ब्राह्मणांखेरीज इतर पुरुषांशीं कोणत्याहि प्रसंगीं भाषण करणार नाहीं. जो कोणी माझा अभिलाष इच्छील, त्याला शासन करावें लागेल. व एक वेळ शासन करून तो न ऐकेल, तर प्रसंगीं त्याचा वधहि केला पाहिजे.

सुनंदाः—या अटी चमत्कारिक तर खऱ्याच, पण हे सुशीले, या संपूर्ण पाळल्या जातील समजलीस ?

दमयंतीः—तर मग मी संतोषानें राहतें.

सुनंदाः—लवंगिके, जा. माझ्या ह्या नूतन सखीला स्नान घाल, व हिच्या भोजनाची लवकर तयारी कर. तोंपर्यंत मी व आई सुबाहुदादाकडे जाऊन येतों. चल, आई दादाकडे जाऊन येऊं.

राजमाताः—ठीक आहे चल. (जातात.)

लवंगिकाः—(दमयंतीला) चलावें बाई स्नानाला.

दमयंतीः—ठीक आहे. (स्वगत):—

पद—(चालः—या विरहा)

काय दशा मज आली ॥ प्रभुजी० ॥ध्रु०॥ वैभव जाउनि पर-गृहिं वसलें ॥ मरण-तुल्य स्थिति झाली ॥१॥ विधिनें ऐशा लेखा लिहिलें ॥ काय ह्मणुनि मम भालीं ॥२॥ नष्ट-चर्य हें केव्हां संपे॥ तूंच प्रभू मज वाली ॥ ३ ॥

प्रवेश १३ वा.

स्थलः—महाल.

पात्रें:—भीमक, इंद्रसेन, इंद्रसेना व सुदेवदीक्षित.

इंद्रसेनः—(भीमकास) आजोबा, मला व इंद्र-

सेनेला इकडे येऊन फार दिवस झाले. तरी अद्याप आई इकडे कां बरें आली नाहीं ?

भीमकः—कां रे इतका कां खंतावलास ?

इंद्रसेनाः—तिनें तर आमच्या मागाहून लवकरच येण्याचें कबूल केलें होतें. मग अजून कां बरें आली नाहीं आजोबा ?

भीमकः—कांहीं कारणामुळें नसेल आली.

इंद्रसेनः—आजोबा, तर मग आह्मांला आतां आमच्या आईकडे पोहोंचवा किंवा तिला तरी येथें आणा.

भीमकः—(स्वगत) काय करावें ? हीं मुलें तर आईविषयीं फार खंतावलीं आहेत.

इंद्रसेनाः—तिच्यावांचून मला तर मुळींच करमत नाहीं. तिला केव्हां पाहीन असें झालें आहे.

भीमकः—(डोळ्यांत अश्रु आणून व मुलांचे तोंडावरून हात फिरवून) बाळांनो, तिला लवकर बोलावण्याची तजवीज करतों बरें. शिव शिव ! हे नृपशार्दूला नला, तुला द्यूत खेळण्याची बुद्धि कशी झाली ? व राज्य गमावून तूं दुर्दैवाच्या फेन्यांत कसा रे सांपडलास ? बाळे दमयंती, तूं ज्याबरोबर मुलें इकडे लावून दिलींस, त्या वार्ष्णेय सारथ्यानें जेव्हां द्यूताची हकीकत सांगितली, तेव्हांच मी पुढील भविष्य समजलों. पुढें तपासांतीं तुह्मीं उभयतां वनवासार्थ गेलां आहां असेंहि समजलें. पण इकडे कां बरें आलां नाहींत ? इतका संकोचितपणा बाळगून व मुलांचाहि वियोग सहन करून, वनवास कसा बरें सेवन केलात? वत्से दमयंतीः—

पद—(चालः—वद् जाउं कुणाला)

तुज बाळपणीं लेशही खचित तें नसे दुःख ठावें॥
कां अतां वना जावें ॥ अगे बाळे ॥ ध्रु० ॥ तव
तात-सदन असुनियां, पतीसह सुते कां न यावें॥
कां दुःख शिरीं घ्यावें॥ अगे बाळे ॥ १ ॥ हीं
जनक-जननि तव मुलें यांसि भेटुनी सौख्य द्यावें॥
तो ईश कधीं पावे॥ अगे बाळे ॥ २ ॥

असो, आतां चोहोंकडे शोधाकरितां ब्राह्मण पाठवावे, ह्मणजे त्यांच्या द्वारानें खास तपास लागेल असें वाटतें. पण ही व्यवस्था सुदेवदीक्षितांच्या द्वारानेंच केली पाहिजे. कोण आहे रे तिकडे ?

सेवकः—जी सरकार.

भीमकः—जा, आतांच सुदेवदीक्षितांला घेऊन ये.

सेवकः—जी सरकार. (जातो व सुदेवासह येतो)

सुदेवः—महाराजांचा विजय असो. सरकार; कां पाचारण केलें ?

भीमकः—दीक्षित, सुता दमयंती व नल यांच्या शोधासाठीं तुह्मीं देशोदेशीं अनेक खात्रीलायक ब्राह्मण पाठवा! त्यांची फार चांगली संभावना करण्यांत येईल. तसेंच तुह्मीं स्वतःहि त्यांच्या तपासासाठीं जा.

सुदेवः—ठीक आहे महाराज, आपण अगदीं चिंता सोडावी. आपल्या आज्ञेप्रमाणें आतांच देशोदेशीं अनेक ब्राह्मण पाठवितों, व मीहि स्वतः गमन करितों. बहुधा खात्रीपूर्वक शोध लागल्याखेरीज राहणार नाहीं. येतों तर आतां.

भीमकः—फार उत्तमः—

॥ साकी ॥

ईश-कृपेनें सद्यश घेउनि यावें झडकरि परतें ॥
चिंतानल शमवुनियां अमुचा, द्यावें आनंदातें ॥
हेतू हाचि खरा ॥ करावा आपण त्वरित पुरा ॥

(पडदा पडतो)

अंक ४ था समाप्त.

अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

स्थलः—जंगलरस्ता.

पात्रेंः—कर्कोटक व नल.

नलः—शिव शिव ! मी त्या विदर्भकन्यकेला आज बरेच दिवस सोडून निघालों; पण मला तिच्या-वांचून एक पळ युगाप्रमाणें भासत आहे ! मी अति कंटक खरा. ती सुंदरी, निद्रेंतून जागी झाल्यावर तिनें किती बरें आकांत केला असेल ?:—

पद—(चालः—अशि ही सु-गुण खनि)

कशि ती परम-सति योग्य सु-शीला ॥ वनिं मीं त्यजिली, न रक्षक तीला ॥ ध्रु० ॥ अर्धांगी अति सद्गुणि जी का, तोषवि चित्ता फार ॥ शांत तैशी पुण्यशीला, सद्वर्तनिं करि गार ॥ सुख होई, न पाहीं, तिलाही, जराही सखि भोगि हाला ॥१॥

अरेरे ! भयंकर श्वापदांनीं युक्त अशा घोर अर-ण्यामध्यें ती सुंदरी अद्याप जिवंत राहिली असेल काय?

पद—(चालः—कांते फार)

भार्ये प्राप्त तुला नच झालें ॥ सुख सखये कांहीं ॥ दुष्ट बहुत मी, घाताला तव ॥ योजि प्रिये अ-दय-पणिं पाहीं ॥ध्रु०॥ जरि वरिलें असतें देवांसिच ॥ स्वर्गिंचें सुख मिळतें भोगाया ॥ व्यर्थ सखे मज संगें झालिस ॥ कष्टि पहा सार्थक ना तिळही ॥१॥

असो, आतां गतगोष्टीबद्दल शोक करणें निरर्थक होय!

(इतक्यांत पडद्यांत)

कर्कोटकनागः—हे पुण्यश्लोका नला, धांव. मीं प्रचंड वणव्यांत सांपडलों आहें. तुझ्या खेरीज मला कोणी त्राता नाहीं.

नलः—काय ? मला कोण पाचारण करीत आहे ?

(पुन्हां पडद्यांत तेच शब्द)

नलः—(इकडे तिकडे पाहून, स्वगत) हं, तो बऱ्याच दूर अंतरावर वणवा पेटलेला दिसतो. त्यांतूनच हा ध्वनि येत आहे. तर त्वरेनें तिकडेच जावें. रे, मला पाचारण करणाऱ्या दुःखी प्राण्या, भिऊं नकोस. हा पहा मी आलोंच. (जातो)

(जंगल रस्त्याचा पडदा वर उचलून वणव्याचा देखावा; नल वणव्यांतून कर्कोटकनागास उचलून घेतो व पुन्हां जंगल रस्त्याचा पडदा पडतो)

नलः—(पडद्यांतून) अरेरे नागा, तुला मीं अग्नींतून वांचविलें, त्याबद्दल तूं मला दंश केलास हें काय ? तुझ्या दंशानें एकाएकीं हें माझें शरीर कृष्णवर्ण झालें आहे.

कर्कोटकनागः—(पडद्यांतून) थांब, सगळें सांगतों.

[नंतर मनुष्यरूपानें कर्कोटकनाग व नल (कृष्णवर्ण) पडद्याबाहेर येतात.]

कर्कोटकनागः—नला, मीं तुला दंश केला, याबद्दल विषाद मानूं नकोस; कारण, तुझ्या शरीरांत दुष्ट कलीनें वास केला आहे. त्याचा सूड उगविण्यासाठींच

मीं हा दंश केला आहे. या विषाची बाधा तुला न होतां, त्या कलीलाच होणार आहे. आतां तुझ्या शरीराची कांति कृष्णवर्ण झाली आहे, याबद्दल तूं शंकित झाला असशील; तर त्याचेंहि निराकरण करितों. प्रस्तुत विपत्तीकालीं तुझें रूपांतर होणेंच अवश्यक आहे. तथापि ज्या वेळीं तुला पूर्वस्वरूप धारण करण्याची इच्छा होईल, त्या वेळीं माझें स्मरण करून, हें दिव्य वस्त्र (अंगावर टाकून) शरीरावर आच्छादन करीत जा; ह्मणजे तुला पूर्ववत् दिव्य कांति प्राप्त होत जाईल. राजा, आतां तूं ' बाहुक ' हें नांव धारण करून अयोध्येचा राजा ऋतुपर्ण याच्याकडे जा, व त्याचें सारथ्य स्वीकारून, प्रसंगानुसार त्याला आपली अश्वविद्या अर्पण कर; आणि त्याला अवगत असलेली अक्षविद्या त्यापासून तूं ग्रहण कर. ह्मणजे त्या अक्षविद्येमुळें तुला दायादापासून आपलें राज्य परत घेतां येईल; व स्त्रीपुत्रांसहित तूं आनंदानें नांदशील.

नलः—

॥ साकी ॥

दिव्य-शक्ति-धारक आपण ही मजवरि उपकृति केली ॥ आभारी मी बहुतचि अपुला वंदन करि पद-कमलीं ॥ आतां दासासी ॥ कळवा अपुल्या वृत्तासी ॥ १ ॥

कर्कोटकनागः—नला, मी कर्कोटक नागराज आहें. माझ्याकडून नारदांचा उपहास घडल्यामुळें त्यांच्या शापानें मला स्थावराप्रमाणें निश्चलत्व प्राप्त झालें. नंतर त्यांची प्रार्थना केल्यावरून उःशाप मिळाला कीं, तूं नलराजाच्या हस्तस्पर्शानें पूर्वस्थिति पावशील.

त्या अन्वयेंच प्रस्तुतचा प्रसंग घडला. आतां मला त्रिकालज्ञान असल्यानें, तुझें सर्व वृत्त मीं जाणलें; व मला योग्य वाटल्यावरून मीं तुझ्यावर प्रसादहि केला. असो, आतां मीं स्वस्थलीं गमन करितों. (जातो)

नलः—(स्वगत) काय चमत्कार आहे पहा ! त्या कलीनें मला इतकें छळण्याला कांहीं तरी कारण आहे कां ? पण दुष्टच तो ! त्याच्या ठिकाणीं न्यायान्यायाचा विचार कोठला ? असो, ईश्वरी संकेतानुसारच सर्व कांहीं घडत आहे असें मनाचें समाधान मानून, त्या नामराजाच्या सांगण्याप्रमाणें पुढील वर्तनक्रम ठेवावा हें उत्तमः—

पद—(चालः—नका करूं अविचार)

अतां करूं गमनास ॥ पाहूं भू-पति ऋतुपर्णा त्या, सारथि होउनि सेवुं तयास ॥ ध्रु० ॥ गुप्तपणानें क्रमुं कालाला ॥ समय-विशेषीं तया नृपाला ॥ अर्पूं अपुली अश्व-कला ॥ तोषवुं तन्मन खास ॥१॥ त्या पासोनी अक्ष-कलेला ॥ घेऊं करूनीया विनतीला ॥ सहज पुढें जिंकूं अरिला ॥ घेउच राज्य-पदास ॥ २ ॥

(जातो)

प्रवेश २ रा.

स्थलः—महाल

पात्रेंः—सुनंदा, दमयंती, व लवंगिका. (दासी)

सुनंदाः—(दमयंतीस)प्रिय मैत्रिणी, आज सकाळीं सुबाहु दादांच्या महालांत पुण्याहवाचन झालें, त्या वेळीं, आई बरोबर तूं व मी गेलें होतों; तेव्हां तेथें ब्राह्मणांच्या

गर्दींत एक कांतिमान् ब्राह्मण तुझ्याकडे सारखी टक लावून पहात होता, तें तुझ्या लक्ष्यांत आलें कां ?

दमयंती:—हो, माझ्या लक्ष्यांत आलें, पण तो ब्राह्मण पवित्र असून त्याच्या त्या अवलोकनांत शोक आणि आश्चर्याची छाया दिसत होती. खरेंच म्हणशील, तर मला तो ओळखीचासा वाटला.

लवंगिका:—(प्रवेश करून—दमयंतीस) बाई, कोणी एक ब्राह्मण आपल्या भेटीकरितां आला आहे.

दमयंती:—येऊं दे. ब्राह्मणाचें दर्शन मला इष्टच आहे.

लवंगिका:-ठीक आहे, त्याला आंत पाठविते. (जाते)

दमयंती:–(स्वगत) तो पुण्याहवाचनाच्या वेळचा मजकडे पाहत असलेलाच तर ब्राह्मण नसेलना ? (सुदेव येतो) यावें महाराज, मी नमस्कार करितें.

सुदेव:—अष्टपुत्रा सौभाग्यवतीभव.

सुनंदा:—मी पण नमस्कार करितें.

सुदेव:—अष्टपुत्रा सौभाग्यवतीभव. (दमयंतीकडे निरखून पाहतो व दमयंतीहि त्याकडे पाहते.)

सुदेव:—(दमयंतीस) कोण, तूं भीमककन्या दमयंतीच का ?

दमयंती:—(शोकस्वरानें) कोण, सुदेवदीक्षित ? मीच ती अभागी दमयंती बरें. पण दीक्षित, आपण इकडे कोणीकडे ?:—

पद—(कालंगडा.)

मज अर्पा या समयाला ॥ श्रवणीं वृत्त-सुधेला ॥ ध्रु० ॥ जननी-जनका-भ्रात्यांला ॥ मम त्या बाळांला ॥ कुशल निरखिलें सांगा मजला ॥ तुह्मां करितें नतिला ॥ १ ॥

सुदेवः—दमयंती, सर्वहि कुशल आहेत. पण तुझ्या विरहामुळें रात्रंदिवस सर्वांना काळजी लागली आहे. प्रस्तुत तुझ्या शोधासाठीं भीमक महाराजांनीं सर्वत्र ठिकाणीं ब्राह्मण पाठविले आहेत. व मीहि त्याच उद्देशानें निघालों असून फिरतां फिरतां आज अकस्मित् तुझें मुखावलोकन होऊन सुयश आलें.

(इतक्यांत राजमाता येते)

राजमाताः—(दमयंतीस) मुली, हे भूदेव कोण? व यांची व तुझी काय ओळख ?

सुदेवः—ऐकावें आईसाहेब, मीच सांगतों. ही साक्षात् इंदिरेसमान विदर्भ नगराधिपति भीमक महाराजांची कन्या दमयंती, जी निषधपति नलराजाची भार्या असून कालगतीनें प्रस्तुत आपल्या सदनीं अज्ञातपणें वास करीत आहे. आतां हिचें रूप जरी मलानें व्याप्त आहे, तरी तें अशुद्ध सुवर्णासारखें शोभत आहे. व हिच्या भिवयांच्या मध्यभागीं नैसर्गिक असा एक उत्तम तीळ आहे; तो जरी मलानें आच्छादित आहे, तरी आभ्राच्छादित चंद्राप्रमाणें मला भासमान् होऊन मीं हिला ओळखिलें. असो, (दमयंतीस) दमयंती, आतां माझ्याबरोबर माहेराला येण्याची तयारी कर. तोंपर्यंत मी राजभेटीला जाऊन येतों. (जातो)

राजमाताः—(आश्चर्यपूर्वक सद्गदित होऊन व दमयंतीला जवळ घेऊन) काय, तूं माझ्या भगिनीची कन्या दमयंती ?

दमयंतीः—होय, मावशी, मी आपली भाची बरें.

राजमाताः—तर मग मला ओळख न देतां अशा

अज्ञातवासानें कां बरें राहिलीस? मीं तुला दशार्ण देशामध्यें माझा पिता सुदामराजा याचे घरीं जन्मलेली पाहिली होती. त्यानंतर अद्यापपर्यंत भेटीचा योगच आला नाहीं, व तुझ्या स्वयंवराच्या वेळीं अडचणीमुळें इकडून कोणाचेंच येणें झालें नसल्यानें, तुला कोणी ओळखूं शकलें नाहीं. पण तुला तर ऐकून नातें माहीत होतें?

सुनंदा:—(दमयंतीला आलिंगन देऊन) ताई, बरीच कींग आंतल्या गांठीची आहेस!:—

पद—(चाल:—घेउनि ये पंखा)

ताई प्रिय भगिनी ॥ मोठी गे कपटी तूं मनीं ॥ध्रु०॥ असुनी नृप-कन्या वसलिस तूं या स्थानीं॥ भाव दुजा गे धरुनी ॥ कपटी० ॥ १ ॥ झालिस कष्टी तूं संकोचित होऊनी ॥ योग्यचि हें तुज नसुनी ॥ कपटी० ॥ २ ॥

दमयंती:—सुनंदाबाई, विपत्तिकालीं कुलवंतानें आपला थोरपणा गुप्तच राखिला पाहिजे. म्हणून मी तशी वागलें. (राजमातेस) असो, आतां मावशी, सुदेवदीक्षिताबरोबर माझी माहेराकडे रवानगी करावी.

राजमाता:—तूं येथें नाहींच का रहात?

दमयंती:—छे:, फार दिवसांपासून माझा मुलांकडे ओढा लागला आहे, म्हणून मला आतां गेलेंच पाहिजे.

राजमाता:—बरें, तुझी इच्छा! चल तर आतां सुबाहूच्या विचारानें तुझी रवानगी करितें. (जातात.)

प्रवेश ३ रा.

स्थलः—रस्ता.

पात्रें:—बाहुक (नल) व ऋतुपर्ण.

बाहुक (नल):(स्वगत)—शिव शिव! अज्ञातवास हा किती तरी लज्जास्पद! माझ्या सारख्या नृपतीला या ऋतुपर्णाचा सारथी होऊन राहण्याची पाळी यावी ना? पण नशिबाचे तारेच कांहीं विलक्षण! असो, माझी प्रिया दमयंती हिला मीं घोर अरण्यांत निद्रावस्थेंत त्यागिल्यानंतर ती आपल्या पित्याच्या घरीं केव्हां व कशी जाऊन पोहोंचली, याचा मात्र तर्क होत नाहीं. ती साध्वी खरोखरच सहनशील होय! मी तिचा अपराधी असून, तिनें प्रेमांत यत्किंचित्‌हि अंतर न आणितां माहेराहून माझ्या शोधार्थ देशोदेशीं ब्राह्मण पाठविले. त्यांतल्याच एक पर्णाद नांवाच्या ब्राह्मणानें कांहीं दिवसांपूर्वीं राजसभेंत येऊन, मला अनुलक्षून तिनें शिकवून पाठविलेला मार्मिक श्लोक म्हटला. त्यावरून तिचें वृत्त स्पष्ट लक्ष्यांत येऊन मी त्या ब्राह्मणास त्या श्लोकाचें समर्पक उत्तर दिलें. तें त्यानें परत जाऊन माझ्या प्रियेला कळविलेंहि असेल. अर्थात् ती सुंदरी लवकरच माझ्या भेटीविषयीं कांहीं तरी चातुर्यानें घाट घालील असा तर्क वाहतो.

(इतक्यांत ऋतुपर्ण येतो)

ऋतुपर्ण:—अरे बाहुका, असा सचिंत उभा कां?

बाहुक (नल):—कोण, महाराज? या निशासमयीं सध्या स्वारीनिशीं एकटे कोणीकडे?

ऋतुपर्णः--अरे, तुझ्याचकडे. फार महत्वाचें कारण आहे ह्मणून आलों.

बाहुक (नल)ः--महाराज, अशा कोणत्या महत्वाच्या कामीं या सेवकाची जरूर पडली आहे?

ऋतुपर्णः--सांगतों ऐक. नुकतेच भीमकराजाकडून सुदेवदीक्षित येऊन गेले. त्यांनीं, " दमयंती ही पतिवियोगामुळें उदयिक पुनर्लग्न करणार आहे " असें कळवून मला पाचारण केलें आहे. त्यावरून आजच्या एका रात्रींतून इतक्या दूर प्रदेशीं नेणारा सारथी एकटा तूंच समर्थ आहेस असें पूर्ण माझ्या लक्ष्यांत येऊनच मी तुझ्याकडे आलों. तर गड्या, ती दमयंती देवी मला प्राप्त होण्याच्या कामीं या वेळीं तूं आपली अश्वकला खरी प्रत्ययाला आणिली पाहिजे.

बाहुक (नल)ः--(साश्चर्य, परंतु तत्काळ गांभीर्यानें) ठीक आहे, महाराज, आजच्या एका रात्रींतच मी वायुगतीनें रथ हांकून आपल्याला उजाडलें नाहीं तोंच विदर्भ नगराला पोहोंचवितों. याबद्दल निष्काळजी असा.

ऋतुपर्णः--जा तर, आतांच अश्वशाळेंतून अति चपल असे दोन अश्व निवडून रथ जोड. तोंपर्यंत मी पोषाक करून येतों. (जातो)

बाहुक (नल)ः--(स्वगत) काय चमत्कार पहा ! त्या माझ्या प्राणप्रिया दमयंतीच्या पुनर्लग्नाविषयींचा निरोप ऐकून हा ऋतुपर्ण कसा लालचावला आहे ! पण नुकत्याच केलेल्या तर्काप्रमाणें प्रियेनें हा सर्व व्यूह माझ्या भेटीविषयींच रचिला असावा. कारण,

पर्णादाच्या मुखानें माझा शोध समजल्यानंतर, माझ्या रूपांतराच्या शंकानिवृत्तीस्तव पुनर्लग्नमिषानें एका रात्रींतून ऋतुपर्णाला बोलाविल्यानें, त्याला घेऊन ये-णारा एकटा मीच समर्थ आहें हें तिला पक्कें ठाऊक आहे. अर्थात् माझें आगमन झालें असतां साहजिकच 'शंकानिवृत्ति होऊन, पतिसंगम-हेतु सिद्धीला जाईल' हाच तिच्या अंतरांतला आशय. (शंकितपणें) हो, पण असेंहि कां घडूं नये? कीं, माझ्यापासून तिला अति दुःख झाल्यानें, व मीं बुद्धिपुरस्सर तिचा त्याग के-ल्यानें, तिच्या मनांत माझ्याविषयीं तिरस्कार उत्पन्न होऊन तिनें पुनर्विवाहाला खरोखरच सिद्ध व्हावें ! प्रिये, अशा प्रकारानें तुझें अंतःकरण पालटलें असलें, तरी मी तुला तिळमात्र दोष देत नाहीं. कारण, सर्व-स्वी मीच दोषी आहें. पण असें घडल्यास, मी मात्र आजन्म दुःखीच राहणार हें निश्चित ! (पुन्हां विचार पालटून) छेः, पण मी त्या निष्कलंक साध्वीविषयीं अशी कुशंका काय म्हणून घेत आहें ?:—

॥ अंजनीगीत ॥

उगवे रवि तो वरुण-दिशेला ॥ शेषहि सांडिल मर्यादेला ॥ परि त्यागीना सति-धर्माला ॥ भी-मक-तनया ती ॥ १ ॥ यास्तव सोडुनि सकल कु-शंका ॥ निवडुनि चपल तुरंगम देखा ॥ जावें रात्रींतुनिया एका ॥ ऋतुपर्णा संगें ॥ २ ॥

तर आतां रथ जोडण्याकरितां अश्वशाळेकडेच जावें. (जातो)

प्रवेश ४ था.

स्थलः—निबिड जंगल.

पात्रेंः—ऋतुपर्ण (रथांत) व बाहुकः—नल (सारथी)

ऋतुपर्णः—बाहुका, धन्य आहे तुझ्या हस्तकौशल्याची! या रथाचा वेग केवळ पवनगतीलाही मागें टाकीत आहे! यावरून साक्षात् तूं इंद्रसारथी मातलीच आहेस असें ह्मणावें लागतें. अरे पण थांबः—

॥ साकी ॥

ऋतुपर्णः—स्थीर करीं रथ उत्तरीय मम वसन भूवरीं पडलें ॥

बाहुक (नल):—क्रोश चार येथुनिया आतां दूराचि तें राहीलें ॥ हातिं नये नृ-पती ॥ चाले रथ हा वायुगतीं ॥ १ ॥

(रथ स्थीर करितो)

ऋतुपर्णः—बाहुका, जसें तुझ्यांत अश्व कौशल्य आहे, तशाच मी पण दोन विद्या जाणतों. एक परिगणन विद्या व दुसरी अक्षविद्या. प्रमाणादाखल हा समोर बिभीतक वृक्ष दिसत आहे, याचीं खालीं गळून पडलेलीं पानें व फळें वृक्षावरील पानां व फळांपेक्षां एकशें एक संख्येनें अधिक आहेत; आणि दोन्हीं खांद्या मिळून पांच कोटि पानें आहेत; व दोन हजार पंचाण्णव फळें आहेत.

बाहुक (नल):—महाराज, आपण हें अगदीं प्रत्यक्ष मोजल्याप्रमाणें सांगत आहां याचें आश्चर्य वाटतें. मी खात्रीकरितां पानें व फळें मोजून पहातों.

ऋतुपर्णः—छेः, या भानगडींत तूं पडूं नकोस.

आपल्याला जाण्याला विलंब होईल. तुझी मर्जीच असेल तर मुरूक ल्हानशी डहाळी घे, व तिचीं पानें आणि फळें मोज. पानें एक हजार व फळें चाळीस भरतील.

बाहुक (नल):—(रथावरून उतरून मोजून पहातो व बरोबर भरलीं असें पाहून) महाराज, अगदीं बरोबर भरलीं. तरी आपण या परिगणन विद्येचें व अक्षविद्येचें तत्त्व मला कथन करावें. यांचे बदल्यांत मी माझ्या अश्वविद्येचें तत्त्व आपल्याला सांगतों.

ऋतुपर्णः—ठीक आहे. (एकमेकांचे कानांत सांगतात, त्याबरोबर नलाचे शरीरांतला कलि मूर्तिमंत प्रकट होऊन फक्त नलासच दिसतो.)

बाहुक (नल):—रे नीच पुरुषा, तूं रे कोण ?

कलिः—थोडासा दूर ये, म्हणजे सर्व सांगतों.

(नल व कलि कांहींसे दूर जातात)

कलिः—हे पुण्यश्लोका नला, मला कलि असें म्हणतात. दमयंतीच्या स्वयंवराकरितां मी व द्वापर जात असतां, स्वयंवरविधि आटोपून त्यांत तिनें तुला वरल्याचें वृत्त इंद्रादि देवांकडून आम्हांला समजलें. त्या विषादानें आम्हीं दोघांनीं तुला स्त्रीसहित छळिलें. व मी तुझ्या शरीरांत वास केला. पण कर्कोटकनागाच्या दंशानें, त्याच्या त्या भयंकर विषाची बाधा तुला न होतां मला भोगावी लागली. मी अद्यापहि तुझ्या शरिरांतून निघालों नसतों, पण तुला ऋतुपर्णापासून अक्षविद्या मिळाल्यामुळें मला बाहेर पडावें लागलें !

बाहुक (नल):—(कोपून) रे दुष्टाः—

॥ झंपा ॥

किती दुष्ट खल रे कली असासि कु-मती ॥ खचित तव पातका नाहिं गणती ॥ ध्रु० ॥ व्यर्थ कींरे तुवां फार केलें छला ॥ नाहिं नय तिळ तुला साच चित्तीं ॥ १ ॥ राज्य माझें तुवां द्यूतिं रे हरविलें ॥ प्रेषिलें मज कसें घोर विपिनीं ॥२॥ दुःख राज्ञीसही त्याच रीतीं दिलें ॥ शापितों तुज अतां पाप-मूर्ती ॥ ३ ॥

कलिः—हं हं नलराजः—

॥ पद ॥

मनिं दया करा ॥ मी नमीं पदां जोडुनी करा ॥ ध्रु० ॥ (चाल) शाप न द्यावा हो नृपवर्या ॥ जाचिल मज सत्वरीं खरा ॥ १ ॥ शापितां न मज कीर्ती वाढवीन अपुली ॥ अपुल्या नामा स्मरती जे का ॥ न राहिंच त्या स्थलीं जरा ॥२॥

बाहुक (नल):—(शांत होऊन) जा दुष्टा, तुला सोडतों. मात्र आपलें वचन पाळ म्हणजे झालें.

कलिः—मी सत्य वचनानेंच वागेन. आतां या बिभीतक वृक्षांत मी प्रवेश करितों. (कलि जातो व नंतर नल रथारूढ होतो.)

ऋतुपर्णः—काय रे बाहुका, बराच दूर कशाकरितां गेला होतास ? जाण्याला विलंब झालाना ?

बाहुक (नल):—महाराज, कांहीं गुप्त कार्य होतें. असो, आतां हा पहा रथ वायुगतीनें हांकितों.

(रथ निघून जातो)

प्रवेश ५ वा.

स्थलः—रस्ता.

पात्रेंः—इंद्रसेन, इंद्रसेना (दमयंतीचीं मुलें) व गुरुजी.

इंद्रसेनाः—दादा, गुरुजींनीं दिलेला कालचा धडा वाचून ठेवलास का ?

इंद्रसेनः—नाहीं, पुस्तकच कोणीं उघडलें आहे !

इंद्रसेनाः—आतां गुरुजी येतील, त्यांना काय वाचून दाखविशील ?

इंद्रसेनः—अग कसा तरी 'ट फ' करून वेळ मारून नेईन. बरें पण तूं मला विचारतेस, आणि स्वतः आपला धडा केलास का ?

इंद्रसेनाः—हो, मी तुझ्यासारखी आळशी नाहीं, माझा धडा केव्हांच झाला.

इंद्रसेनः—मोठी आली मला आळशी म्हणायला! किती केलें तरी तूं पोरीची जात. तुझी आणि माझी बरोबरी का होणार आहे ? मला पुढें राज्यावर बसायचें, आणि तुला कितीहि शिकलीस तरी एकाद्या राजाच्या राणीसाहेब बनून गोषांत दिवस काढायचे ! समजलीस ?

इंद्रसेनाः—दादा हें खरें, पण विद्या आली नाहीं तर राज्य तरी कसें चालविणार ?

इंद्रसेनः—अगे विद्या काय करायची ? घोड्यावर बसणें, शिकार करणें, दांडपट्टा फिरविणें आणि धनुर्विद्येंत प्रवीण होणें इतके गुण संपादन केल्यावर राज्य ह्मणजे हां हां ह्मणतां नाहीं का चालवितां येणार ?

इंद्रसेना:—वारे बोलका राघू! तोंडानें बोलतां येतें, पण हे तरी गुण मिळवायला मेहनत नको का करायला?

इंद्रसेन:—तूं मला राघूं बिघू म्हणूं नकोस हं. मी आईला सांगून देईन.

इंद्रसेना:—दादा असा रागावूं नकोस. मी खोटें काय बोललें? आपले गुरुजी नेहमीं नाहीं का सांगत, कीं तोडानें पुष्कळ बोलण्यापेक्षां कृतीनें थोडें तरी करून दाखवावें.

इंद्रसेन:—पुरे कर आतां हा पंडितपणा. नाहीं तर देईन चपराक.

गुरुजी:—(प्रवेश करून) काय रे इंद्रसेना, काय भांडण चाललें आहे?

इंद्रसेन:—कांहीं नाहीं, गुरुजी, ही इंद्रसेना अलीकडे चुरुचुरु बोलूं लागली आहे.

गुरुजी:—चल, तूंच भांडखोर आहेस. बरें पण कालचा कवितेचा धडा पाठ केलास का?

इंद्रसेन:—हो हो, हा पहा म्हणतों. (डोकें खाजवून व स्मरत नाहींसें दाखवून) पण पहिला शब्द सांगा.

गुरुजी:—सांग इंद्रसेने.

इंद्रसेना:—" विद्येनेंच "

इंद्रसेन:—" विद्येनेंच " (पुन्हां डोकें खाजवून) गुरुजी, पुढला शब्दहि बरोबर आठवत नाहीं.

गुरुजी:—कां रे कविता पाठच केली नाहीं वाटतें?

इंद्रसेना:—पुस्तक उघडलें असेल तर ना!

इंद्रसेन:—चूप; तुला कोणीं विचारिलें?

गुरुजी:—पाहिला, भांडणांत पहिल्या प्रतीचा आणि अभ्यासांत मात्र कुच्चर!

इंद्रसेन:—गुरुजी, मला कुच्चर बिच्चर म्हणूं नका. मी कोणाचा नातू हें माहित आहे ना? मला असल्या कविता बिविता पाठ करायला सांगूं नका. घोड्यावर बसण्याचें, किंवा दांडपट्ट्याचे कांहीं हात माहित आहेत तुम्हांला? हें येत असलें, तर तुमचा आह्मांला उपयोग!

गुरुजी:—जास्त बोलूं नकोस, कान उपटून देईन हातांत.

इंद्रसेन:—असें कराल तर आजोबांला सांगून शिकवायला येण्याचें आतां पासूनच बंद करीन.

इंद्रसेना:—दादा असें रे काय? गुरुजींना असें बोलावें का?

इंद्रसेन:—चूप, नाहीं तर आईला सांगून चांगला खाऊ देववीन.

गुरुजी:—इंद्रसेन, असें अमर्याद बोलूं नये, तूं राजपुत्र, नीट वागावेंस.

इंद्रसेन:—हं, असे ठिकाणीं या. बरें पण गुरुजी, आतां आह्मांला खेळायला जायचें; रजा द्या.

गुरुजी:—रजा देतों, पण उद्यां तरी अभ्यास करून ठेवशील कां?

इंद्रसेन:—हो हो, अगदीं बिनचूक.

(इंद्रसेनेचा हात धरून) चल, इंद्रसेने बागेंत खेळायला जाऊं (निघून जातो.)

गुरुजी:—(स्वगत) हीं राजाचीं मुलें, यांशीं शिक्षकानें बेतानेंच चाललें पाहिजे. असो, आपल्याला काय ? आपली चंदी चालली म्हणजे पुरे ! (जातो)

प्रवेश ६ वा.

स्थल:—दिवाणखाना.

पात्रें:—दमयंती व केशिनी.

दमयंती:—गडे केशिनी, सुदेवदीक्षितांबरोबर ऋतुपर्णाकडे माझ्या पुनः स्वयंवराविषयीं निरोप पाठविल्याप्रमाणें त्याला एका रात्रींतून तो बाहुक सारथी येथें घेऊन आला, तर त्या सारथ्यालाच प्राणनाथ असें खात्रीनें समजेन. पण असें माझें नशीब फळेल कां ग?

केशिनी:—प्रिय सखे,:—

पद—(चाल:—दासि ऐसें)

येइ सु-दिन आजि खरा धन्य भाग्य फळत तुझें ॥
ईश-कृपा-मेघ वळुनि, चिंतानल पूर्ण विझे ॥ध्रु०॥
निषध-पती कांत तुझा पूर्णपणें ओळखिजे ॥ पा-
वुनि पति-संगम तूं, प्रेमभरें स्व-मनिं रिझे ॥ १ ॥

दमयंती:—अग, पण ऐकलास का तो पूर्वेकडच्या बाजूनें केवढ्या तरी वेगानें रथाचा घोष ऐकूं येत आहे! यावरून:—

पद—(चाल:—आहेत काय बाई)

येतीच काय बाई ॥ प्रियकर प्राणपती ॥ ही साध्य
नसे अन्या तयाविण अश्व-गती ॥ ध्रु० ॥ स्फुरतें

मी दिननिशीं ॥ देतील कीं दर्शनासी ॥ खरोखरी ॥ बाई ॥ १ ॥ प्रसन्न तो प्रभुराय ॥ साजणि होइल काय ॥ पति-पद-कमलासि ॥ पाहि का या समयासी ॥ खरोखरी ॥ बाई ॥ २ ॥

गडे, पाहिलास का बोलतां बोलतां तो रथ नगरांतहि येऊन दाखल झाला ! असो, आतां पुढें काय चमत्कार होतो तो पहावा. कारण, स्वयंवराचें खोटें निमित्त करून, मीं ऋतुपर्णाला येथें बोलाविलें आहे, यामुळें तो खजील मात्र होईल. आतां त्याचा असा उपहास होणें ठीक नाहीं; पण हा मार्ग स्वीकारल्याखेरीज गत्यंतरच नव्हतें. असो आतां:—

पद—(चालः—गुप्त तें तळघरीं)

जाइं गे अश्व-शाळेला ॥ पाहीं, सखये तेथें तूं गे ॥ झडकरी निषध-नृपतीला ॥ ध्रु० ॥ पाक-सिद्धतेसाठीं अग्नी ॥ देइं न तूं मुळिंच जला ॥ बघ उगीच तह्नीलेला ॥ १ ॥ करुनि परीक्षा धूर्तपणानें ॥ ओळखिं गे त्यासि पुरें ॥ मज झणीं कळिव वृत्ताला ॥ २ ॥

जातांना मुलें बागेंत खेळत असतील, त्यांनाहि बरोबर घेऊन जा. कारण, मुलांना पाहून पितृवात्सल्यानें जर त्या बाहुकाला प्रेमपाझर फुटला, तर तेच प्राणनाथ आहेत असें खात्रीनें समजतां येईल. व अशी खात्री पटल्यावर त्यांना युक्तीनें माझ्याकडे घेऊन ये. जा तर आतां; तोंपर्यंत मी स्नान व तुळशीची पूजा वगैरे आटोपतें.

केशिनीः—ठीक आहे, ही चाललें. (जाते)

दमयंतीः—(स्वगत) ईश्वरा, माझ्या या प्रयत्नास यश देणारा तूंच समर्थ आहेस. (जाते)

प्रवेश ७ वा.

स्थल:—खोपटें.

पात्रें:—बाहुक (नल), केशिनी व मुलें.

केशिनी:—(स्वगत) देवी दमयंतीच्या आज्ञेप्रमाणें बाहुकाला नुसता शिधा व रिक्तपात्र दिलें असतां त्यानें अग्नि व उदकाच्या अभावीं दोन्हीहि स्वसामर्थ्यानें उत्पन्न केलीं! त्यावरून ही साक्ष नलमहाराजांविषयीं चांगली पटते. आतां तो भोजन आटोपून बाहेर येण्याची वेळ आहे, तरी त्याची आणखी थोडी परीक्षा पहावी.

बाहुक (नल) (बाहेर येऊन केशिनीस):—आर्ये, माझें भोजन आटोपलें; पण तूं अद्याप तिष्ठत उभी आहेस, यावरून तुझ्या मनांत कांहीं बोलावयाचें आहे वाटतें?

केशिनी:—होय, दमयंतीनें पतीच्या शोधासाठीं पाठविलेल्या पर्णाद ब्राह्मणाच्या श्लोकाला जें आपण उत्तर दिलें, तेंच उत्तर प्रस्तुत आपल्या मुखानें ऐकण्याची तिची इच्छा आहे; व ह्मणूनच पुनः स्वयंवरमिषानें तिनें ऋतुपर्ण महाराजांना येथें बोलावून आपल्या आगमनाचा हेतु साधला. तरी आपण माझ्याबरोबर आतांच तिच्याकडे चलावें.

बाहुक (नल) (नेत्रांत अश्रु आणून):— मी तिच्यासमोर येण्याला मुळींच पात्र नाहीं.

इंद्रसेन:—(जवळ जाऊन व बाहुकाचा हात धरून) तुह्मी रडता कां हो?

इंद्रसेनाः—हें काय ? आईनें बोलावलें म्हणून डोळ्यांला पाणी कां आणितां ? (जवळ जाऊन डोळे पुसते.)

बाहुकः—(प्रेमाचा उमाळा येऊन) मुलांनो, तुह्मी जवळ या; मला चुंबन घेऊं द्या. तुह्मी हुबेहुब माझ्या मुलांसारखींच दिसत आहां. (दोघांनाहि जवळ घेऊन चुंबन घेतो व दोघेंहि तत्काळ दूर होतात.)

इंद्रसेनः—हें काय ?:—

पद—(चालः—इस तन धनकी)

इंद्रसेनः—सारथि तूं अधिकार न तुजला ॥ काय
ह्मणूनी चुंबिशि गालां ॥ ध्रु० ॥
इंद्रसेनाः—राज-बालकें आम्ही असुनी ॥ त्यजि-
शि कसा रे मर्यादेला ॥ १ ॥
इंद्रसेनः—अश्रु ढाळिशी काय ह्मणूनी ॥
इंद्रसेनाः—प्रेमा तुज हा कां उद्भवला ॥ २ ॥

बाहुक (नल)ः—बाळांनो, तुमच्या शीलाला योग्य असेंच तुह्मीं भाषण केलेंत; पण माझी ही चुंबन-क्रिया योग्य असल्याविषयीं तुमची केव्हां तरी खात्री होईल. जा बाळानों आतां. (केशिनीस) आर्ये, मुलांना घेऊन तूं पुढें हो, मी हा पाठोपाठ देवी दमयंतीच्या दर्शनाला आलोंच.

केशिनीः—(स्वगत) या घडलेल्या प्रकारावरून व यांच्या भाषणावरून हेच निषधपति नलराज आहेत अशी पक्की खात्री होते. पण यांचा वर्णमात्र भ्रमांत पाडीत आहे. तरी आतां दमयंतीसमक्ष याचा उलगडा होईलच. (उघड) ठीक, मी पुढें होतें; पण

आपण लवकरच यावें. (मुलांस) चला मुलांनो.
(मुलांसह,जाते)

बाहुक (नल):—(रस्त्यावर येऊन)

पद—(चालः—आतां शशिमुखिच्या)

होई उत्सुक हें मन्मन बहु सखि-भेटिला ॥ध्रु०॥ परि अपराधी मी सु-दतीचा ॥ वचन वदूं तरि काई ॥ १ ॥ तिज सन्मुख मज व्हावें लागे ॥ अ-धोवदन झणिं पाहीं ॥ २ ॥

असो, आतां गेल्याखेरीज गत्यंतरच नाहीं. (जातो)

प्रवेश ८ वा.

स्थलः—दमयंतीचा महाल.

पात्रें—बाहुक (नल), दमयंती, मुलें, केशिनी, भीमक, राणी व ऋतुपर्ण.

(बाहुक दमयंती समोर अधोवदन उभा राहतो.)

दमयंतीः—आर्या, मीं आपल्या प्राणपतीच्या शोधासाठीं पाठविलेल्या पर्णाद ब्राह्मणाच्या श्लोकाला आपण जें उत्तर दिलें, तें उत्तर या वेळीं मला ऐ-कवा पाहूं.

(बाहुकाचा कंठ गहिंवरून येतो.)

दमयंतीः—महाराज, माझ्या प्रश्नाचें उत्तर कां बरें देत नाहीं ?:—

पद—(चालः—शाम चुनरिया)

कां नयनिं हे बाष्प श्रवती ॥ तीच असे मी स्त्री दैमयंती ॥ तो नल पति निरखिला सु-मूर्ती

॥ ध्रु० ॥ गुप्तपणें तो कोठें वसतो ॥ मज दमयंती
आठवि का तो ॥ वृत्त कथा झणिं करी विनंती॥१॥

बाहुक (नल):—हे कल्याणी,:—

पद—(चालः—जाई परतोनी)

येई तो तव कांत ॥ आर्ये ॥ होउनिया ऋतुपर्ण-
सारथि भेटि तुझी गे घ्याया निभ्रांत ॥ ध्रु० ॥
पुनः स्वयंवर होइ तुझें गे ॥ त्या ऋतुपर्णा सं-
गतिं कीं ॥ म्हणुनि चकित जो फार मनांत ॥१॥

असो, तो नलराजा या पलीकडल्या दालनांत कांहीं दैवी सामर्थ्यानें अदृश्य आहे त्याला आतांच भेटवितों.

(जातो.)

दमयंती:—गडे केशिनी, आतां तर कांहींच शंका उरली नाहीं:—

पद—(चालः—मनमोहनजी मारा)

मन्मना पदीं अर्पिलें असति कीं तेच नृपति बाई ॥
शंका न यांत तिळही ॥ प्रभु-कृपें सु-दिन येई ॥
साजणी खरोखर भाग्य-रवी मम आजि उदित
होई ॥ १ ॥

॥ दोहरा ॥

धरुनी सारथि-वेष कीं वसले ऋतुपर्ण-गृहीं ॥
परि त्या युक्ती योजुनी आणी सखे येथ ही ॥
(चाल पहिली) पावते नदी सागरीं संगमा खचित
याच समयीं ॥ २ ॥

केशिनी:—सखे:—

पद—(चालः—कां आड सखे)

नच शंका उरली कांहीं ॥ हा बाहुक नल-नृप
पाहीं ॥ गे ॥ ध्रु० ॥ ईश-कृपेनें प्रिय-संगम हा ॥
आजी सखये होई ॥ गे ॥ १ ॥

(इतक्यांत नल कर्कोटकानें दिलेलें वस्त्र पांघरून पूर्व स्वरूपानें बाहेर येतो. व त्याला पाहतांच).

दमयंती:—अग बाई हे प्राणनाथ! (असें ह्मणून नलाला आनंदानें मिठी मारते.)

केशिनी:—(स्वगत) आतां ही बातमी भीमकमहाराजांना व आईसाहेबांला कळविली पाहिजे.

(जाते.)

दमयंती:—

पद—(चाल:—हें धनु भासतें)

हो मम प्राण-प्रिया नल-नाथा ॥ ठेवीं मि चरणीं माथा ॥ ध्रु० ॥

नल:—योग्य न मी पति ॥ ऋतुपर्णाप्रति ॥ वरिं तूं निश्चितिं ॥ हे दमयंती ॥

दमयंती:—ना वदा नलनाथा ॥ हो मम० ॥ १ ॥
ऐका वचनासि ॥ स्वप्नींहि न दासि ॥ इच्छी कवणासि ॥ वाही शपथेसि ॥ कलंकित नच ही पतिव्रता ॥ मम० ॥ २ ॥

नल:—प्रिये खरी ॥ अवनीवरीं ॥ तूंच बरी ॥ सती तरी ॥ प्रणय-विनोदचि हा वृथा ॥

दमयंती:—नलनाथा ॥ हो मम० ॥ ३ ॥

आकाशवाणी:—हे पुण्यश्लोका नला, ही साध्वी पूर्णचंद्राप्रमाणें निष्कलंकित आहे. तरी या आकाशवाणीवर विश्वास ठेवून तूं निःशंकपणानें हिचा पूर्ववत् स्वीकार कर. (पुष्पवृष्टि होते.)

इंद्रसेन:—(दमयंतीस) आई, हे बाबा काग?

दमयंती:—हो बाळा तेच बरें.

इंद्रसेना:—हे एकदम कसे आले ?

नल:—या बाळांनो, मला भेटूं द्या (दोघांला जवळ घेऊन चुंबन घेतो.) मघां ज्या सारथ्याकडे तुह्मीं आलां होतां व ज्यानें तुमचें चुंबन घेतलें, तो मीच बरें; आतां सांगा चुंबन घेण्याचा मला अधिकार आहे ना ?

इंद्रसेन:—सगळाच चमत्कार ! आह्मांला यांतलें कांहींच समजत नाहीं !

(इतक्यांत भीमक, राणी, ऋतुपर्ण व केशिनी प्रवेश करितात.)

नल:—(भीमकास) महाराजांच्या चरणीं मी अभिवंदन करीत आहें.

भीमक:—

॥ साकी ॥

सु-दिन धन्य हा पूर्ण उदेला भेट आपुली झाली ॥
ईश-कृपेनें दमयंतीची आजि मनीषा पुरली ॥
कु-दशा साच सरे ॥ आतां नांदा सौख्यभरें ॥१॥

नल:—(सासूस) हा जामात नमस्कार करीत आहे.

राणी:—उदंड आयुष्मान् व्हा.

नल:—(ऋतुपर्णास) महाराज, हा बाहुक आपल्यालाही अभिवंदन करीत आहे.

ऋतुपर्ण:—नलराज, माझ्याकडून आपला मोठा अन्याय झाला आहे, कीं आपल्यासारख्या पुण्यश्लोक नरेशाला मी ' सारथी ' या नात्यानें वागविलें.

नल:—महाराज, हें मनांत आणूं नये. आपण मला फार लोभानें वागविलें आहे. व त्यांतून

परिगणन व अक्षविद्या मला आपणांपासून मिळाल्यानें तर मी अपला आजन्म ऋणीं झालों आहें. असो, (भीमकस)महराज,आतां आह्मां सर्वांची रवानगी करावी. पुष्करापासून राज्य घेऊन पुन्हा सिंहासनारूढ होण्याविषयीं मन फार उत्कंठित झालें आहे.

भीमकः—ठीक आहे, दमयंतीसह आतां मंगलस्नानें करून वस्त्रालंकार धारण करा व चार दिवस विश्रांति घेऊन समागमाचा लाभ द्या. नंतर समारंभानें सैन्यासह तुमची रवानगी करितों. म्हणजे तुम्हाला शत्रूपासून तुमचें राज्य सहज घेतां येईल. असो, तुह्मांमुळें आज या ऋतुपर्ण महाराजांचाहि लाभ झाला आहे. तर हेहि चार दिवस विश्रांति घेतील.

नलः—(स्वगत)

पद—(चालः—प्रिये पहा)

जगीं पहा ॥ मायेचा खेळ असे, किति तरी
विचित्र हा ॥ ध्रु० ॥ अवनिपाल मी असुनी ॥
वक्र-दैव होतां क्षणिं ॥ रंकपणा मज येउनि ॥
होत छल महा ॥ १ ॥ ईश-कृपा-ओघ वळुनि ॥
कु-दिन आजि ते सरुनि ॥ मंगलकर सु-दिन
नयनिं ॥ निरखि मी अहा ! ॥ २ ॥

आतां अनन्य भावानें:—

पद—(चालः—स्यां लोटिली)

त्या ईश्वरा प्रार्थितों ॥ अर्पूनिच मन-कुसुम पदांबुजिं ॥ वंदित अवन सदा करु तो ॥१॥ मेघ
जलातें वर्षुनि भूमी ॥ देऊ तृण-धान्यातें नामी ॥
पौर सर्व नांदुत सद्धर्मी ॥ सतत हें इच्छितों ॥२॥

(पडदा पडतो)

अंक ५ वा समाप्त.

कोरस—(ईश्वरी जयदे जयदेवी)

सद्गुरो, सुखदा, वर-दायी, श्रीदत्ता ॥ जगदाभरणा, सूत्र चालका ॥ भव-भीती-सकल-दुरित-हारका ॥ ध्रु० ॥ सिद्ध-मुनी, पूज्य-जनीं ॥ ख्यात त्रिभुवनीं ॥ सुख-सदना, शांति-घना ॥ त्रि-गुण-रूप, वास सतत तव निरंजनीं ॥ त्राहिमां, त्राहिमां, त्राहिमां ॥ उद्धरिं-जग-पालका ॥ ज्ञान-दायका ॥ भव-भीती० ॥ १ ॥ योगि-जनीं श्रेष्ठ, वंद्य ॥ आदि-मध्य-रहित-अंत ॥ सच्चिद्-घन, प्रणव-रूप, विश्व-तारका ॥ भव० ॥ २ ॥ नम्र पाद-पद्मीं तव, होइ दास, नित्य देईं, चरणिं ठाव या विनायका ॥ भव० ॥

समाप्त.

[श्री सद्गुरु—चरणारविंदार्पणमस्तु.]